नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १७ * अंक ५३ * * वाशीम * सोमवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## गुजरातमध्ये सीरियन नागरिकाला अटक

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २४ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अहमदाबाद, गुजरात दौऱ्यापूर्वी, गुन्हे शाखेने शनिवारी एलिसब्रिज रीगल हॉटेलमधून एका सीरियन नागरिकाला अटक केली. त्याचे नाव २३ वर्षीय अली मेघाट अल-अझहर असे आहे. गुन्हे शाखेचे सह पोलीस आयुक्त शरद सिंघल यांनी सांगितले की, अलीकडून ३६०० अमेरिकन डॉलर्स आणि २५ हजार भारतीय रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत. त्याच्या शरीरावर गोळ्यांसह अनेक जखमांच्या खुणा आढळल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अली त्याच्या ३ साथीदारांसह गाझा पीडितांच्या नावाने मशिदी आणि इतर ठिकाणांहून निधी गोळा करत असे. नंतर ते त्या पैशातून विलासी जीवनशैली जगत होते.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## बिहार आणि इंडिया

बिहार राज्याच्या विधानसभा निवडणुकीचे नगारे आता जोरात वाजू लागलेले आहेत. राहुल गांधी यांनी फक्त एक पत्रकार परिषद घेऊन सर्व देशात खळबळ उडवून दिलेली आहे. ते दररोज निवडणूक आयोगावर दणादण वार करीत आहेत आरोप करीत आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने एक पत्रकार परिषद घेतली मात्र त्यानंतरही राहुल गांधींचे आरोप पुन्हा मोठ्या प्रमाणावर सुरूच आहेत. राहुल गांधी एकेकाळी अर्धवेळ राजकारणी होते आता ते ओव्हरटाईम राजकारणी झालेले आहेत. त्यातच हातात संविधानाची प्रत घेऊन त्यांनी जे जे आरोप केले त्याचा खुलासा निवडणूक आयोग करीतच नाही. राहुल गांधींचे आरोप खोटे होते असेच पालुपद निवडणूक आयोगाने लावलेले आहे मग निवडणूक आयोग त्यांच्या विरुद्ध एफआयआर का दाखल करीत नाही, असा सबंध भारतातील जनतेला पडलेला प्रश्न आहे. कोणत्याही परिस्थितीत एकाही प्रश्नाचे उत्तर न देता निवडणूक आयोग काय सिद्ध करू पाहत आहे हेच समजत नाही. त्यामुळेच एका मोठ्या संवैधानिक आस्थापनेबाबत संपूर्ण देशभरात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. गेल्या आठवड्यापासून राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मत अधिकार यात्रा सुरू केलेली आहे. इंडिया आघाडी गेल्या काही दिवसांपासून अगदी थंड बस्त्यामध्ये दिसत होती, त्यांच्यामध्ये कुठलीच हालचाल दिसत नाही असे सत्तारूढ पक्ष वारंवार म्हणत होता. त्यावेळी सर्वच लोकांमध्येही अशीच भावना होती कारण आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याची जाहीर घोषणा केली होती. पश्चिम बंगालच्या तृणमूल कॉंग्रेसने सुद्धा एकला चलो चा नारा दिला होता. त्यामुळेच इंडिया आघाडीतील इतर पक्षांच्या मनातही चलबिचल चालू असेल असे वाटले. परंतु बिहारमध्ये एसआयआर मुळे ६५ लाख मतदारांची नावे कमी करण्यात आली हाच प्रयोग इतर राज्यातही होऊ शकतो. काही ठिकाणी मते वाढू शकतात तर काही ठिकाणी मध्ये कमी होऊ शकतात असा आरोप राहुल गांधी दररोज करीत आहेत. त्यासोबतच ही मतांची चोरी आहे असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच की काय निवडणूक आयोगाच्या आताच्या वागणुकीवरून आपल्यावरही अशीच गाज पडू शकते हे दिसून आल्याने आता विस्कटलेली इंडिया आघाडी पुन्हा घट्ट होत असल्याचे दिसत आहे. राहुल गांधी यांच्या मतदान अधिकार यात्रेत इंडिया आघाडीतील झाडून सारे पक्ष आणि त्यांचे सर्वोच्च नेते सामील होत आहेत. आगामी उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी सत्तारूढ पक्षाला धावपळ करावी लागत आहे. खरे तर एनडीएचा उमेदवार निवडून आणण्यासाठी फक्त ३९३ मतांची गरज आहे आणि एनडीए मधील सर्व पक्षांजवळ ४२५ च्या वर मते आहेत. एवढे असूनही सत्तारूढांच्या बाजूला निश्चिंतता का नाही हा सुद्धा एक मोठा प्रश्न आहे. एनडीए मधील चंद्राबाबू नायडू यांची सौदेबाजी, खुद्द भारतीय जनता पक्षातील बऱ्याच असंतुष्टांची गैरमर्जी हे सर्व घटक सध्या सत्तारूढ पक्षाला बेजार करीत आहेत. भारताच्या निवडणुकीच्या इतिहासात उपराष्ट्रपती या पदावरची निवडणूक सहज पार पडत होती. उपराष्ट्रपती सहज निवडून येत होते. यावेळी मात्र जिकडे, तिकडे आणि चोहीकडे फिरूनही सत्तारूढांची दमछाक होण्याचे कारण काय असावे बरे. यावर बऱ्याच राजकीय धुरिणांनी वेगवेगळी मते नोंदवलेली आहेत. सत्तारूढ पक्षाच्या दमछाकीचे कारण इंडिया आघाडीची मजबुती आणि विविध कारणामुळे सत्तारूढ पक्षातील असंतोष आहे, असे जवळपास सर्वांचेच म्हणणे आहे. मग सत्तारूढ पक्षाला याचा विचार करणे भागच आहे त्यातच ही निवडणूक दक्षिण विरुद्ध दक्षिण अशा पद्धतीने करून इंडिया आघाडीने मोठीच मनोरंजकता निर्माण करून गंमत आणलेली आहे. सत्तारूढ पक्षाचा अर्थ प्रचंड पाठिंबा असलेली आघाडी असा आहे. अर्थाअर्थी या निवडणुकीचा अर्थ आणि त्याची शक्ती किती फलदायी ठरते यावरून आता दोन्ही पक्षांची परीक्षा होणार आहे. आता तरी सत्तारूढ पक्षाचे पारडेच जड दिसते. मात्र, बिहारमध्ये सध्यातरी इंडियाची बहार दिसत आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## भारतीय हवाई संरक्षण शस्त्र प्रणालीची पहिली चाचणी यशस्वी

■ वृत्तसंस्था, चांदीपूर, दि. २४ :

भारतीय संरक्षण संशोधन संघटनेने ओडिशाच्या किनाऱ्यावर एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्र प्रणालीची पहिली चाचणी घेतली आहे. ही एक बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणाली आहे ज्यामध्ये सर्व स्वदेशी क्विक ॲक्शन सरफेस टू एअर मिसाईल, ॲडव्हान्स्ड व्हेरी शॉर्ट एअर डिफेन्स सिस्टम मिसाईल आणि हाय पॉवर लेसर आधारित डायरेक्टेड एनर्जी वेपन यांचा समावेश आहे.

ही चाचणी शनिवारी (२३ ऑगस्ट) घेण्यात आली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी वरील एका पोस्टमध्ये ही माहिती दिली. त्यांनी लिहिले - या चाचणीमुळे आपल्या देशाची बहुस्तरीय हवाई संरक्षण क्षमता वाढली आहे. ही प्रणाली शत्रूच्या हवाई धोक्यांविरुद्ध प्रादेशिक संरक्षण मजबूत करेल.

ॲडव्हान्स्ड हा सुदर्शन चक्र मोहिमेचा एक भाग मानला जातो. हे थवे (एकाच वेळी सोडलेले अनेक ड्रोन) ड्रोन हल्ल्यांपासून संरक्षण कवच म्हणून काम करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



१५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात सुदर्शन चक्र मोहिमेची घोषणा केली होती.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही एक्सवरील चाचणीचा फोटो शेअर केला आहे.

चाचणी दरम्यान, या प्रणालीने तीन वेगवेगळ्या लक्ष्यांवर हल्ला केला ज्यामध्ये २ हाय स्पीड फिक्स्ड विंग मानवरहित ड्रोन आणि एक मल्टी कॉप्टर ड्रोन यांचा समावेश होता. हे तीन

### ड्रोन हल्ल्यांविरोधात संरक्षणात्मक कवच असेल

लक्ष्य वेगवेगळ्या अंतरावर आणि उंचीवर होते. ॲडव्हान्स्डने एकाच वेळी तिन्ही लक्ष्यांना लक्ष्य केले आणि त्यांना पूर्णपणे नष्ट केले.

या प्रणालीची संकल्पना अशा प्रकारे डिझाइन केली आहे की प्रथम रडार युनिट येणाऱ्या धोक्यांवर लक्ष ठेवते आणि त्यांचे वर्गीकरण करते. त्यानंतर, कमांड सेंटर क्विक ॲक्शन सरफेस टू एअर मिसाईलला उंचावरील धोक्यांना लक्ष्य करण्यासाठी सूचना देते.

ॲडव्हान्स्ड व्हेरी शॉर्ट एअर डिफेन्स सिस्टीम मिसाईल कमी पल्ल्याच्या आणि कमी गतीच्या हल्ल्यांसाठी सक्रिय केली जातात. यासोबतच, ड्रोन आणि चिप सॅच्युरेटेड हल्ल्यांसाठी लेसर आधारित डायरेक्टेड एनर्जी वेपन्स हल्ला केला जातो. या प्रणालीच्या यशस्वी चाचणीमुळे भारताचे इग्ला आणि सीआयडब्ल्यूएस सारख्या परदेशी संरक्षण प्रणालींवरील अवलंबित्व कमी होईल.

## कोकणात जाणाऱ्या खासगी बसला आग ४० प्रवासी थोडक्यात बचावले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

गणेशोत्सवासाठी कोकणात परतणाऱ्या चाकरमान्यांच्या खासगी बसला भीषण आग लागल्याची घटना घडली. मुंबईहून मालवणकडे जाणाऱ्या बसने मध्यरात्री दोनच्या सुमारास रत्नागिरी जिल्ह्यातील कशेडी बोगद्याजवळ अचानक पेट घेतला. बसमधील सर्व प्रवासी सुखरूप आहेत. चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ही बस मुंबईहून मालवणकडे जात होती. या बसमधून सुमारे ४० ते ४५ प्रवासी प्रवास करत होते. मध्यरात्री दोनच्या सुमारास ही बस रत्नागिरीच्या कशेडी बोगद्याजवळ आली असता, बसने अचानक पेट घेतला. ही बाब लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत तात्काळ बस बाजूला घेऊन प्रवाशांना खाली उतरवले. यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, गणेशोत्सवासाठी घरी जाणाऱ्या प्रवाशांचे सर्व सामान या आगीत जळून खाक झाले आहे. घटनेची माहिती मिळताच खेड



नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. प्रवाशांना त्यांच्या गावी जाण्यासाठी पर्यायी वाहनाची व्यवस्था करून देण्यात आली. बसला आग नेमकी कशामुळे लागली, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, पण बसचे चाक गरम झाल्याने ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. गणेशोत्सवाच्या तोंडावर हा मोठा अनर्थ टळल्याने प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

गणेशोत्सव असल्यामुळे बहुतांश प्रवाशी बरेच सामान घेऊन आपल्या गावी जात होते. मात्र, बसला आग लागल्याचे लक्षात येताच हे सर्वजण घाईघाईत खाली उतरले.

## चंबळ नदीचे पाणी घरात शिरले



११ जिल्ह्यांमधील शाळा बंद

■ वृत्तसंस्था, लखनऊ, दि. २४ :

राजस्थानमध्ये सततच्या पावसामुळे कोटा, बुंदी, सवाई माधोपूर आणि टोंक येथे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. बुंदी, चंबळ येथे घरांमध्ये पाणी शिरले आहे. राज्य महामार्गावरील रस्ता उखडला आहे. सवाई माधोपूरमध्ये जमिनीचा मोठा भाग बुडाला आहे. मदत आणि बचावकार्यासाठी सैन्याला पाचारण करण्यात आले आहे. हवाई दलाचे एमआय-१७ हेलिकॉप्टर देखील तैनात करण्यात आले आहे.

जयपूर आणि सिकरसह ११ जिल्ह्यांमध्ये १ ते ३ दिवसांच्या सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. उदयपूरमधील कुंवरी खाणींमध्ये पाणी भरले. त्यात बुडून ४ मुलांचा मृत्यू झाला. दरम्यान, नागौरमध्ये घर कोसळल्याने २ जणांचा मृत्यू झाला.

जम्मू आणि काश्मीरमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिग्रेटिव्ह मेडिसिन कॅम्पसमध्ये पाणी शिरले. वसतिगृहाची इमारत एका मजल्यापर्यंत पाण्याखाली गेली. इमारतीच्या वरच्या भागात अडकलेल्या १५० विद्यार्थ्यांना एसडीआरएफ टीमने वाचवले.

## एखादा नेता येऊन भेटल्याने युती ठरत नाही

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २४ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. "एखादा नेता मला भेटला म्हणून राजकारण ठरत नाही," असे स्पष्ट करत फडणवीस यांनी राज ठाकरे हे महायुतीसोबत



येणार नसल्याचे संकेत दिले आहेत.

### राज ठाकरेंच्या भेटीवर फडणवीसांचे स्पष्टीकरण

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रितपणेच लढणार असल्याचे त्यांनी म्हटले.

काही दिवसांपूर्वीच बेस्टच्या पतपेढी निवडणुकीत ठाकरे बंधुंच्या पॅनलचा दारुण पराभव झाल्यानंतर राज ठाकरे यांनी वर्षा बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. मात्र महायुती अभेद्य आहे आणि आम्ही निवडणुका एकत्रच लढणार आहोत, असे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितल्याने त्या चर्चाही संपुष्टात आल्या आहेत. लोकांनी भ्रमित होण्याचे कारण नाही.

## जखमी गोविंदाचा उपचारादरम्यान मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २४ :

चौथ्या थरावरून खाली पडल्याने गंभीर जखमी झालेल्या पवई येथील गोखले नगर गोविंदा पथकातील एक गोविंदाचा मृत्यू झाला आहे. गेल्या सात दिवसांपासून त्याच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र शनिवारी या गोविंदाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

आनंद दांडगे (२६) असे या मृत गोविंदाचे नाव असून तो पवईच्या गोखले नगर परिसरात राहत होता. त्याच परिसरातील गोखले नगर गोविंदा पथकात अनेक वर्षांपासून तो कार्यरत होता. तो १६ ऑगस्ट रोजी, दहीहंडीच्या दिवशी विक्रोळीच्या कन्नमवार नगर परिसरात पथकाकडून सात थर लावण्यात आले होते. त्यात चौथ्या थरावरून खाली पडून तो गंभीर जखमी झाला होता.

आनंदच्या मानेला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने गेल्या आठ दिवसांपासून त्याच्यावर कन्नमवार नगर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचार सुरू असताना शनिवारी दुपारी दोनच्या सुनरास त्याचा मृत्यू झाला आहे. त्याच्या मृत्यूनंतर पवईत शोककळा पसरली असून विक्रोळी पोलिसांनी याबाबत अपमृत्यूची नोंद करत मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवला आहे.

यंदा दहीहंडी फोडताना २९४ गोविंदा जखमी झाले होते, तर दोघांचा मृत्यू झाला होता. मुंबई-ठाण्यात उंच दहीहंडी फोडण्यासाठी थर रचण्यात गोविंदा पथके व्यग्र असतानाच उत्सवाला गालबोट लागले. मानखुर्द परिसरात बाल गोविंदांसाठी दहीहंडी बांधणाऱ्या एका गोविंदाचा पडून मृत्यू झाला.

तर अंधेरी येथील गोविंदा पथकासोबत गेलेल्या १४ वर्षाच्या मुलाची टेम्पोमध्ये शुद्ध हरपली. त्यानंतर त्याचा मृत्यू झाला. सरावादरम्यान एका ११ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला होता. यातील काही आयोजकांनी सुरक्षेसंदर्भात सूचनांचे पालन केले नव्हते.

## लांडग्याचा नऊ जणांवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी,
सोलापूर, दि. २४ :

सांगोला वनविभागाच्या एखतपूर, धायटी, चिंचोली व अन्य भागांत लांडग्याने आतापर्यंत नऊ लोकांवर हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. या सर्व घटनास्थळांना आणि जखमी लोकांच्या भेटीसाठी वनविभागाची यंत्रणा धावून गेली आहे.

सर्व जखमींना सोलापूर व सांगोला येथे पाठविण्यात आले आहे. जखमींची प्रकृती स्थिर असून, त्यांना शासकीय मदतीची कार्यवाही करण्यात येत आहे. ट वन्यजीव पकडण्यासाठी पुणे व सोलापूर येथील वन्यजीव बचाव पथक सांगोला भागात दाखल झाले आहेत.

## धोका देणाऱ्यांची डोकी फुटतील, शिवसेना फुटणार नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या शाखेत कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांची तपासणी करण्याचे निर्देश दिले. तसेच, शिंदे गटावर सडकून टीका करत त्यांना 'काळे मांजर' असे संबोधले. शिवाय धोके देणाऱ्यांची डोकी फुटतील, पण शिवसेना फुटणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच जाहीर होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख यांनी पक्षाच्या शाखा भेटी सुरू केल्या आहे. आज त्यांनी मुंबईतील शिवसेना शाखेला भेट दिली. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी



### उद्धव ठाकरेंचा घणाघात

मतदारयादील घोळ आणि शिंदे गटावर टीका केली.

गेले दोन तीन वर्ष सतत प्रसारमाध्यमांतून येते की, इकडे शिवसेनेला धक्का, तिकडे धक्का. एकदा जाऊनच बघू किती धक्के बसलेत. असे धक्के देणारे अनेक जण आले आणि अनेकजण गेले. पण शिवसेनेला कुठेतरी कदाचित धक्का बसला असेल, पण धोका झालेला नाही. अनेकांनी धोके देण्याचे अनेक प्रयत्न केले. यानंतही ते होतील. पण जोपर्यंत तुमची तटबंदी मजबूत आहे. तोपर्यंत धक्का आणि धोके देणाऱ्यांची डोकी फुटतील, पण शिवसेना फुटणार नाही, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर केली.

गणेशोत्सवाच्या तोंडावर उद्धव ठाकरे यांनी गणपतीच्या चरणी प्रार्थना केली. "आम्ही हिंदुत्वाचा पवित्र भगवा घेऊन पुढे जात आहोत. वाटेत स्वतःला वाघ म्हणवणारे अनेक काळे मांजरे आडवी येतात. गणराया, त्या अपशकुनी मांजरांचा बंदोबस्त तूच कर, नाहीतर त्यांचा बंदोबस्त करायला आम्ही शिवसैनिक आहोतच," असे म्हणत त्यांनी शिंदे गटावर थेट हल्लाबोल केला.



# लाडकी बहीण योजनेत २६ लाख बोगस लाभार्थी



■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २४ :

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. सरकारच्या शोधमोहिमेत तब्बल 26 लाख 34 हजार बोगस लाभार्थी समोर आले असून, हे सर्व लाभार्थी पात्रतेच्या निकषांत बसत नसतानाही दरमहा 1500 रुपयांचा निधी घेत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीला मोठा फटका बसल्याचे स्पष्ट झाले आहे. बोगस लाभार्थींची संख्या पुणे जिल्ह्यात सर्वाधिक आहे. याबाबत अजित पवारांना विचारले असता, त्यांनी थेट उत्तर न देता, योजना बंद करू का? अशी प्रतिक्रिया दिली.

या बोगस प्रकरणात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यांतूनच सर्वाधिक अपात्र लाभार्थी सापडले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे जिल्ह्यात तब्बल 2 लाख 4 हजार बोगस नावे आढळली. तर एकनाथ शिंदे पालकमंत्री असलेल्या ठाणे जिल्ह्यात 1 लाख 25 हजार 300 बोगस लाभार्थी आढळले आहेत. या विषयावर आज पुण्यात अजित पवार यांना याबाबत विचारले असता त्यांनी थेट भूमिका न जाहीर करता, "...मग योजना बंद करू का?" अशी प्रतिक्रिया दिली.

माझी लाडकी बहीण' योजनेमध्ये एकूण 2 कोटी 63 लाख महिलांनी नोंदणी केली होती, ज्यापैकी 2 कोटी 41 लाख महिला पात्र ठरल्या. मात्र, सरकारच्या सखोल तपासणीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्यांनीही या योजनेत नोंदणी केली. तसेच, एकाच कुटुंबातील अनेक व्यक्तींनी आणि काही ठिकाणी पुरुषांनीही महिलांच्या नावाने अर्ज भरून या योजनेचा लाभ घेतला. माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अहवालानंतर हा घोटाळा उघडकीस आला. या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांविरोधात सरकारने शोधमोहीम तीव्र केली असून, भविष्यात केवळ योग्य लाभार्थ्यांनाच फायदा मिळेल हे सुनिश्चित केले जाणार आहे. या योजनेतील बोगस लाभार्थींमुळे सरकारची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर, सरकारने तात्काळ पावले उचलली आहेत. जून महिन्यापासून या 26 लाख 34 हजार अपात्र लाभार्थ्यांचा मासिक निधी थांबवण्यात आला आहे.

## शाळा विक्रीचा डाव?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मालवणीतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेचे खासगीकरण होणार असल्याच्या चर्चेने राजकारणाला चांगलाच ताप आला आहे. या प्रकरणी काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत आंदोलन छेडले. खासदार वर्षा गायकवाड आणि आमदार अस्लम शेख थेट मैदानात उतरले आणि मग वातावरण पेटले. शाळेवर १०० कोटी रुपये खर्च करून ती अचानक खाजगी हातात का दिली जाते? १२०० विद्यार्थी शिकत असताना गरीब मुलांचे भविष्य का हिरावले जाते? असा थेट सवाल वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान पालकांसह काँग्रेस कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत सरकारविरोधात तीव्र निषेध नोंदवला.

## मुख्यमंत्री फडणवीसांची एकनाथ शिंदेंच्या खात्यावर नाराजी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील 'नगरविकास खात्याच्या कामगिरीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजाणीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीत फडणवीस यांनी नगर विकास विभागाची कामगिरी "अत्यंत सुमार" असल्याचे म्हटले आणि अधिकाऱ्यांनी तातडीने त्यात सुधारणा करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे महायुतीतील नेत्यांमध्ये 'ऑल इज नॉट वेल' असल्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजाणीचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी बैठक घेतली. या बैठकीला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डिकर यांच्यासह अनेक विभागांचे मंत्री व सचिव उपस्थित होते. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अनुपस्थित होते. हिंदुस्थान टाइम्सने याबाबतचे वृत्त दिले आहे.

या वृत्तानुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेषतः 'अमृत 2.0' योजनेच्या अंमलबजावणीत नगर विकास विभागाने आत्तापर्यंत जी कामगिरी करण्यात आली, त्यात नगरविकास खात्याने कामचुकारपणा केल्याबद्दल त्यांच्या कामावर देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ही योजना 2021 मध्ये सुरू झाली असून, मार्च 2026 पर्यंत तिचा कालावधी असणार आहे. या योजनेसाठी महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून 9 हजार कोटी रुपयांहून अधिक निधी मिळाला आहे.

"शहरी भागात पाणीपुरवठा, स्वच्छता, उद्याने आणि तलाव पुनरुज्जीवनासाठी 'अमृत मिशन' अंतर्गत केंद्र सरकार निधी देत आहे. या मिशनमध्ये शहरी भागातील लोकांचे जीवनमान सुधारण्याची मोठी क्षमता आहे. त्यामुळे, सर्व प्रलंबित कामे 31 मार्च 2026 पूर्वी पूर्ण करावीत आणि प्रशासकीय परवानग्या त्वरित द्याव्यात," असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

यासोबत मुख्यमंत्री फडणवीसांनी 15व्या वित्त आयोग, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा मिशन आदी योजनांचा आढावा घेतला. आवश्यक परवानगी मिळाल्यानंतरच प्रकल्प सुरू करावेत, नाहीतर काम विलंबित होते, असे सांगून त्यांनी विभागांमधील समन्वय वाढवण्याचे निर्देश दिले.

## भाजपच्या गुडघ्यात सुद्धा मेंदू नाही : संजय राऊत



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मते कुठे गेली असा साल केला होता. हा प्रश्न सर्वच विरोधी पक्षांनी उपस्थित केला होता. या प्रश्नाचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे. फडणवीस यांच्या टोळीतील लोक जनतेने आम्हाला कौल दिला असे सांगत असले तरी ते खोटं बोलत आहेत. जनतेने यांना कौल दिलेला नाही यांनी मते चोरली आहेत, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, राहुल गांधी यांनी उपस्थित केलेला मुद्दा आंतरराष्ट्रीय पातळीवर गेला आहे. भारतासारख्या देशात नरेंद्र मोदी मत चोरी करत सत्तेवर आले आहेत. लिबियामध्ये, इराण, पाक आणि रशियामध्ये ज्या पद्धतीने निवडणूक जिंकली जाते त्याच पद्धतीने नरेंद्र मोदी अमित शहा यांनी निवडणूक जिंकली आहे. यामध्ये राज्याच्या निवडणुका सुद्धा आहेत. संजय राऊत म्हणाले की, राहुल गांधी, तेजस्वी यादव यांनी मत चोरीचा मुद्दा बिहारच्या घराघरात पोहोचवला आहे. महाराष्ट्रातील मते गेली कुठे हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. जावेद मियांदाद यांना आम्ही घरी बोलावले होते. भाजपच्या गुडघ्यात सुद्धा मेंदू नाही. देवेंद्र फडणवीस अर्धवट ज्ञानी आहेत. संपूर्ण भाजपच अर्धवट ज्ञानी आहेत. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्यावर निर्माण केलेला ठाकरे चित्रपट पाहिला पाहिजे. बाळासाहेब ठाकरेंच्या मुलाखती समजून घेतल्या पाहिजे. जावेद मियांदाद बाळासाहेब ठाकरे यांना विनंती करण्यासाठी मातोश्रीवर आले होते. भारत-पाक क्रिकेट मॅचला विरोध करु नका अशी विनंती त्यांनी केली होती. पण बाळासाहेबांनी सांगितले होते की दहशतवाद आणि क्रिकेट एकत्र चालू शकत नाही.

## भजनी मंडळांप्रमाणेच गणेशोत्सव मंडळांनाही अनुदान द्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला असून त्या उपक्रमांतर्गत शासनाने भजनी मंडळांना भांडवली अनुदान या योजनेमार्फत राज्यातील १८०० भजनी मंडळांना अनुदान देण्याची घोषणा केली आहे. या घोषणेचे गणेशोत्सव समन्वय समितीने स्वागत केले असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाही अनुदान द्यावे अशी मागणी समितीने केली आहे.

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत गणेशोत्सव -महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. त्यामुळे राज्य शासनातर्फे हा महोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विस्तृत नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत शासनाने भजनी मंडळांना भांडवली अनुदान या योजनेमार्फत राज्यातील १८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी २५ हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी २५ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत अर्ज करण्याचे आवाहनही केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना अनुदान देण्याची मागणी बृहन्मुंबई



सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने केली आहे.

गणेशोत्सवाचा मूळ गाभा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचाही शासनाने विचार करायला हवा, असे मत बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, मुंबईत किमान १० ते १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. त्यातील रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव आणि शतक महोत्सव साजरा करणाऱ्या गणेश मंडळांना शासनाने अनुदान दिल्यास मंडळांना हा उत्सव आणखी जल्लोषात साजरा करता येईल.

मुंबईतील गणेश मंडळांनी नेहमीच सामजिक कार्यात पुढाकार घेण्याचे काम केले आहे. राष्ट्रीत आपत्ती असो किंवा महापूराचे संकट अशा आपत्तींमध्ये मुंबईतील गणेश मंडळांनी योगदान दिले आहे. वर्षभर आरोग्य शिबीरे आणि विविध उपक्रम राबवून, सामाजिक देखाव्यांतून समाज प्रबोधनाचे काम ही मंडळे करत आली आहेत, त्यामुळे गणेश मंडळे अनुदानास पात्र आहेत असे मत ॲड दहिबावकर यांनी व्यक्त केले आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिषजी शेलार यांच्याकडे लवकरच समन्वय समिती लेखी मागणी करेल, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव मंडळांचेही आर्थिक गणित बिघडले असून उत्सव साजरा करणे मुश्कील होऊ लागले आहे. एकाबाजूला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लांबल्यामुळे राजकीय पक्षांकडून येणाऱ्या जाहिराती आटल्या आहेत. तसेच राजकीय पक्षातील फाटाफूटीचाही गणेशोत्सव मंडळांना आर्थिक फटका बसू लागला आहे.

## अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ सिबिल खराब करण्याचे साधन

### विरेंद्र पवार यांची टीका



**मुंबई** : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील 29 ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहेत. ते मुंबईत आमरण उपोषण करणार आहेत, ज्याची तयारी म्हणून आज मुंबईतील शिवाजी नाट्य मंदिर येथे एक बैठक पार पडली. या बैठकीला मुंबई आणि उपनगरातील मराठा समाजाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मराठा आंदोलक विरेंद्र पवार यांनी अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळावर जोरदार टीका केली आहे. त्यांच्या मते, हे महामंडळ म्हणजे मराठा तरुणांचे सिबिल खराब करण्याचे एक साधन असल्याची त्यांनी टीका केली आहे. विरेंद्र पवार म्हणाले, मनोज जरांगे आंदोलन करत आहेत हे लक्षात आल्यावर आता 1 वर्षापासून झोपलेले सरकार जागे झाले आणि आता मराठा आरक्षण उपसमिती सरकारने नेमली. ज्यांनी समाजाबाबत चुकीची वक्तव्य केली, त्यांना सरकारने समितीचे अध्यक्ष केले. मराठा समाजासाठी अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. परंतु, याचा व्याज परतावा मिळत नाही. मराठा समाजाच्या मुलांचे सिबिल खराब करण्याची यंत्रणा म्हणजे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आहे.

## जरांगे लाखो मराठ्यांना घेऊन २८ ऑगस्टला मुंबईत दाखल होणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करावा, अशी मागणी घेऊन मनोज जरांगे पाटील २७ ऑगस्ट रोजी मुंबईकडे कूच करून २८ ऑगस्ट रोजी मुंबई शहरात दाखल होणार आहेत. त्यांच्यासोबत आंतरवाली सराटी येथून लाखो बांधव असतील, असे सांगण्यात आले आहे. मुंबईत दाखल होण्याच्या पूर्वसंध्येला जरांगे शिवनेरी किल्ल्यावर जाऊन दर्शन घेणार आहेत. जुन्नर येथे त्यांचा पहिला मुक्काम असेल. आझाद मैदानावर ते २९ ऑगस्टपासून उपोषण सुरू करणार आहेत. मराठा आंदोलक मुंबईत यावेत आणि त्यांच्यात दंगल घडून यावी अशी सरकारचीच इच्छा आहे. सरकारच मराठ्यांच्या अंगावर आग फेकू पाहत आहे, असा आरोप जरांगेंनी केला. तर मुंबईतील आंदोलनापूर्वी जरांगेंनी सरकारशी चर्चा करावी, असे आवाहन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. तर ओबीसींचे ज्येष्ठ नेते, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, चार आयोगांनी मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण नाकारले आहे. सर्वोच्च न्यायालयाचाही या विषयी निकाल आहे. मग हे लोकांना का त्रास देत आहेत?

गेल्या दीड महिन्यात जरांगेंनी स्वतः अनेक जिल्ह्यांत जाऊन मुंबईतील आंदोलनाची तयारी करून घेतली. त्यामुळे प्रत्येक मोठ्या गावातून १० ते १५ वाहने मुंबईकडे निघतील. तालुक्याची गावे आणि मोठ्या शहरातून हा आकडा प्रचंड मोठा असेल, असा दावा केला जातो आहे. आंतरवालीतून जरांगेंसोबत विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशमधील बांधव निघतील.

पश्चिम महाराष्ट्र आणि नाशिक जिल्ह्यातील बांधव रस्त्याने त्यांच्यासोबत सहभागी होतील. या दौऱ्यातील पहिला मुक्काम पुणे जिल्ह्यातील जुन्नर दुसरा मुक्काम थेट आझाद मैदानावर होणार आहे. मैदानावर पोहोचताच जरांगेंचे उपोषण सुरू होणार आहे.

## शक्ती संवादात उलगडले नवे दृष्टीकोन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मुंबईत दोन दिवस रंगलेल्या राष्ट्रीय व राज्य महिला आयोगाच्या शक्ती संवाद परिषदेची आज यशस्वी सांगता झाली. महिला सक्षमीकरण, सुरक्षा आणि कायदेशीर जागरूकता या ध्येयांनी भारलेल्या या परिषदेतील संवादाने नव्या शक्यतांना दिशा दिली.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे विशेष अभिनंदन करत सर्व राज्यांच्या आयोगांसाठी कृती कार्यक्रम जाहीर केला. महिलांचे पोषण, शिक्षण, बेटी बचाव-बेटी पढावसारख्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसह एक पेड माँ के नाम सारख्या अनोख्या संकल्पना पुढे आल्या.

## चिमुरड्याचा सुरतहून मुंबईमध्ये आणून खून

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मुंबई-कुशीनगर एक्स्प्रेसच्या एसी कोचच्या शौचालयातील कचऱ्याच्या डब्यात ७ वर्षीय मुलाचा मृतदेह आढळला आहे. कुर्ला येथील लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) स्थानकावर शनिवारी ही घटना उघडकीस आली. आरोपीने मुलाची गळा दाबून हत्या केली आणि नंतर त्याचा मृतदेह कचरापेटीत टाकून पळ काढला. या प्रकरणी बिहारच्या २६ वर्षीय विकास साहा याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून मृत मुलाचा नात्याने मावस भाऊ असल्याचेही समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत आकाश साहा हा गुजरातमधील सुरतच्या अमरेली येथून बेपत्ता झाला होता. त्याचे अपहरण झाल्याची तक्रार अमरेली पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. त्याचे अपहरण केल्याचा संशय विकास याच्यावर होता. त्यामुळे अमरेली पोलिस विकासच्या मोबाइल लोकेशनचा मागोवा घेत होते. त्याचे शेवटचे लोकेशन मुंबईत आढळले. विकास साहा दोन आठवड्यांपूर्वीच बिहारहून कामाच्या निमित्ताने सुरत येथे आला होता.

आकाशची त्याचा मावस भाऊ विकाससोबत खूप गट्टी जमली होती. त्यामुळेच तो त्याच्यासोबत सुरतहून मुंबईला आला. त्याला हे माहीत नव्हते की त्याचा मावस भाऊच त्याचा मारेकरी ठरणार आहे. सुरतहून रेल्वने विकास मुंबईतील दादर स्थानकावर उतरला. त्यानंतर लोकल ट्रेनने तो एलटीटीला पोहोचला. एलटीटी स्थानकावर त्याने कुशीनगर एक्सप्रेस (गाडी क्रमांक २२५३७) पाहिली. नंतर त्याने आपला कट पूर्ण करण्यासाठी एसी कोच बी २ मध्ये प्रवेश केला आणि तेथेच त्याने आकाशची गळा दाबून हत्या केली.

## "लखपती दीदी" मोहिमेतून कोटी बहीणी सक्षम होणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राखीच्या शुभसोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा संकल्प जाहीर केला. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील एक कोटी बहीणींना लखपती दीदी करणारच," असा विश्वास व्यक्त करत त्यांनी महिलांसाठी सुरु असलेल्या योजनांना विरोधक कितीही अडथळे आणोत, पुढील पाच वर्षांत एकही योजना बंद होणार नाही, अशी ठाम ग्वाही दिली.

भाजपाच्या माझा भाऊ देवाभाऊ अभियानांतर्गत झालेल्या भव्य राखी प्रदान सोहळ्यात राज्यभरातून आलेल्या 36 लाख 78 हजार राख्या मुख्यमंत्री फडणवीस यांना सुपूर्त करण्यात आल्या. या प्रसंगी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आशीष शेलार, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

"या राख्या भाषा, धर्म, जात न पाहता निरपेक्ष प्रेमाचे प्रतीक आहेत. इतक्या बहीणींचे प्रेम ज्याच्याकडे आहे त्याला कुणाची भीती नाही," अशा शब्दांत फडणवीसांनी बहिणींच्या प्रेमाची दखल घेतली. राखी पाठवणाऱ्या बहिणींना उद्देशून ते म्हणाले "तुम्हा बहिणींच्या आशीर्वादामुळे 2029 मध्येही महाराष्ट्रात आमचेच सरकार येईल." प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सोहळ्याला "अनोखी भेट" ठरवली. "राजकारणाच्या पलीकडे जाऊन दिवसाचे 18 तास काम करणाऱ्या देवाभाऊंसाठी हा राखी सोहळा खास आहे," असे ते म्हणाले. तर चित्रा वाघ यांनी "महिलांच्या हाताला काम आणि दाम मिळवून देणारा हा भाऊ म्हणजे खरे भाग्य" असे उद्गार काढले.

## सायबर चोरट्यांकडून ३७ लाखांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :

सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत ज्येष्ठ नागरिकासह तिघांची ३७ लाखांची फसवणूक केली. याबाबत एका महिलेने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला हडपसर-काळेपडळ परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. समाज माध्यमातील जाहिराती, तसेच चित्रफितींना दर्शक पसंती मिळवून दिल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले होते.

## सीमेवरील सैनिकांसाठी पुण्यातून दगडूशेठ गणपतीच्या मूर्ती रवाना

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :

सामान्य नागरिकांप्रमाणेच देशाच्या सिमेवर लढणारे सैनिक देखील गणेशाची भक्ती करतात. मात्र, भारतीय सैनिक सिमेवर अहोरात्र पहारा देत असल्याने त्यांना पुण्यामध्ये गणेशोत्सवात सहभागी होण्यास येता येतेच असे नाही. त्यामुळे यंदा भारतीय लष्करातील 33, 6, 19, 1, 101 इन्फंट्री आणि 71 इन्फंट्री युनिटच्या सैनिकांना अरुणाचल प्रदेश, पठाण कोट, गुवाहाटी व राजस्थानसह येथे गणेशोत्सवात श्रीं ची प्रतिकात्मक मूर्ती स्थापन करण्यास देण्यात आल्या.

सीमावर्ती भागात दगडुशेठ च्या श्रीं ची प्रतिकात्मक मूर्ती स्थापन करण्याची इच्छा या बटालियनच्या सैनिकांच्या वतीने व्यक्त करण्यात आली होती. ट्रस्टने सैनिकांच्या इच्छेला मान देऊन श्रीं ची हुबेहुब 2 फुटी प्रतिकात्मक मूर्ती देण्याचे मान्य केले. त्यानुसार नुकत्याच या मूर्ती विविध ठिकाणी रवाना झाल्या आहेत. यावेळी ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीची ख्याती केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर सर्वदूर पसरलेली आहे. त्यामुळे मराठा बटालियनच्या प्रमुखांनी



दगडुशेठ गणपतीची प्रतिकृती असणा-या मूतीर्ची प्रतिष्ठापना सिमेवरील लष्कराच्या पोस्टमध्ये करण्याची इच्छा सैनिकांच्या वतीने व्यक्त केली. ती मूर्ती श्रीमंत दगडुशेठ गणपतीच्या मूर्तीप्रमाणे असावी, अशी त्यांची मनोमन भावना होती. त्याप्रमाणे ट्रस्टकडे विनंती करणारे पत्र पाठविले होते. सलग 15 वर्षे हा उपक्रम सुरु असून बटालियनच्या संख्येत देखील वाढ होत आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, मराठा बटालियन दरवर्षी गणेशोत्सव मोठया उत्साहात साजरी करते. त्यामुळे श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या प्रतिकात्मक गणेश मूतीर्ची स्थापना अनेक वर्षांपासून देशाच्या विविध सीमावर्ती भागात केली जाते. यंदा ट्रस्टतर्फे लष्करातील मराठा बटालियनला देण्यात आल्या आहेत.

सन 2011 पासून मराठा बटालियन आणि दगडूशेठ गणपती ट्रस्टचे जवळचे संबंध आहेत. सिमेवरील भारतीय लष्करी ठाण्यामध्ये गणेशाची मूर्ती स्थापन केल्याने सैनिकांना वेगळी उर्जा मिळते. तसेच या ठिकाणी देशामधील सर्व राज्यांतील सैनिक कार्यरत असतात. त्यामुळे बाप्पाचा आशीर्वाद सर्व सैनिकांना मिळेल, अशी भावना देखील सैनिकांनी व्यक्त केली आहे.

## समाजाला योग्य दिशा देणारे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी



अश्विनी डकरे
मो. ९९७५८४४६३८

यादवराजांच्या कारकीर्दीत, बाराव्या शतकात, महाराष्ट्रात महानुभाव पंथ उदयास आला. सामान्यांना त्यांच्या भाषेत मोक्षमार्ग सुलभ करून सांगणारे जैन, नाथ, लिंगायत, आदी पंथ यापूर्वीच प्रस्थापित झाले होते. या काळात कर्मकांडाचे प्रस्थ वाढून सकाम भक्तीचे बंड माजले होत. सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या महानुभाव पंथाने जातिनिरपेक्षतेचा आणि अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केला.

महानुभाव या नावने हा पंथ जरी आज ओळखला जात असला, तरी त्याची महात्मा, अच्युत, जयकृष्णी, भटमार्ग, परमार्ग अशी अन्य नावेही आहेत. गुजराततेत अच्युत पंथ व पंजाबात जयकृष्णी पंथ ही नावे लोकप्रिय आहेत. ही दोन्ही श्रीकृष्णभक्तीचा द्योतक आहेत. या पंथातील अनुयायी परस्परांस ह्यमहात्मा म्हणत. भटमार्ग हे नाव पंथसंस्थापक चक्रधरांचा पट्टशिष्य नागदेव किंवा भटोबास याच्या नावावरून आलेले आहे.

चक्रधरोक्त सिद्धान्तसूत्र पाठाप्रमाणेच गीता हा या पंथाचा प्रमुख धर्मग्रंथ असून श्रीकृष्णलीलावर्णन करणारे भागवत ते प्रमाण मानतात. कृतयागात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृष्ण आणि कलियुगात चक्रधर असे चार अवतार त्यांच्या मते असून त्यांचा दत्त हा एकमुखी होय. द्वारकाधीश कृष्ण, दत्तात्रय, द्वारावतीचे चांगदेव राऊळ, ऋद्धिपूरचे गोविंदप्रभू आणि प्रतिष्ठानचे चक्रधर असे कृष्णाचे पाच अवतार ते मानतात. त्यापैकी दत्तात्रय, श्रीकृष्ण चक्रधर हे उभयदृश्य पूर्णावतार होत.

जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर ही अनादि व अनंत मूळ चार तत्त्वे असून परमेश्वर नेहमी मनुष्यरूप धारण करून अवतार घेतो. मनुष्यरूपानेच प्राणिमात्रांचे उद्धरण परमेश्वरास करता येईल, अशी त्यांची श्रद्धा आहे. प्रपंच हा अनित्य असून अनादि अविद्यायुक्त जीव बद्धमुक्त, देवता नित्यबद्ध आणि परमेश्वर हा नित्यमुक्त आहे; जीव अनंत असून परमेश्वराचे अवतारही अनंत आहेत. जीवेश्वराचा संबंध हा स्वामिभृत्यासारखा आहे, असे ते मानतात. या दृष्टीने हा पंथ द्वैती असून आत्मा आणि परमात्मा वेगळे मानणारा आहे.

अविद्येपासून मुक्त होऊन ईश्वरस्वरूपाचा आनंद भोगण्याची पात्रता जीवाच्या ठिकाणी असल्याने महानुभवांनी जीवास बद्धमुक्त मानले आहे. प्रपंचाचे स्वरूप अष्टभैरवस्थित पंचमहाभूते व त्रिगुण यांच्यापासून निर्माण झालेली सृष्टी असे असून त्याचे कारण प्रपंच व कार्य प्रपंच असे दोन भाग केले आहेत. कारण प्रपंच हा अनादि अनंत म्हणूनच नित्य आहे. कार्यरूप प्रपंच हा व्यक्त आणि अनित्य होय. तर्कतीर्थलक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, प्रपंचु संहारे असे म्हटले असल्यामुळे प्रपंच अनित्य वर्गातला आहे, यात शंका राहत नाही. अविद्या अनादि मानली तरी ती नित्य असली पाहिजे, असे अनुमान करण्याचे कारण नाही. कारण अविद्या व कार्य-अविद्या मोक्षस्थितीत संपूर्ण नाश पावतात, असे गौतम बुद्ध व शंकराचार्य यांचे मत आहे, तेच चक्रधर स्वामींनी मान्य केले आहे

देवतांचे नऊ थोवे महानुभावीयांनी कल्पिले असून त्यांची प्रत्येक ब्रह्मांडातील संख्या एक्क्याऐंशी कोटी सव्वा लक्ष दहा इतकी आहे, असे ते समजतात. त्या नित्यबद्ध, भावरूप पण अव्यक्त आणि ज्ञान, सुख, ऐश्वर्य, प्रकाश व सामर्थ्य यांनी युक्त असल्या, तरी परमेश्वरूप नव्हेत. देवतांचे मुख्य कार्य सृष्टीतील जीवांना त्यांच्या कर्मांची सुखदुःखात्मक फळे देणे हे आहे, अशी त्यांची धारणा असते. अद्वैत वेदान्तामध्ये ब्रह्मस्वरूप हे अंतिम सत्य व ईश्वर हे ब्रह्माचे सोपाधिक म्हणजे गौण स्वरूप मानले आहे.

महानुभाव तत्त्वज्ञानानुसार परमेश्वराचे (१) अवतरदृश्यावतार, (२) परदृश्यावतार, (३) उभयदृश्यावतार असे तीन प्रकारचे अवतार आहेत. परमेश्वर नित्यमुक्त असल्याने तोच जीवाचा उद्धार करू शकतो. त्या त्या युगातील देहधारी जीव साकार परमेश्वराच्या सन्निधानाने आपला उद्धार करून घेतात. मात्र जीवाचे उद्धरण म्हणजे अद्वैत्यांची मुक्ती नव्हे. मुक्तीनंतरही जीवाचे अस्तित्व टिकून राहते. ईश्वराकडून शब्दज्ञान झाले, तरी मोक्षमार्गाने जाण्यासाठी अनुसरणाच्या मार्गाचा अवलंब करून वयाच्या छप्पन्नाव्या वर्षापूर्वी सर्वेंद्रिये कार्यक्षम असताना संन्यास घेणे आवश्यक आहे. संन्यास घेऊन परमेश्वराला अनुसरल्यानंतर देहान्तापर्यंत साधकाला असती-परी आचरावी लागते. महानुभावांचे उपदेशी आणि संन्यासी असे दोन वर्ग असून उपदेशी वर्ग लौकिक जीवनात चातुर्वर्ण्य पाळतो. संन्यासदीक्षेनंतर मात्र जातिनिर्बंध पाळण्याची आवश्यकता नाही.

महानुभाव पंथाने प्रस्थापित आचारधर्मावर प्रहार करून एक नवा विचारप्रवाह निर्माण केला. चक्रधरांनी गीतेवरील भाष्याच्या स्वरूपात पारंपरिक पद्धतीने आपले विचार न मांडता स्वतंत्रपणे मांडले. श्रीकृष्ण हा पूर्णावतार मानून त्यांनी पंचकृष्णांखेरीज अन्य देवता क्षुद्र मानल्या. स्त्रीशूद्रादिकांना संन्यासाचा अधिकार देऊन मोक्षमार्ग सवार्साठी त्यांनी खुला केला. पंथीय तत्त्वविचार लोकभाषेत, मराठीत मांडले मराठी वाङ्मय समृद्ध झाले; परंतु सामान्यांच्या बौद्धिक पातळीचा विचार न करता या पंथातील संस्कृतज्ञ ग्रंथकारांनी लेखन केल्यामुळे त्याच्या प्रसारास मयार्दा पडल्या. महानुभव पंथाच्या वैदिक वा अवैदिक स्वरूपाबाबत वाद आहे. तो वेदानुयायी किंवा वेदविरोधी दोन्ही नसून त्याचे स्वतंत्र रूप आहे. असेही काही मानतात. त्यांचे वेदविरोधकत्व सांगताना (१) वेद हे कर्मरहाटीचे शास्त्र म्हणून त्याज्य आहे, हे चक्रधरांचे मत, (२) देवतांची उपसना परमेश्वरप्राप्तीच्या दृष्टीने अप्रमाण, (३) चक्रधर वचने हीच महानुभवांची श्रुती असून वेदवचने ते प्रमाण मानीत नाहीत करणारा म्हणून राहिले. व्यक्तीचे श्रेष्ठत्व जन्माने नव्हे, तर त्याच्यातील तत्त्वज्ञानातून ठरते, असे सांगणारा महानुभाव हा एकच पंथ असून, येथे सर्व माणसे समान आहेत.

## बैलपोळा कर या सणाच्या दिवशी दोनच जोड्यांनी जपला संस्कृतीचा मान

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - तालुक्यातील रिठद येथील दरवर्षी प्रमाणे यंदाही परंपरेनुसार बैलपोळ्याची कर साजरी करतात.

त्या प्रथेप्रमाणे दि. २३ आ?गष्ट रोजी दुपारी १२ वा.चे दरम्यान गावातील जेष्ठ व तरुण भजनी मंडळींनी श्री मुर्डेश्वर भगवान यांचा चांदीचा मुखवटा पालखीमध्ये बसऊन हनुमान मंदिराजवळून संपूर्ण गावाला दिंडितील वारकऱ्यांनी प्रदक्षिणा घालून मुर्डेश्वर भगवान यांचे मंदिराकडे जात असते या भगवान मुर्डेश्वराच्या पालखी मागे परंपरा जपत गावातील एक बैलजोडी पंकज गजानन ठोकळ व बेलखेडा येथील संतोष देव्हडे बैलजोडी घेऊन आलेले शेतकरीच या परंपरेला साजेसा मान देत दिंडीची आणी श्री भगवान मुर्डेश्वराच्या पालखीची शोभा वाढवली व परंपरा जपली इतर गावातील अनेक बैलजोड्या ह्या डिजे वाजणाऱ्या गाडीच्या मागे होत्या नेण्यात आल्या. परंतू परंपरेनुसार दोनच बैलजोडी मालकांनी परंपरेचे भान ठेऊन नारायण आरु व डॉ. केशव बोरकर यांनी बैलजोडी मालकाचा परंपरा कायम ठेवल्याने रुमाल व टोपी देऊन सन्मान केल्या त्यामुळे श्री मुर्डेश्वर भगवान मंदिराच्या समोरच हा सन्मान करण्यात आला. याबद्दल उपस्थितीत नागरीकांनी बैलजोडी मालकाचे परंपरा कायम ठेवल्याने कौतुक केले.



# वाशिम जिल्ह्यात जेव्हा आदेश धाब्यावर मग लोकशाहीचा अर्थ काय?

## सिईओ अर्पित चौहान आणि तालुका कृषी अधिकारी जावळे यांची मुजोरी शिगेला






**वाशीम** - जिल्ह्यातील दोन घटना आज प्रशासनाच्या ढिसाळपणाची, अधिकाऱ्यांच्या मनमानीची आणि न्यायव्यवस्थेच्या उपहासाची साक्ष देत आहेत. पहिली घटना - जिल्हा परिषदेतील सीईओ अर्पित चौहान यांनी आपल्या दालनातून छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आबेडकर आणि महात्मा फुले यांचे फोटो काढून टाकले. पालकमंत्र्यांनी 'फोटो तातडीने लावा' असा आदेश दिला तरी त्याला उघडपणे फाटा देत 'मी का लावावे?' अशी मुजोरी दाखवली. दुसरी घटना तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे यांच्या विरुद्ध ग्राहक आयोगाने दोन लाख रुपयांच्या सानुग्रह अनुदान प्रकरणी दिलेला आदेश न पाळल्याने, अखेर त्यांच्यावर जामिनपात्र आणि नंतर थेट गैर जामिनपात्र वॉरंट निघाले.




### आदेश हा आदेश राहिला नाही

महापुरुषांचे फोटो लावणे हा केवळ शासकीय आदेश नाही, तर समाजाच्या आत्म्याचा सन्मान आहे. तो आदेश न पाळणारा अधिकारी केवळ अहंकारीच नाही तर तो लोकशाही व्यवस्थेला चपराक मारतो. अगदी तसेच - ग्राहक आयोगाने दिलेला आदेश अंमलात आणण्याऐवजी जवळपास नऊ महिने अर्जदाराला दारात फिरवून ठेवणे, हा शेतकऱ्यांचा अपमान आहे. न्यायालयीन आदेश पाळण्याऐवजी तोडगा काढण्याचे टोलवा टोलवी धोरण ही थेट जनतेच्या विश्वासघाताची पायरी आहे.

**लोकशाहीत मंत्री जर निरुपयोगी, आदेश जर कागदोपत्री, आणि अधिकारीच जर मनमानी करीत असतील - तर त्या व्यवस्थेत सामान्य माणसाचा काय?**

आज समाज दोन प्रश्न विचारतो आहे -

- 'महापुरुषांच्या प्रतिमांचा अपमान सहन करावा का?'
- 'आयोगाचे आदेश पाळले नाहीत, तर अधिकारी किती मोठा?

'यांची उत्तरे जर शासनाकडे नसतील, तर जनतेने रस्त्यावर उतरून ती आंदोलनातून द्यावी लागतील. कारण, लोकशाही टिकवायची असेल तर मुजोर अधिकाऱ्यांना वठणीवर आणणे हेच आता एकमेव औषध आहे.

### शासन, मंत्री आणि प्रशासन - सगळे हतबल?

प्रश्न असा आहे की, पालकमंत्र्यांचा आदेशही अधिकारी पायदळी तुडवतो आणि आयोगाचा आदेशही कृषी अधिकारी जुमानत नाही, तर मग जनतेने विश्वास कुणावर ठेवायचा? शेतकऱ्याला अनुदान द्यायचे की नाही, हे अधिकारी ठरवतात. समाजाचे प्रेरणास्थान असलेल्या महापुरुषांचे फोटो ठेवायचे की नाही, हेही अधिकारी ठरवतात. मग शासन, लोक प्रतिनिधी आणि न्यायसंस्था केवळ बघ्याची भूमिका का घेत आहेत?

### मुजोरीला खतपाणी

कर्तव्यदक्ष अधिकारी जे प्रामाणिकपणे काम करतात, त्यांची बदली केली जाते; पण मुजोर आणि आदेश न पाळणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रश्रय दिला जातो. त्यामुळेच त्यांची मुजोरी वाढते. शेतकऱ्याला दोन लाख रुपयांचा हक्काचा लाभ द्यायचा नाही, महामानवांचे फोटो ठेवायचे नाहीत - हीच मानसिकता प्रशासनात रेंगाळली आहे. ही वृत्तीच आज लोकशाहीला गळा घोटत आहे.

### लोकशाही कुणासाठी?

आदेश पाळले नाहीत तर सर्वसामान्य नागरिक तुरुंगात जातो. पण अधिकारी? त्यांच्यासाठी कायदा थांबतो, विलंब होतो, दंड माफ होतो. ही दुहेरी तळी संपवली नाहीत, तर लोकांचा न्यायावरचा विश्वास उरणार नाही. ग्राहक आयोगाने जावळे यांच्यावर गैर जामिनपात्र वॉरंट काढून योग्य दिशा दाखवली आहे. हाच धडा महापुरुषांच्या फोटोंच्या अपमान करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही शिकवला गेला पाहिजे.

**धारेवर ठेवलेच पाहिजे, नाहीतर अन्याय डोक्यावरच नाचेल.'**

## फिट इंडिया मोहीम व 'ड्रग्ज फ्री वाशिम' संकल्पनेतून जिल्हा पोलीस दलातर्फे सायक्लोथॉनचे भव्य आयोजन

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - जिल्हा पोलीस दलाच्यावतीने 'फिट इंडिया मोहीम' व 'ड्रग्ज फ्री वाशिम' या संकल्पनेतून आज (दि. २३ ऑगस्ट) सकाळी १० कि.मी. सायकल स्पर्धा व ५० कि.मी. सायक्लोथॉन स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, परीवेक्षाधीन घेंए आकाश वर्मा यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. वाशिम शहरातील सायकल पटूंसोबत बाकलीवाल विद्यालय, राजस्थान आर्य कॉलेज, शिवाजी महाविद्यालय, एनसीसी कॅडेट्स तसेच जेष्ठ नागरिक यांचा उत्साहवर्धक सहभाग दिसून आला. एकूण ५०० ते ६०० हून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. पोलीस मुख्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक - पाटणी चौक - रिसोड नाका - लाखाळा - जांभरण नावजी - परत पोलीस मुख्यालय असा होता. तर ५० कि.मी. सायक्लोथॉनचा मार्ग वाशिम , लाखाळा, जांभरण नावजी अडोळी फाटा , रिठद ,आसेगाव पेन परत वाशिम असा ठेवण्यात आला. ५० कि.मी. सायक्लोथॉन प्रथम राजेश जाधव ,द्वितीय रोशन राठोड, तृतीय - नारायण व्यास, १० कि.मी. सायकल स्पर्धा, प्रथम - विजय प्रल्हाद पारीसकर, द्वितीय - योगेश संतोष शेळके, तृतीय नारायण रामदास आढाव, शालेय विद्यार्थी गट प्रथम सार्थक व्यवहारे, द्वितीय रुद्राक्ष कैलास रन्नोरे, तृतीय सिद्धेश्वर गजानन दांदळे, प्रोत्साहन प्रद्युम्न संतोष शेळके,ज्येष्ठ नागरिक गट गोविंद रामजी व्यवहारे, एनसीसी कॅडेट गट प्रथम ओमीका आंगले, द्वितीय - वेदिका धामणकर, तृतीय मनिषा भालेराव सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी



सर्वांना बिस्कीट, पाणी, फळे व नाश्ता पुरविण्यात आला. जिल्हा पोलीस दलाच्या या उपक्रमामुळे युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती झाली व 'ड्रग्ज फ्री वाशिम' हा संदेश प्रभावीपणे पोहोचला. या उपक्रमाचे यश जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली साध्य झाले. आयोजनात अपर पोलीस अधीक्षक लता फड, पो.उप.अधी. (गृह) प्रवीण खंडारे, पो.नि. प्रदीप परदेशी, राखीव पो.नि. शशिकांत वर्मा, पो.उप.नि. प्रल्हाद पडधान, तसेच पोलीस मुख्यालय व कल्याण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी विशेष परिश्रम घेतले. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पो.नि. संतोष शेळके व पोलीस वाहतूक शाखेचे पथक सक्रिय होते. कार्यक्रमासाठी सायकल डिलर चेतन शर्मा यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमाबद्दल नागरिकां कडून जिल्हा पोलीस दलाचे कौतुक होत असून, फिटनेस सोबतच व्यसन मुक्तीचा संदेश जन मानसात पोहोचविण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याची भावना व्यक्त होत आहे.

## नदीच्या महापुरात अपंग व्यक्तीचा थरारक अनुभव

### ग्रामपंचायतचे लाईफ जॅकेट शिपाईकडेच, मदती अभावी जीव धोक्यात!

▶ प्रदिप देशमुख ▶

**रिसोड** - तालुक्यातील गोहगाव हाडे या गावात पैनगंगा, विद्रूपा नदीला महापूर आल्याने ग्रामस्थांचे हाल होत आहेत. गाव चारही बाजूंनी नदीने वेढलेले असल्याने पावसाळ्यात गाव पूर्णपणे बंदिस्त होते. रुग्णांना वेळेत दवाखान्यात नेणेही अशक्य होते. यंदाच्या अतिवृष्टीने परिस्थिती अधिक गंभीर झाली असून, गावातील सुरेश हाडे (अपंग व्यक्ती) यांचा जीव अक्षरशः धोक्यात आला.

१७ ऑगस्ट रोजी अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना दवाखान्यात नेणे गरजेचे झाले. शुगर व बीपीचा त्रास असल्याने त्यांनी तलाठ्याला, आरोग्य विभागाला व मित्रांना मदतीसाठी फोन केला, मात्र काहीही मदत न मिळाल्याने त्यांनी जीवाचा धोका पत्करून नदी ओलांडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नदीच्या प्रचंड प्रवाहात ते वाहून जात असतानाच झाडाला फासासारख्या एका फांदीला ते अडकले आणि थोडक्यात त्यांचे प्राण वाचले.





### ग्रामपंचायतचे लाईफ जॅकेट पण वापरास अपात्र?

गावातील आपत्कालीन परिस्थितीसाठी शासनाने दिलेले लाईफ जॅकेट 'आपदा मित्र' शिपाईकडे घरात ठेवलेले होते. मात्र अपंग व्यक्तीच्या आरोपानुसार 'मी वारंवार तलाठ्यांना मदतीसाठी फोन करूनही जॅकेट उपलब्ध करून दिले नाही. उलट शिपाई म्हणाला की हे जॅकेट माझ्या प्रशिक्षणासाठी आहे, मी ते इतरांना वापरू देऊ शकत नाही. शासनाने मला मानधनही दिलेले नाही. त्यामुळे मी ते कुणालाही देणार नाही.' यावर गावकऱ्यांचा संताप व्यक्त होत असून, 'जर अपंग व्यक्तीचा जीव गेला असता तर जबाबदार कोण?' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### अपंग व्यक्तीचे आरोप

रुग्ण सुरेश हाडे यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात तलाठी व शिपाईवर गंभीर आरोप केले आहेत वारंवार फोन करूनही मदत न मिळाल्याने नदीत उतरावे लागले. जॅकेट असूनही ते वापरू दिले गेले नाही. तलाठी व शिपाई संगनमत करून जबाबदारी टाळत आहेत. तहसीलदार कार्यालयात संपर्क साधल्यावरही योग्य प्रतिसाद मिळाला नाही.

### कुटुंबाचा संताप

या घटनेनंतर संतापाची लाट उसळली आहे. 'आपत्ती व्यवस्थापना साठी शासनाने साधने उपलब्ध करून दिली तरी ती योग्य वेळी नागरिकांना मिळत नाहीत. त्यामुळे अपंग, रुग्ण, महिला, वृद्ध यांचे जीव धोक्यात येत आहेत. शासनाने यावर चौकशी करून दोषींवर कारवाई करावी' अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संपूर्ण प्रकारात तलाठी, ग्रामपंचायत शिपाई तसेच स्थानिक प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, जर वेळीच मदत मिळाली असती तर अपंग व्यक्तीला जीवाचा धोका पत्करावा लागला नसता, असे गावकऱ्यांचे ठाम मत आहे.

## जिल्हा परिषद गटातील बदल ; विभागीय आयुक्तांचे आदेश कायम, उच्च न्यायालयाकडून रिट पिटीशन फेटाळली

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गट व गणांच्या पुनर्रचनेबाबत दाखल आक्षेपांवर विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिलेल्या आदेशानुसार काही गावांचा समावेश बदलण्यात आला आहे. या आदेशाला आव्हान देत दाखल करण्यात आलेली रिट पिटीशन माननीय उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने दिनांक २२ ऑगस्ट रोजी फेटाळली असून आयुक्तांचा आदेश कायम ठेवला आहे.




### झालेले बदल

जऊळका सर्कल मधील उडी, धमधमी, आवरदरी ही गावे कमी करून किन्हीराजा सर्कल मध्ये समाविष्ट. किन्हीराजा सर्कल मधील मैराळडोह हे गाव कमी करून जऊळका सर्कल मध्ये समाविष्ट. जऊळका सर्कल मधील खडकी ईझारा व पांगरी धनकुटे ही गावे कमी करून अमाणी सर्कल मध्ये समाविष्ट. ब्राम्हणवाडा सर्कल मधील जामखेड हे गाव कमी करून जऊळका सर्कल मध्ये समाविष्ट. पांगरी नवघरे सर्कल मधील मसला खुर्द हे गाव कमी करून ब्राम्हणवाडा सर्कल मध्ये समाविष्ट.

### आक्षेप आणि सुनावणी

या बदलांसंदर्भात मालेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे अभ्यासू, तरुण व तडफदार संचालक तसेच वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा प्रवक्ता संदीप सावळे यांनी शासन निर्णयातील नियम दाखवून, पुरावे व आवश्यक कागदपत्रांसह आक्षेप दाखल केले होते. त्यावर ४ ऑगस्ट २०२५ रोजी विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान ॲड. संतोष पोफळे आणि आक्षेपकर्ता सावळे यांनी जोरदार युक्तिवाद सादर केला. त्यातील काही आक्षेप मान्य करत विभागीय आयुक्तांनी गावांच्या फेरबदलाचे आदेश दिले आणि एकूण ४ जिल्हा परिषद गटांमध्ये सुधारित बदल करण्याचे निर्देश दिले.

**जऊळका, किन्हीराजा, अमाणी व ब्राम्हणवाडा सर्कलमध्ये गावांचा फेरबदल**

संदीप सावळे यांचा आक्षेप मान्य, आयुक्तांचे आदेश कायम
दिलीप जाधव यांची रिट उच्च न्यायालयाने फेटाळली
गावबदलामुळे उमेदवारांना वाढलेले राजकीय आव्हान
मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नेत्यांना घ्यावे लागणार अधिक परिश्रम

### न्यायालयीन घडामोडी

आयुक्तांच्या या आदेशामुळे व्यथित झालेल्या मालेगाव तालुक्यातील दिलीप रामभाऊ जाधव यांच्यासह काही संभाव्य उमेदवारांनी उच्च न्यायालय, नागपूर येथे रिट पिटीशन दाखल केली होती. मात्र, २२ ऑगस्ट रोजी न्यायालयाने ती पिटीशन फेटाळून लावत आयुक्तांचा आदेश कायम ठेवला.



### पुढील राजकीय समीकरणे

या आदेशानंतर काही गावे एका गटातून दुसऱ्या गटात गेल्याने आगामी निवडणुकीतील राजकीय गणित मोठ्या प्रमाणात बदलणार आहे. संभाव्य उमेदवारांना आता मतदारांची मन धरणी करण्यासाठी, आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी आणि विजय निश्चित करण्यासाठी अधिक परिश्रम घ्यावे लागणार आहेत. आता मतदारसंघाचे गणित बदलणार आहे एवढी मात्र निश्चित!

## तालुका कृषी अधिकाऱ्यांविरुद्ध गैरजामिनपात्र वॉरंट

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने तालुका कृषी अधिकारी अतुल सुभाष जावळे यांच्याविरुद्ध जामिनपात्र आणि त्यानंतर गैरजामिनपात्र वॉरंट काढले आहे. मूळ तक्रारदार भारत नरसिंग चव्हाण यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत दोन लाख रुपये, व्याज व इतर भरपाई रक्कम देण्याचे आदेश आयोगाने पूर्वी दिले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्राहक आयोगाने २ एप्रिल २०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार, तक्रारदार भारत चव्हाण यांना दोन लाख रुपये अनुदान, त्यावर नऊ टक्के व्याज, तेरा हजार रुपयांची नुकसानभरपाई व तक्रारीचा खर्च ४५ दिवसांच्या आत अदा करण्याचे निर्देश तालुका कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. मात्र आदेशानंतर जवळपास नऊ महिने उलटूनही सदर रक्कम अर्जदारास देण्यात आलेली नाही. त्यानंतर तक्रारदाराने ?ड. पवनकुमार भन्साळी यांच्या माध्यमातून आयोगात दरखास्त अर्ज दाखल केला. पण संबंधित अधिकारी आयोगासमोर नियोजित तारखांना हजर झाले नसल्याने आयोगाने ९ जुलै २०२५ रोजी जामिनपात्र वॉरंट जारी करून त्यांना




### सानुग्रह अनुदान प्रकरण भोवले

१६ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हजर राहण्याचे आदेश दिले होते. तसेच ५ हजार रुपयांच्या जामिनावर त्यांना मुक्त ठेवण्याची अट ठेवण्यात आली होती. त्यानंतर तालुका अधिकारी अतुल जावळे यांनी अनुदान, त्यावर टक्के व्याज, नुकसान भरपाई व तक्रारीचा खर्च ३ दिवसांच्या आत अदा करण्याचे सांगितले त्यावर आयोगाने त्यांना १ महिन्याची मुदत देऊनही त्यांनी आदेशाचे पालन केले नसल्याने आयोगाने २० ऑगस्ट २०२५ रोजी गैरजामिनपात्र वॉरंट काढले. यानुसार पोलिस अधिक्षक वाशिम यांना निर्देश देण्यात आले असून, संबंधित अधिकारी यांना अटक करून ११ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्राहक तक्रार निवारण आयोगासमोर हजर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या प्रकरणामुळे शेतकरी व ग्राहक वर्तुळात मोठी चर्चा सुरु झाली असून, आदेशानंतर देखील शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. आयोगाचे आदेश असूनही लाभार्थ्याला हक्काची रक्कम मिळाली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# ‘गिरा तो भी टांग उपर’ !

एप्रिल महिन्यात सुरू झालेला उध्दव आणि राज ठाकरे या दोन्ही भावांमधील ‘युती’बाबत सुरू असलेला 'खो-खो'चा खेळ अखेर उध्दव ठाकरेंच्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर संपला. तब्बल १९ वर्षांनी राज हे मातोश्रीची पायरी चढले; आणि अखेर, एकदाचे 'गंगेत घोडे न्हाले' असे म्हणत, दोन्ही पक्षांतील उत्साही कार्यकर्त्यांनी सुटकेचा दीर्घ श्वास सोडला. 'अतिविद्वान' विश्वप्रवक्त्यांची तर, 'किती सांगू मी सांगू कुणाला, आज आनंदी आनंद झाला', अशी स्थिती झाली. (अर्थात, आनंद मनापासून होता की, 'दिखाऊ'? हे त्यांनाच ठाऊक) आनंदाच्या भरात ते 'अर्ध्या हळकुंडाने इतके पिवळे' झाले की, त्यांनी लगेच, युतीची घोषणा करत 'आता महाराष्ट्रातील कोणतीही 'अघोरी' शक्ती मराठी माणसाला थांबवू शकणार नाही' अशी भीमगर्जना केली. तसेच, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, नाशिक, संभाजीनगर या महापालिकांत आता भगवाच फडकणार, असेही 'छातीठोकपणे'(?) जाहीर करून टाकले. (अर्थात, काही दिवसांतच आपल्यावर नेहमीप्रमाणे छाती बडविण्याची वेळ येईल, याची कल्पना त्यांना होती की नव्हती, हे त्यांचे त्यांनाच माहीत)- एचएमव्ही पत्रकारांनी 'आता महाराष्ट्र थांबणार नाही', 'महाराष्ट्राच्या राजकारणाचे चित्र बदलणार', असे ढोल वाजवण्यास सुरुवात केली. तर, बटीक झालेल्या वृत्तवाहिन्यांनी 'ठाकरे ब्रॅण्ड' या विषयावर 'स्पेशल रिपोर्ट' आणि 'चर्चां'च्या कार्यक्रमांचा 'धुरळा'च उडवून दिला. याच दरम्यान, मुंबईच्या 'बेस्ट' पतपेढीची निवडणूक लागली. गेली ९ वर्षे येथे उध्दव ठाकरे यांची सत्ता होती. 'युती'ची सुरुवात याच निवडणुकीपासून करण्याचे ठरले. 'ठाकरे ब्रॅण्ड' या ठसठशीत नावाचे पोस्टर आणि बॅनर्स लावून वातावरण निर्मिती करण्यात आली. आजपर्यंत कोणालाही माहीत नसलेली 'बेस्ट पतपेढी' मुंबईच्याच नव्हे तर, बहुधा राज्याच्या शेवटच्या माणसाला माहीत झाली.

अखेर, सोमवारी (दि. १८) मतदान पार पडले. दुस-याच दिवशी म्हणजे, मंगळवारी सकाळी मतमोजणी सुरू होणार होती. परंतु, मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसाने मतमोजणी सुरू होऊ शकली नाही. रात्री उशिराने मतमोजणी होऊन निकाल समोर आले. शशांक राव यांच्या पॅनलला १४, प्रवीण दरेकर यांना ७ तर बहुचर्चित ठाकरे ब्रँडच्या आदर्श (?) पॅनलच्या हाती 'भोपळा' पडला. सदरचे निकाल हे अनेकांना 'धक्कादायक' वाटत असले तरी, अपेक्षित असेच लागले, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कारण, बाळासाहेबांच्या निधनानंतर 'ठाकरे ब्रँड'ची जादू कमी झाली होती. नंतर, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उध्दव ठाकरे हे, स्वतःच्या आणि मुलाच्या स्वार्थासाठी बापाच्या 'स्वाभिमानी' विचारांना तिलांजली देत आणि जनादेशावर दिवसाढवळ्या दरोडा टाकून 'बारामती'च्या 'करामती' काकाच्या मांडीवर जाऊन बसले, तेव्हाच 'ठाकरे ब्रॅण्ड'चा अंत झाला होता. तसा संकेतही मराठी माणसाने विधानसभा निवडणुकीत त्यांना घरी बसवून दिला होता. पण, 'त' म्हणजे 'तपेले' हे कळण्या इतकी बुद्धी ज्याच्याकडे नसेल त्याला ते कसे कळेल? आणि त्याला आपणही काही करू शकत नाही, असो.

खरा कसोटी सामना तर अजून दूरच होता. परंतु, 'टी-२०' सामन्यात आणि तीही पहिल्याच चेंडूत शुन्यावर विकेट पडली. मुहूर्तालाच 'अपशकून' झाल्याने, दोन्ही पक्षांच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरून सन्नाटा पसरला. एचएमव्ही पत्रकार, नेते, पदाधिकारी यांनी 'मिठाच्या गुळण्या' धरल्या. तर, बटीक झालेल्या वृत्तवाहिन्यांनी निवडणुकीबाबत 'ब्र' शब्दही न काढत, दिवस-रात्र मुंबईच्या पावसाच्या बातम्या चालविण्यात धन्यता मानली.

हाच निकाल जर उलटा लागला असता तर, सामनात 'धो डाला', 'उखाड दिया', 'नाद करायचा नाय', 'आता लक्ष्य विधानसभा आणि लोकसभा' अशा मथळ्यांखाली रकान्याचे रकाने भरून लेख प्रसिद्ध झाले असते. बटीक वृत्तवाहिन्यांनी दूरदर्शनच्या पडद्याला तडा जाईपर्यंत बातम्या आणि चर्चासत्रांचे 'फड' रंगवले असते.

'निवडणूक' आणि 'खेळ' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्हीमध्येही एकाचा पराभव आणि एकाचा विजय ठरलेला असतो. खेळात झालेला पराभव जो खेळाडू खिलाडीवृत्तीने स्वीकारतो, तोच खरा स्पोर्टस्मन असतो. तसेच, राजकारणातही जो नेता हसतहसत पराभव मान्य करून, आत्मपरिक्षण करतो तो खरा पुढारी समजला जातो. काही वर्षांपूर्वी उमेदवार प्रचार करताना एकमेकांवर टीका-टिप्पणी करायचे. पण, त्याला एक दर्जा असायचा. 'शालीतून जोडे मारणे' अशी उपमा त्यावेळी दिली जायची. पराभूत झालेला उमेदवार सर्व काही विसरुन विजयी उमेदवाराचे अभिनंदनही करत असे. काही प्रसंगी तर पराभूत उमेदवार विजयी उमेदवाराच्या मिरवणुकीत सहभागी झाल्याचे चित्रही बघायला मिळायचे.

परंतु, हळूहळू राजकारण बदलत गेले. अनेक गुन्हेगार आणि माफिया हे या क्षेत्रात आले; आणि राजकारणाचा चेहरामोहराच बदलला. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यामुळे 'अभद्र' युतीचे 'मविआ' सरकार पडले म्हणण्याऐवजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळले, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. जनतेच्या 'पाठीत खंजीर' खुपसत, मोठे 'अभद्र' प्रयत्न करून, ज्या 'अभद्र' कारभा-यांनी या 'अभद्र' सरकारला जन्म दिला होता, त्यांच्या 'अंगाचा तिळपापड' होऊन, त्यांच्या 'संतापाची आग तळपायातून मस्तकात' गेली; आणि त्या दिवसापासूनच महाराष्ट्रात 'सूड' व 'द्वेषा'चे राजकारण सुरू झाले. 'अंगावर आला तर कोथळा बाहेर काढील', 'माझ्या नादी लागला तर हात-पाय तोडून टाकील', 'आडवा आला तर २० फूट जमिनीत गाडील', 'मला बोटे दाखवले तर बोटे छाटून टाकेल' अशा एकमेकांना दिवसाढवळ्या विधानभवनात आणि बाहेर धमक्या दिल्या जाऊ लागल्या. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर', 'एकतर तू तरी राहशील नाहीतर मी' अशी टोकाची द्वेषपूर्ण आव्हाने दिली जाऊ लागली. खरे तर कायद्याने हा गंभीर गुन्हा आहे. पण, 'लोकप्रतिनिधी'(?) ना सर्व काही माफ असते. निवडून आले की यांना 'गुंडगिरी' करण्याचा एकप्रकारे 'परवाना'च मिळतो. त्यामुळे यांचे 'दबंग'गिरीचे असे वर्तन बघून, तुम्हा-आम्हाला 'लोकप्रतिनिधी की, गावगुंड'? या पडणा-या प्रश्नाला 'काडीचीही किंमत' नाही.

वाटले होते 'अपयश ही यशाची पहिली पायरी असते' असे मानून, या निवडणुकीतील पराभवाचा मोठ्या मनाने स्वीकार करून, काय आणि कोठे चुका झाल्यात? याचे आत्मपरीक्षण केले जाईल. पण, 'सरड्यालाही लाजवेल इतक्या जलदगतीने रंग बदलणा-या' संधीसाधू आणि पलटूराम कारभा-यांकडून 'मोठ्या मनाची' अपेक्षा ठेवणे म्हणजे 'कपाळमोक्ष करून' घेण्यासारखेच आहे. आदित्य ठाकरे यांनी याविषयी बोलताना, प्रश्नाला बगल देत 'तो मी नव्हेच'ची भूमिका घेतली. निकालाआधी 'आता भाजप पतपेढ्याही लुटायचे षडयंत्र रचत आहे. पण, आता ठाकरे बंधू एकत्र आल्याने ते शक्य होणार नाही' असे वक्तव्य करणा-या 'सकाळच्या भोंग्या'ने तर, 'मी दिल्लीत आहे, तुम्ही मला मुंबईचे प्रश्न विचारू नका. मला त्याबद्दल काहीही माहीत नाही', असा जवळजवळ हजारो किमीचा सोईनुसार 'यू टर्न' घेतला. सा-या विश्वात कोठेही साधे 'खुट्टं' वाजले तरी, 'माझ्याकडे खात्रीपूर्ण माहिती आहे', 'मला अमक्याचा फोन आला होता', 'मला तमक्याने भेटून माहिती दिली', ' आमचेही सगळीकडे सोर्स आहेत' असे नेहमीचे पालूपद वापरून, मोदी, शहा, शिंदे, फडणवीस आणि भाजपवर विषारी फुत्कार टाकणा-या या 'महाशयांना' या निवडणुकीच्या निकालाची माहिती नसावी? यावर शेंबडे पोरगं तरी विश्वास ठेवेल का? मनात आणले तर हे 'महाभाग' उद्या 'उबाठा' गट आणि 'ट्रम्पतात्या'च्या पक्षाचीही युती घडवून आणतील. म्हणून तर त्यांना 'विश्वप्रवक्ते' अशी सन्माननीय (?) पदवी बहाल केली आहे.

नेहमीप्रमाणेच पुन्हा एकदा ते तोंडावर आपटले आहेत. 'स्वतःच स्वतःच्या हाताने तोंड फोडून' घेतल्याचे ते कोणत्या 'तोंडा'ने सांगणार? म्हणून त्यांनी 'कानावर हात' ठेवले असावेत. त्यांची ही अडचण आम्ही समजू शकतो. उध्दव ठाकरे तर निकालानंतर कोठेच दिसले नाहीत. 'योग्य वेळ येऊ द्या', 'योग्य वेळी आनंदाची बातमी देईन' असे आधी हवेत अनेक 'कागदी' बाण मारले. आता पुन्हा एकदा मराठी माणसाने त्यांना त्यांची 'योग्य' जागा दाखवून दिल्याने त्यांना बहुधा तोंड दाखवायला 'तोंड'च राहिले नसावे. सर्वात कहर केला तो राज ठाकरेंनी. २ दिवसांपूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत 'विकासा'शिवाय इतर कोणतेही प्रश्न विचारू नका, अशी प्रथमच पत्रकारांना तंबी दिली. परंतु नंतर पत्रकारांनी 'बेस्ट'च्या निवडणुकीविषयी त्यांना प्रश्न विचारलाच. तेव्हा त्यांनी 'बेस्ट पतपेढी' काय आहे? असा पत्रकारांनाच प्रतिप्रश्न केला. यावरून, या निवडणुकीच्या युतीबद्दल मला काहीही माहीत नाही. किंवा, मला अंधारात ठेवले गेले. असे त्यांना म्हणायचे आहे का? क्षणभर आपण हे मान्य केले तर मग बाळा नांदगावकर या निवडणुकीत सक्रिय का होते? आणि होते तर मग तुमच्या आदेशाशिवाय होते का? हे प्रश्न उपस्थित होतात. या प्रश्नांना काय उत्तरं देणार?

रोज उठून स्वतःला 'अतिविद्वान' समजत, समोरच्याला शिव्या, शाप द्यायचे. चिथावणीखोर आणि प्रक्षोभक वक्तव्ये करून फेक नॅरेटिव्ह सेट करून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करायचा. एखाद्याच्या शरीराच्या व्यंगावरून खालच्या स्तरावरची टीका-टिप्पणी करायची. केवळ विरोध करायचा म्हणून, कृष्ण जयंतीला मांसाहार करायचा आणि फुकट वाटायचे. हेच का तुमचे हिंदूत्व? फडणविसांनी आम्हाला हे शिकवू नये, ते शिकवू नये, त्यांच्यापेक्षा आम्हाला जास्त कळते, अशा फुशारक्या मारून त्यांचा द्वेष करायचा. पण, 'डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवत' राजकारण करायचे असते, हे संयमी आणि सहनशील असलेल्या फडणविसांकडून शिकण्याची खरी गरज तुम्हाला आहे. तुम्ही आणि जरांगे कायम शिव्या देतात, पण ते प्रत्युत्तर देत नाहीत. आक्रस्ताळेपणा, आडनावाचा अहंकार, थयथयाट, शिव्या-शाप, पोपटपंची करून नव्हे तर, संयम राखत जनतेत मिसळून त्यांचे प्रश्न मार्गी लावले तरच जनता मत देईल, हे साधे सरळ गणित जोपर्यंत डोक्यात शिरणार नाही; आणि 'गिरा तो भी टांग उपर' ही 'अहंकारी' प्रवृत्ती सोडत नाही तोपर्यंत तुमची अधोगती थांबणार नाही, हे मात्र नक्की. झालेला पराभव मान्य करून आत्मपरीक्षण करण्याचा बोध अजूनही घेतला नाही तर, राजकारणातून बाहेर फेकल्या जाण्याचा दिवस जास्त लांब नाही, हे मात्र नक्की.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक**
**मोबाईल क्र. ८७६७५९२९८०**

# अर्बन फार्मिंग: शहरातून शेतीकडे नव्या वाटा

गावाकडील शेतातून धान्य, भाजीपाला, फळे शहरात येतात, हे नेहमीचे दृश्य आहे. पण आता काळ बदलतो आहे. शहरातच मातीच्या कुंडीत, छतावर किंवा मोकळ्या जागेत शेती उगवत आहे. यालाच अर्बन फार्मिंग म्हणतात. ही संकल्पना केवळ एक छंद नाही, तर शहरातील अन्नसुरक्षा, पर्यावरणीय संतुलन आणि निरोगी जीवनाशी जोडलेली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात अन्नधान्याची मागणी प्रचंड वाढली आहे, परंतु उपलब्ध जमीन मर्यादित आहे. त्यामुळे शहरातच शेती करणे हा उपाय म्हणून पुढे आला आहे. आज मुंबई, पुणे, बंगलोर, दिल्ली अशा अनेक शहरांमध्ये छतावरील शेती किंवा टेरेस गार्डनिंग मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहे. फक्त मोकळ्या जागेची गरज नाही, तर कुंड्या, ड्रम, पाईप, अगदी प्लास्टिकच्या बाटल्यांमध्येही भाज्या-फळे उगवता येतात. टोमॅटो, मिरची, वांगी, कारले, पालक, मेथी, कोथिंबीर यांसारखी पिके घरातच उगवली तर त्याचा फायदा केवळ घरगुती स्वयंपाकापुरता होत नाही, तर त्यातून मिळणारा ताजा व विषमुक्त अन्नसाठा आरोग्यासाठी वरदान ठरतो.

अर्बन फार्मिंगमुळे शहरातील पर्यावरणालाही मोठा फायदा होतो. छतावर मातीची बाग असेल, तर घराचे तापमान नियंत्रित राहते. उन्हाळ्यातील उष्णता कमी होते, एअर कंडिशनरचा वापर घटतो आणि वीजेची बचत होते. शिवाय छतावर असलेली हिरवाई हवेतला धूर, धूळ, प्रदूषण कमी करण्यास मदत करते. यामुळे घराभोवती नैसर्गिक वातावरण तयार होते. शहरातील रिकाम्या मोकळ्या जागा, सरकारी इमारतींची छते, शाळा-कॉलेजांचे मैदान, सोसायटी परिसर या सर्व ठिकाणी सामूहिक शेती प्रकल्प राबवले जाऊ शकतात. अशा उपक्रमांतून मिळणारी पिके स्थानिक बाजारात विकली जाऊ शकतात, ज्यामुळे रोजगारनिर्मितीही होते. काही देशांत कम्युनिटी गार्डन ही संकल्पना फार लोकप्रिय आहे. लोक आपल्या रिकाम्या वेळात एकत्र येऊन पिके लावतात, त्यांचे संगोपन करतात आणि त्यातून मिळणारा अन्नसाठा वाटून घेतात. आपल्या शहरांमध्येही अशा पद्धतीने समाज एकत्र आला, तर अन्नसुरक्षेबरोबरच सामाजिक ऐक्यालाही नवा बळ मिळेल.



**डॉ. भागवत राजाभाऊ चव्हाण**
(लेखक कृषी वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मोबाईल नंबर ८७६७४५६४५५

अर्बन फार्मिंगचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सेंद्रिय शेती. शहरातील लोक रासायनिक खतांनी पिकवलेल्या भाजीपाल्यापेक्षा ऑर्गेनिक भाज्यांना प्राधान्य देतात. त्यामुळे घरच्या घरी सेंद्रिय खत आणि कंपोस्ट तयार करून भाज्या उगवणे ही सुरक्षित व आरोग्यदायी पद्धत ठरते. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट तयार करणे आणि त्याचा वापर शेतीत करणे ही तर कचरा व्यवस्थापनाची उत्तम पद्धत आहे. यामुळे कचरा कमी होतो आणि शहर स्वच्छ राहते.


शहरातील मुलांना शेतीशी जोडणे ही अर्बन फार्मिंगची आणखी एक मोठी देणगी आहे. आजची पिढी मातीपासून दुरावली आहे. त्यांना भाजी कुठून येते, पिक वाढते कसे, झाडाची निगा कशी राखायची याचा अनुभवच मिळत नाही. शाळांमध्ये लहान बाग तयार केल्या, तर मुलांना निसर्गाशी जवळीक साधता येईल आणि अन्नाचा खरा अर्थ समजेल.

तथापि, अर्बन फार्मिंगला काही अडचणीही आहेत. जागेची कमतरता, पाण्याचा तुटवडा, लोकांचा वेळ न देणे ही मोठी आव्हाने आहेत. पण आधुनिक तंत्रज्ञानाने यावर उपाय सापडले आहेत. हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्स, ड्रिप सिंचन यांसारख्या पद्धतींनी कमी पाणी व कमी जागेतही भरघोस उत्पादन घेता येते. अशा पद्धतींना शासकीय आणि खासगी संस्थांनी प्रोत्साहन दिले, तर अर्बन फार्मिंग ही फक्त एक संकल्पना न राहता एक मोठी चळवळ होऊ शकेल.

शहरातील शेतीमुळे अन्नपुरवठा साखळी छोटा राहतो. थेट घराजवळ पिकलेला भाजीपाला बाजारात येतो, त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होतो, प्रदूषणही घटते. शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारा फायदा अधिक वाढतो. शहरात अन्नधान्याचा स्थिर पुरवठा झाला तर महागाई नियंत्रणात राहण्यासही मदत होईल.

अर्बन फार्मिंग ही केवळ फॅशन किंवा लाइफस्टाइल संकल्पना नाही, तर ती एक गरज बनत चालली आहे. हवामान बदल, लोकसंख्येची वाढ आणि अन्नधान्याचा तुटवडा या पार्श्वभूमीवर शहरातूनच अन्नसुरक्षा शोधणे अत्यावश्यक ठरत आहे. आपण थोडा वेळ, थोडा कचरा आणि थोडीशी मोकळी जागा दिली, तरी त्यातून निर्माण होणारी हिरवाई आपल्या जीवनाला नवा अर्थ देईल.

शहरातील लोकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आपण जर प्रत्येकाने आपल्या छतावर, गच्चीत किंवा मोकळ्या जागेत काही झाडे उगवली, तर लाखो घरांच्या छतावर एक भला मोठा हिरवा शेतजमिनीचा पट्टा निर्माण होईल. तो शहराला स्वच्छ हवा, ताजे अन्न आणि निरोगी जीवन देईल.




# भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या कार्याची माहिती

महानुभाव पंथ प्रवर्तक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या अवतार कार्याला भाद्रपद शु. द्वितीया (दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी ) ८०३ वर्षे पूण होत आहेत. यानिमित्त त्यांच्या कार्याची माहिती.

१२ व्या शतकात महानुभाव पंथ प्रवर्तक भगवान सवज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी गुजरातमधील भडूच नगरीचे प्रधान विशालदेव व माता माल्हनीदेवी यांच्या घरी अवतार घेतला. वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत समर्थपणे राज्य कारभार केल्यानंतर रामटेक यात्रेनिमित्त महाराष्ट्रात आले. मानव समाज वर्णव्यवस्थेच्या बंधनात बंदिस्त होता, अशा काळात श्रीचक्रधर स्वामीनी महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानले. दीन-दलित असहाय समाजाचे अवलोकन करून समतेच्या आधिष्ठानावर आधारित नवमतांचे प्रतिपादन केले. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार नित्यवस्तूंची ही सृष्टी आहे. परमेश्वराची प्राप्ती होणे हाच जीवाचा खरा मार्ग आहे. मोक्षाची इच्छा असेल तर जीवाने परमेश्वराची अनन्य उपासना करावी, असे प्रतिपादन केले.

संपूर्ण महाराष्टासह श्रीक्षेत्र पैठणलाही अनेक विद्वान संत समाजमान्य सर्वसामान्य मंडळी स्वामींचे भक्त झाले. पैठन,रामटेक, सालबर्डी, भंडारा, डाकराम, रिद्धपूर, राहेर, नांदेड, वेरूळ, सिन्नर, बीड, कनाशी, जालना, पांचाळेश्वर, खडकली, डोमेग्राम, नेवासा, श्रीरामपूर, बेलापूर इत्यादी ठिकाणच्या पारिभ्रमणकाळात महाराष्ट्रातील सर्व जाती-धमांचे लोक स्वामींजवळ आले. त्यात प्रामुख्याने नागुबाईसा, महानुभाव पंथाचे पाहिले आचार्य श्रीनागदेव, मराठी साहित्यातील आद्यचरित्र ग्रंथ लिहिणारे पंडित श्रीम्हाइभट्ट, नाथोबा, साधाइसा, आऊसा, मराठीतील आद्य कवायत्री महादंबा, सारंगपंडित आदी भक्तांना धर्मज्ञानाच्या तात्त्विक व्यवहाराबरोबरच दैनंदिन व्यवहारातही मराठीचा आग्रह धरला. मराठी लोकभाषेला धर्म भाषेचा दर्जा देऊन राजसिंहासनावर बसविले. तोच आदर्श श्रीचक्रधर स्वामींच्या उत्तरापंथे गमनानंतर शिष्यपरिवारानेही डोळ्यांपढे ठेवला. स्वामींच्या स्मरण भक्तीतून पंडीत म्हाइंमभटांनी ग्रंथराज लीळाचारित्र' हा मराठीचा आद्यग्रंथ शके १२०० मध्ये रिद्धपूर येथे निर्माण केला. महादंबेसारखी आद्य कवयित्री मराठी भाषला मिळाली. या ग्रथांतून महानुभावांनी ६५०० ग्रंथ निर्माण केले. भारतीय हस्तलिखीत क्षेत्रात महानुभाव संप्रदायाने सकळ लीपी, संदा लीपी, कविश्वरी लीपी या सारख्या ४२ लिप्या मराठी भाषेतुन निर्माण केल्या आहे. येथूनच मराठी साहित्यपरंपरेची सुरुवात झाली. मराठी आत्मियतेच्या भावनेमुळे विविध साहित्य प्रकारांत महानुभावांनी रचना करून मराठी साहित्य समृद्ध केलं. मराठीला आभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी श्रीचक्रधर स्वामींवर आधारित असलेले साहित्य महत्वाचे दस्तऐवज ठरले आहे, याबाबत शासनाने वेळोवेळी खुलासा केलेला आहे. आज जगातील पहिले मराठी भाषा विद्यापीठ भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पवित्र असलेल्या श्रीक्षेत्र रिद्धपूर (जि. अमरावती) येथे सुरू झालेले आहे. श्रीचक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने महाराष्टात १६५० तीर्थस्थाने निर्माण झाली.हा महाराष्टाचा ऐतिहासिक वारसा आहे. मानवी मूल्यांना नवसंजीवनी देणारे भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे तत्वज्ञान, कार्याची ओळख, विचारांचा जागर सर्वत्र होण्यासाठी भाद्रपद शु द्वितीया हा दिवस भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन म्हणून साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

आज श्रीचक्रधर स्वामींच्या अवतारदिनी सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**अविनाश मनोहर साळकर**
**मुख्याध्यापक**
**प्राचार्य ग्राम विकास माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय,अंबाडा मोर्शी**

# गणपतीच्या जन्माची कथा



हिंदू संस्कृतीत गणपती या देवतेला सर्वोच्च मान असून गणपती हा विघ्नहर्ता असल्याचे मानले जाते. गणपती हा शिवपार्वतीचा पुत्र असल्याचा पूराणात उल्लेख आहे. गणपतीला गजानन, वक्रतुंड, एकदंत, कृष्ण पिंगाक्ष, गजवक्रं लंबोदर, विकटमेव, विघ्नराजेंद्र , धूम्रवर्ण भालचंद्र, विनायक आदी अनेक नावे आहेत.

पूराणात गणपतीच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आहेत. त्यापैकी पुढील आख्यायिका सर्वमान्य आहे. पार्वतीने तीला तिच्या दोन दासीनी अंघोळीपूर्वी लावलेल्या उटण्याच्या मळापासून तयार केलेल्या एका मूर्तीला सजीव करून आपल्या स्नानगृहाच्या दारावर उभे केले. त्याचवेळी महादेव आले असताना त्या बालकाने माता पार्वती स्नान करीत असल्याचे सांगून त्यांना अडविले. त्यावेळेला या दोघांचे युद्ध होवून शंकराने बालकाचे शीर उडविले. हे पाहून पार्वतीला अत्यंत दुःख झाले व आपल्या बालकाला जिवंत करण्याचा आग्रह तीने शंकरा कडे केला. तेव्हा शंकरांनी आपल्या गणांना उत्तर दिशेला जाऊन प्रथम दिसेल त्या प्राण्याचे शीर आणण्याची आज्ञा दिली व अशा प्रकारे प्रथम भेटलेल्या हत्तीचे शिर आणून या बालकाला सजीव करण्यात आले. अशा प्रकारे हत्तीचे शिर असल्याने ते बालक गजानन म्हणून प्रसिद्ध झाले.

श्रीगणेश पुराणातही गणपतीच्या जन्मासंदर्भात उल्लेख आहे. त्यानुसार शिवपार्वतीचा विवाह होऊन बऱ्याच कालावधी झाला.तेव्हा पार्वतीला पुत्रप्राप्तीची इच्छा झाली. आपल्याला एक अत्यंत श्रेष्ठ पुत्र व्हावा अशी इच्छा तिने भगवान शंकराजवळ व्यक्त केली. महादेवांनी तिला पुण्यक व्रत करण्यास सांगितले. सर्व नियम पाळून एक वर्ष हे व्रत केल्यास मनोवांच्छित सर्व इच्छा पूर्ण होतात असे सांगितले.

पार्वतीने हे व्रत करण्याचे ठरविले. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र व वेदशास्त्र संपन्न, हरिभक्त, परमज्ञानी सनत्कुमाराच्या पौरोहित्य खाली हे व्रत केले.

एक वर्षाने व्रताची सांगता होताच एक अत्यंत गरीब ब्राह्मण तेथे येऊन आपण अत्यंत भुकेले आहो असे म्हणून भिक्षा मागू लागला शिवपार्वतीने त्याचा यथोचित सत्कार करून त्याला भोजन व अलंकार वस्त्र देऊन नमस्कार केला. तो ब्राह्मण अंतर्धान पावला. तेवढ्यात आकाशवाणी होऊन तो ब्राह्मण म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून जगत्पालक जनार्दनच होते व बालक रूपाने ते तुमच्या घरी प्रगट झाले आहेत असे शिव पार्वतीला सांगितले . अंत:पूरात जाऊन शिव पार्वतीने त्या बालकाला आनंदाने उचलून घेतले. अशा प्रकारे परब्रम्ह परमात्म्याने शंकराचे घरी जन्म घेतल्याचा आनंदोत्सव सर्व देवतांनी साजरा करून बालकावर शुभाशीर्वादाचा वर्षाव केला.

अशाप्रकारे आनंद उत्सव सुरू असतानाच त्या बालकाच्या भेटीसाठी शनिदेव आले व त्यांनी बालकाच्या भेटीची विनंती महादेवांना केली.महादेवाने त्यांना पार्वतीकडे पाठवले. मान खाली घालून शनिदेव पार्वतीकडे आले व बालकाच्या भेटीची परवानगी मागू लागले. परंतु ती मागत असतानाच त्यांनी आपल्याला पत्नीच्या शापामुळे आपण ज्याच्याकडे पाहू त्याचा विनाश होईल असा शाप असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


त्यांच्या या कथनावर खळखळून हसून पार्वतीने त्याकडे दुर्लक्ष केले व आपल्या बालकाचे मुखावलोकन करण्याची शनीला परवानगी दिली. आतापर्यंत जमिनीकडे नजर करून उभ्या असलेल्या शनीने आपल्या डोळ्याच्या केवळ कोपऱ्यातूनच त्या गणपतीच्या मुखाकडे पाहिले मात्र तक्षणीच त्याचे शीर धडापासून अलग होऊन गोलोकात परमात्म्याला समर्पित झाले. हे दृश्य पाहून पार्वती विलाप करू लागली. तिचा तो विलाप पाहून विष्णू गरुडावर बसून तिथे आले व तक्षणीच उत्तरेकडे जाऊन प्रथमतः दिसलेल्या प्राण्याचे म्हणजे हत्तीचे शीर कापून ते परतू लागले. तेव्हा हत्तीणीने त्यांना अडवून आपल्या पतीला परत मस्तक लावून जिवंत करण्याची विनंती केली, अन्यथा आपण शाप देऊ असेही सांगितले, तसेच हे शिर दुसऱ्या कोणाला लावण्यासाठी आपण नेत असाल अशी शंका उपस्थित करून जर तुम्ही माझ्या हत्तीला जिवंत करू शकत नसाल तर त्याला मारण्याचाही तुम्हाला अधिकार नव्हता असे बजावले आणि तुम्ही माझ्याच हत्तीचे शिर का कापले असे म्हणून त्याला जिवंत करण्याची विनंती केली. तेव्हा भगवान विष्णू ने उत्तरेकडे भेटलेल्या पहिल्याच प्राण्यांच्या शीरा मुळेच सदरहू बालक जिवंत होणार आहे असे सांगून तुझ्याही हत्तीला मी जिवंत करतो असे म्हणून त्यांनी दुसऱ्या एका हत्तीचे मस्तक आणून त्याला लावून त्या गजराजाला जिवंत केले व त्यास आशीर्वादही दिले.

अशाप्रकारे आणलेले हत्तीचे हे मस्तक त्या बालकाला लावून त्यांनी गजाननाला सजीव केले. ब्रह्मदेवाने त्याला आपला मुकूट दिला तर श्री विष्णुनी त्याला आपला कौस्तुभ मणी दिला. धर्माने त्याला रत्नांची आभूषणे दिली तर अन्य देवदेवतांनीही त्याला अनेक अलंकार अर्पण केले. शिवानी प्रसन्न होऊन त्याला सदैव विजयी होण्याचा आशीर्वाद दिला. आपल्या बालकाला हत्तीचे मूख पाहून पार्वतीला थोडे दुःख झाले. तिने माझ्या मुलाचे असे का केले असे भगवंताला विचारले. तेव्हा भगवंताने तुझा हा मुलगा अतिशय बुद्धिमान पराक्रमी त्रिलोका मान्य होवून देवतांच्या पूजेमध्ये त्याला अग्रपूजेचा मान मिळेल असे सांगितले. तसेच हा लोकांना बुद्धी प्रदान करणारा असेल असे म्हणून कोणतीही शंका कुशंका मनात न आणता त्याचे पालन करण्यास सांगून तिचे समाधान केले. आपल्या पुत्राचे शीर तोडणाऱ्या शनीचा पार्वतीला अतिशय राग आला तिने त्याला अंगभंग होण्याचा शाप दिला तेव्हा सूर्य इंद्र विष्णू आदीं अनेक देवतांनी पार्वतीची मनधरणी करून तिला विनविले तेव्हा तिने शाप परत घेणे तर शक्य नाही परंतु अंगभंगाची ही शापवाणी पायापुरतीच मर्यादित असेल असे सांगितले व त्यामुळे शनिदेव पायाने लंगडे झाले. असा उल्लेख श्रीगणेश पुराणातआहे.

**भालचंद्र ठोंबरे**
९८३४३५०८९५

# गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

वाचक लिहितात

## गणेशभक्त मोरया गोसावी!

हिंदू धर्मात कोणतीही पूजा, यज्ञ, व्रत, उत्सव किंवा शुभकार्य सुरू करण्यापूर्वी श्री गणेशाची पूजा केली जाते. शैव, वैष्णव तसेच अन्य संप्रदायाच्या उपासनेतही सर्वप्रथम श्री गणेशपूजा केली जाते. शिव, श्रीविष्णु आदी देवतांची उपासना करणाऱ्या संप्रदायांप्रमाणेच केवळ श्री गणेशाची उपासना करणाऱ्यांचाही एक संप्रदाय आहे, जो गाणपत्य या नावाने ओळखला जातो.

या संप्रदायानुसार साधना करणाऱ्यांपैकी एक थोर गणेशभक्त म्हणजे मोरया गोसावी! त्यांचे घराणे मूळचे कर्नाटक राज्यातील शाली या गावचे होते. वयाच्या आठव्या वर्षी मौजीबंधनानंतर त्यांची भेट सद्गुरू श्री सिद्धयोगीराज यांच्याशी झाली. त्यांच्या उपदेशानुसार मोरयांनी पुणे जिल्ह्यातील थेऊर येथे जाऊन कठोर तपश्चर्या केली. ४२ दिवसांच्या अखंड नामजपानंतर श्री गणपतीने त्यांना दृष्टांत दिला आणि अखंड भक्ती व सिद्धीचे वरदान दिले. या घटनेनंतर त्यांचे जीवन भक्तिमय चमत्कारांनी भरले. मोरया गोसावी यांनी गणेशभक्तीचा प्रसार करून महाराष्ट्रात गणपती बाप्पा मोरया या घोषणेने भक्तीची परंपरा रुजवली. गणेशभक्तीतून लोकांपर्यंत श्रद्धा, भक्ती व गणेशाचे महत्त्व पोहोचविणारे थोर गणेशभक्त मोरया गोसावी यांच्या चरणी विनम्र नमन!

**सौ. वर्षा आवदे, नागपूर**

## श्री गणेशाच्या आरतीची उत्पत्ती

चढत्या-वाढत्या हिंदवी स्वराज्यावर शत्रू सतत चाल करून येत होता. असाच आदिलशहा नावाचा शत्रू छत्रपती शिवाजी महाराजांवर चाल करून आला. स्वराज्यात त्याने मोठा आकांत मांडला. त्यामुळे महाराज अतिशय खिन्न झाले. या आदिलशाही संकटाची विघ्नहर्ता समर्थ रामदासांना शिवथरघळ येथील सुंदरमठामध्ये समजली. स्वराज्याचे रक्षण व्हावे यासाठी समर्थांनी साक्षात विघ्नहर्त्या गणरायालाच साकडे घातले. गणरायाला त्यांनी साथ घातली संकटी पावावे निर्वाणी रक्षावे. आर्त साद गणरायाने ऐकली. तो गणराया महाराजांच्या पाठीशी धावून आला. आदिलशाही सैन्याची पूर्ण दाणादाण उडवून महाराज यशस्वी झाले आणि समर्थांचा नवस पूर्ण झाला. समर्थांनी सुंदरमठावर गणपती आणला. समर्थांनी महाराष्ट्रात पहिला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करून सुंदरमठामध्ये सुखकर्ता दु:खहर्ता ही श्रीगणेशाची आरती लिहिली. या आरतीचा पहिला मान सुंदरमठाला जातो. त्यामुळे या सुंदरमठाला पहिल्या गणेशोत्सवाचा वारसा श्री समर्थ रामदासांनी दिला.

**शंकर पवार,**
**सातारा.**

# केरळ ऑटोमोबाइल्स आणि लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह यांचा रणनीतिक संयुक्त उपक्रम

**नागपूर, २४ ऑगस्ट :** केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, ही नवी पिढीची इलेक्ट्रिक मोबिलिटी कंपनी, हिचे अधिकृत उद्घाटन आज अरलुमुडू येथील केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड च्या कारखान्यात झाले. ही कंपनी केरळ सरकारच्या मालकीच्या, चार दशकांहून अधिक अनुभव असलेल्या केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड आणि भारतातील सर्वात सक्रिय व नाविन्यपूर्ण ईवी ब्रँडपैकी एक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे. उद्घाटन सोहळ्यास केरळ सरकारचे माननीय उद्योग, कायदा व नारळ खात्याचे मंत्री पी. राजीव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नेय्याट्टिनकारा येथील आमदार के. अंसलन यांनी भूषविले. या प्रसंगी रमेश मिगलानी (संचालक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह), वीर सिंह (सीईओ, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह व एमडी, केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज), डॉ. सुनील कोरगांवकर (संचालक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह), श्रीमती एनी जुला थॉमसआयएएस (ओएसडी), उद्योग विभाग), पुल्लुविला स्टॅनली (अध्यक्ष, केरळ ऑटोमोबाइल्स), राजमोहन (अध्यक्ष, नेय्याट्टिनकारा नगरपालिका), श्रीमती एल. राणी (अध्यक्ष, अथियान्नूर ब्लॉक पंचायत), के. अजितकुमार (कार्यकारी अध्यक्ष, पीटी) आणि श्रीमती अजीथाके.एस. (नगरसेवक, अथियान्नूर) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वारसा आणि नवकल्पनांची सांगड

१९७८ मध्ये स्थापन झालेली केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड भारतीय ऑटोमोबाईल उद्योगातील एक महत्त्वाची कंपनी आहे. १९८४ मध्ये १७५ सीसी दोन स्ट्रोक पेट्रोल थ्री-व्हीलर पासून सुरुवात करून १९९१ मध्ये ३२५ सीसी डिझेल मॉडेल्स बाजारात आणून, केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड ने भारतासोबतच बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, सूदान, बोत्सवाना, नायजेरिया, दक्षिण आफ्रिका, मादागास्कर, ग्वाटेमाला आणि इजिप्त यांसारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत १,००,००० पेक्षा जास्त वाहने विकली आहेत. २०१९ पासून केएएल ने स्वच्छ गतिशीलतेवर भर देत इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर्सचे उत्पादन सुरू केले आहे. कंपनी इस्रो ची एक विश्वसनीय भागीदार असून व्हीएसएससी, एलपीएससी, आयआयएसयू आणि ब्रह्मोस यांसारख्या प्रकल्पांसाठी अत्यंत अचूक एअरोस्पेस घटकांची पूर्तता करते.



लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड, २०२० मध्ये स्थापन झालेली आणि लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडद्वारे समर्थित कंपनी, अल्पावधीतच ईव्ही उद्योगातील एक प्रमुख कंपनी म्हणून उदयास आली आहे. लखनौ व गुरुग्राम येथील उत्पादन केंद्रे आणि देशभरात २०० हून अधिक आउटलेट्सच्या डीलर नेटवर्कसह, ही कंपनी आयएसओ, आयसीएटी आणि एआरएआय प्रमाणित ई-रिक्शा, लोडर, कचरा वाहने तसेच प्रवासी व मालवाहतुकीसाठी ईव्ही उपाय उपलब्ध करून देते. भारताच्या हरित मोबिलिटी भविष्याला बळ देतकेएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड ही केएएलची अभियांत्रिकी क्षमता आणि लॉर्ड्स ऑटोमेटिव्हची तांत्रिक ताकद यांचा मेळ घालून भारत व आंतरराष्ट्रीय बाजारासाठी शहाणी, शाश्वत आणि किफायतशीर वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचा ध्यास घेत आहे. कंपनी ग्रामीण व शहरी भागांसाठी इलेक्ट्रिक स्कूटर, इलेक्ट्रिक सायकल आणि इलेक्ट्रिक ट्राय-स्कूटरचे उत्पादन करणार आहे.

या कार्यक्रमात बोलताना, पी. राजीव यांनी अशा सार्वजनिक-खाजगी भागीदारी भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटी क्रांतीला गती देतील व शाश्वत औद्योगिक विकासाला हातभार लावतील, असे सांगितले.

या शुभारंभावरोबरच, केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज प्रा. लि. भारताच्या स्वच्छ ऊर्जा भविष्याच्या दिशेने रस्त्यांवर नवा अध्याय लिहिण्यास सज्ज झाली आहे.



## आयबीएमने मुंबईत नवीन इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर सुरू केले

**अकोला, २४ ऑगस्ट :** आयबीएम (आयबीएम: एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली. या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे. यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे, ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील, तसेच वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे राज्याच्या क्वांटम इकोसिस्टमच्या विकासात योगदान देतील.

या सेंटरचे उद्घाटन करताना महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्सच्या मदतीने आम्ही विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत निर्माण करत आहोत.हे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वतता आणि कार्यक्षमता वाढवू शकते, वाढ आणि प्रगतीसाठी नवीन संधी निर्माण करू शकते.आयबीएमसोबतच्या आमच्या सहकार्याद्वारे, आम्ही क्वांटम इनोव्हेशनचा वापर जीवन परिवर्तनासाठी करू, त्याच वेळी त्याचे फायदे लोकशाहीकृत करण्यासाठी आणि राज्यातील प्रत्येक नागरिकासाठी ते उपलब्ध करून देण्यासाठी कुशल प्रतिभा समूह तयार करू.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या लोगोचे अनावरण



**अमरावती, २४ ऑगस्ट :** सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे २७ सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिन ते २ ऑक्टोबर या महात्मा गांधी जयंतीदरम्यान सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले असून या महत्वाकांक्षी महोत्सवाच्या लक्षवेधी लोगोचे अनावरण सोलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख आणि विविध क्षेत्रातील उपस्थित होते. आमदार आणि माजी वस्त्रोद्योगमंत्री सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा महोत्सव सोलापूरच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी करणार आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाचा सर्वांगीण विकास करणे आणि त्या माध्यमातून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, निसर्ग व ग्रामीण पर्यटनाचा प्रचार व प्रसार करणे या उद्दिष्टाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची संकल्पना ५-पी मार्केटिंग ब्रँडिंग या तत्वावर आधारित असून प्लेसेस, पर्सनॅलिटीज,प्रॉडक्ट्स, प्लेसमेंट, पोल्युशन-फ्री एन्व्हायर्नमेंट या पाच महत्वपूर्ण पीभोवती त्याची विण आखली गेली आहे.

# अदाणी लॉजिस्टिक्स पार्कची कोचीतील कलमश्शेरी येथे पायाभरणी

**कोची, २४ ऑगस्ट :** अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) ने कलमश्शेरी, कोची येथे अदाणी लॉजिस्टिक्स पार्कच्या पायाभरणीची घोषणा केली असून याचे उद्घाटन केरळचे माननीय मुख्यमंत्री श्री. पिनराई विजयन यांच्या हस्ते झाले.




इन्व्हेस्ट इन केरळ उपक्रमांतर्गत विकसित होणारा हा महत्त्वाचा प्रकल्प, केरळला लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक क्षेत्रात अग्रणी बनविण्यासाठी एक मोठे पाऊल आहे. औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स विकासाचे केंद्र म्हणून झपाट्याने उभारी घेत असलेल्या कोचीमध्ये ७० एकरांवर पसरलेले हे पार्क उभारले जात आहे. हे पार्क वाहतूक खर्च कमी करण्यासाठी, जस्ट-इन-टाइम पद्धतीने कामकाज सुलभ करण्यासाठी आणि ई-कॉमर्स, एफएमसीजी/एफएमसीडी, औषधनिर्मिती, ऑटोमोबाईल आणि रिटेल यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील निर्यात क्षमता वाढविण्यासाठी मदत करेल.

या प्रसंगी बोलताना अश्वनी गुप्ता, पूर्णवेळ संचालक आणि सीईओ, एपीएसईझेड म्हणाले, कलमश्शेरी लॉजिस्टिक्स पार्क हे एपीएसईझेडच्या प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. बंदर-केंद्रित कंपनीमधून पूर्णपणे एकात्मिक वाहतूक आणि लॉजिस्टिक्स व्यवसायाकडे जाणाऱ्या आमच्या बदलाचा हा महत्त्वाचा भाग आहे. या दिशेने केलेल्या आमच्या सर्वात मोठ्या प्रयत्नांपैकी एक म्हणून हे पार्क दक्षिण भारतातील आमची लॉजिस्टिक्स उपस्थिती अधिक मजबूत करेल, स्थानिक उत्पादन आणि प्रादेशिक विकासाला मदत करेल. आम्ही शाश्वतता, कनेक्टिव्हिटी आणि राष्ट्रीय प्रगतीला चालना देणारी जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा उभारण्यास कटिबद्ध आहोत.

माननीय कायदा, उद्योग आणि कॉयर मंत्री पी. राजीव म्हणाले, कलमश्शेरी लॉजिस्टिक्स पार्क हे व्यापाराला गती देणारे, समाजाला सक्षम करणारे आणि बाजारांना जोडणारे स्मार्ट व शाश्वत इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याचे एपीएसईझेडचे दूरदृष्टीपूर्ण ध्येय आहे. हे फक्त एक लॉजिस्टिक्स हब नसून समावेशक वाढ आणि प्रादेशिक बदलाचा एक प्रेरक घटक आहे. कोचीतील एपीएसईझेडचे हे पहिले लॉजिस्टिक्स पार्क असून, गेट एन्ट्रीपासून इनव्हॉईसिंगपर्यंत अखंड व एंड-टू-एंड डिजिटल अनुभव देईल. यामुळे ग्राहकांची सोय, कामकाजातील पारदर्शकता आणि पुरवठा साखळीतील रिअल-टाईम दृश्यमानता सुनिश्चित होईल.

## हिंदी डब केलेले दिल मद्रासी ५ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होत आहे

**नागपूर, २४ ऑगस्ट :** दक्षिण चित्रपटसृष्टीची जादू आता उत्तर भारतातही पसरणार आहे. प्रसिद्ध निर्मिती संस्था श्री लक्ष्मी मूव्हीज या वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेला चित्रपट मद्रासी घेऊन येत आहे, जो ५ सप्टेंबर २०२५ रोजी देशभरात तमिळ आणि तेलुगू तसेच हिंदी डब केलेले आवृत्ती दिल मद्रासी मध्ये प्रदर्शित होईल. चित्रपटाचा भव्य ऑडिओ आणि ट्रेलर लाँच २४ ऑगस्ट रोजी चेन्नई येथे होणार आहे. दिग्दर्शक ए.आर. मुरुगदास (अॲक्शन आणि ड्रामाचे मास्टर) दिग्दर्शित या चित्रपटात शिवकार्तिकेयन, विद्युत जामवाल, बिजू मेनन, रुक्मिणी वसंता, सुदीप, अरुण आणि शबीर हे



कलाकार असतील, तर संगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे. चित्रपटाच्या गाण्यांनी रिलीज होण्यापूर्वीच खळबळ उडवून दिली आहे - चार्टबस्टर सलांबला ने यूट्यूब वर १६ दशलक्षाहून अधिक व्ह्यूज ओलांडले आहेत आणि २१,०००+ यूट्यूब रील्स आणि १०,०००+ इंस्टाग्राम रील्स मिळवले आहेत. सेल्विका आणि तडापा देखील वेगाने व्हायरल होत आहेत आणि दिल्लीपासून चेन्नईपर्यंत तरुणांच्या प्लेलिस्टवर राज्य करत आहेत. अमरन नंतर हिंदी पट्ट्यात आपला ठसा उमटवणारे शिवकार्तिकेयन आता मद्रासी द्वारे आपला नवीन चाहता वर्ग मजबूत करणार आहेत. ओटीटी आणि नाट्यमय प्लॅटफॉर्मवर त्यांची लोकप्रियता सतत वाढत आहे आणि हा चित्रपट त्यांच्या स्टारडमला एका वेगळ्याच पातळीवर घेऊन जाणार आहे. कार्मिक फिल्म्सचे सह-संस्थापक सुनील वाधवा म्हणतात, उत्तर भारतीय प्रेक्षक आता दक्षिण भारतीय ॲक्शन आणि ड्रामाला खुल्या मनाने स्वीकारत आहेत. मद्रासी ही आमच्यासाठी एक मोठी सिनेमॅटिक आणि व्यावसायिक संधी आहे. शिवकार्तिकेयनची वाढती लोकप्रियता आणि ए.आर. मुरुगदासची ब्रँड व्हॅल्यू एकत्रितपणे बॉक्स ऑफिसवर वादळ निर्माण करेल.

# स्क्रीन अवॉर्ड्स २०२५: यूट्यूबसोबत एका महत्वपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे डिजिटल-फर्स्ट पर्व

**मुंबई, २४ ऑगस्ट :** इंडियन एक्सप्रेस ग्रुप अभिमानाने यूट्यूबवर स्क्रीन ॲवॉर्ड्स २०२५ चा नवा अविष्कार सादर करत आहे. स्क्रीन ॲवॉर्ड्स हा भारतीय सिनेमाच्या आणि कथाकथनाच्या सर्वात प्रतिष्ठित उत्सवांपैकी एक आहे.

हा फक्त आणखी एक ॲवॉर्ड शो नाही. स्क्रीन ॲवॉर्ड्स २०२५ हा संपादकीय विश्वासार्हता, सांस्कृतिक वारसा आणि डिजिटल पोहोच यांचा शक्तिशाली संगम आहे. इंडियन एक्सप्रेस ग्रुप च्या पत्रकारिता प्रथम (जर्नलिझम-फर्स्ट) तत्त्वज्ञानावर आधारित हे पुरस्कार प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेचे द्योतक आहेत. एक स्वतंत्र, ना-नफा तत्वावरील संस्था स्क्रीन अकादमी द्वारे विजेत्यांची निवड केली जाते. या अकादमीमध्ये ख्यातनाम चित्रपट निर्माते, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज सहभागी आहेत. त्यांचा उद्देश खऱ्या उत्कृष्टतेला ओळख देणे आहे.

इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे कार्यकारी संचालक अनंत गोयंका म्हणाले, जिथे केवळ कलेक्शनपेक्षा सर्जनशीलतेचा अधिक उत्सव साजरा केला जातो असे व्यासपीठ भारतीय सिनेमाला हवेच आहे. आपल्या कथाकारांकडे १.४ अब्ज स्वप्नं आहेत. ही स्वप्नं आहेत परंपरेशी जोडलेली आणि रोमांचक भविष्याकडे धावणारी. हा ॲवॉर्ड, हे पुरस्कार त्या भावनेला सन्मान देईल आणि भारताच्या सर्वात धाडसी, मूळ प्रतिभेवर प्रकाश टाकेल. या उपक्रमासाठी यूट्यूब ही आमच्यासारखाच उत्साही आहे याचा आम्हाला आनंद आहे.




डिजिटल-फर्स्ट दृष्टीकोनातून आशय आणि फॉरमॅट-प्रकार हाताळत स्क्रीन ॲवॉर्ड्स यूट्यूबवर सादर होतील. त्यामुळे जगभरातील प्रेक्षकांना त्यांचा आनंद लुटता येईल. पहिल्यांदाच, बॉलीवूडमधील सर्वात मोठे स्टार्स यूट्यूबवरील प्रभावशाली क्रिएटर्ससोबत स्पॉटलाइट शेअर करतील. रेड कार्पेट, बिहाइंड-द-सीन्स कंटेंटपासून ते कथाकार, निर्माता, कलाकार प्रेरित स्टोरीटेलिंग आणि चाहत्यांच्या सहभागापर्यंत ते या तीन महिन्यांच्या फेस्टिव्हलच्या प्रत्येक टप्प्यात सामील असतील.

भारतामध्ये आणि जागतिक स्तरावर अभूतपूर्व पोहोच असलेले यूट्यूब स्क्रीन ॲवॉर्ड्स साठी आदर्श ठिकाण आहे. कॉमस्कोर च्या मते यूट्यूब भारतातील १८ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या पाचपैकी चार इंटरनेट वापरकर्त्यांपर्यंत पोहोचते, तर २०२४ मध्ये प्लॅटफॉर्मवरील मनोरंजन व्हिडिओंनी जगभरात दररोज ७.५ अब्ज व्ह्यू निर्माण केले.

स्क्रीन ॲवॉर्ड्स क्युरेटर प्रियंका सिन्हा झा याबद्दल बोलताना म्हणाल्या: १९९५ मध्ये स्क्रीन ॲवॉर्ड्सना सुरुवात झाली. या पुरस्कार सोहळ्यात अनेक गोष्टी पहिल्यांदा सुरु करण्यात आल्या. भारतातील पहिला ज्युरी-आधारित फिल्म ॲवॉर्ड, ऑस्कर्स व्यवस्थापनाने उपस्थित राहून समर्थन केलेला पहिला ॲवॉर्ड शो आणि आजच्या अनेक सुपरस्टार्सनी मिळवलेला पहिला सन्मान. स्क्रीन अकादमीच्या स्थापनेसह आणि यूट्यूबसोबतच्या भागीदारीमुळे आम्ही भारतासाठी आणखी एक 'पहिली गोष्ट' निर्माण करत आहोत. देशातील सर्वात विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित ॲवॉर्ड्स देण्याच्या आमच्या लौकीकावर आधारित अतुलनीय मनोरंजनासह ते सादर केले जातील.

स्क्रीन अवॉर्ड्स २०२५ भारताच्या सर्वात सक्रिय प्रेक्षकांशी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही प्रकारे जोडण्यासाठी सर्व ब्रँड्सना अभूतपूर्व दृश्यमानता, सांस्कृतिक महत्त्व आणि मल्टी-फॉरमॅट स्टोरीटेलिंगची संधी देत आहे.

## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

### स्मगलर प्यारासिंगला सुट मिळाली मात्र तीच सूट सोना व्यापारी प्रकाशचंद लुणिया यांना मिळणार नाही असे सुप्रीमकोर्ट का म्हणाले ?

गेल्या अनेक आठवड्यापासून आपण सोनं तथा इन्कमटॅक्स या विषयावर माहिती जाणुन घेत आहोत आज आपण याच विषयाची परंतु नवीन केस बद्दल ची माहिती बघणार आहोत, जी नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात राहणर आहेत.

**प्रश्न : स्मगलर पीआरा सिंग या केसमध्ये काय होते ?**


स्मगलर पीआरा (प्यारा) सिंग या कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध पीआरा सिंग १९८० १२४ इतर ४१ [SC] या केस मध्ये पीआरा सिंग हा स्मग्लिंग चा धंदा करत होता. या केस मध्ये पीआरा सिंग या स्मगलरला भारत पाकिस्तानच्या सीमेवर पाकिस्तानच्या सीमा लांघताना पकडले. त्याच्याकडे त्या काळी ६५,५००/- रुपयाचे करन्सी नोट स्मग्लिंग करतांना पोलिसांना सापडले. त्याने झडतीनंतर भारतीय पोलिसांना कबुली दिली की तो हे पैसे घेऊन पाकिस्तान ला जात होता आणि तेथून त्याला सोन्याची स्मग्लिंग करायची होती. त्याचे सर्व करन्सी नोट जप्त करण्यात आले. मग पीआरा सिंग यांनी या प्रकरणा मध्ये इन्कमटॅक्स कमिशनर ला सांगितले की माझे बीजनेस स्मग्लिंग चे आहे आणि मला इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम १०(१) मध्ये त्याला वजावट मिळायला पाहिजे. याला इन्कमटॅक्स कमिशनर ने विरोध केला तथा वजावट मान्य केली नाही. मग पीआरा सिंग याने हायकोर्टात धाव घेतली. हायकोर्टा ने सांगितले की स्मग्लिंग हा पीआरा सिंग चा नियमित बीजनेस असुन तो दरवेळी भारतातून पैसे पाकिस्तानला नेतो आणि तेथुन सोनं स्मगल करून आणतो तथा भारतात विकतो. आता या वेळी त्याचे रुपये भारतातील कस्टम विभागाने जप्त केले आहे. त्याचा स्मग्लिंग हा नियमित बीजनेस असल्यामुळे हा नुकसान त्याला मिळण्याचा हक्क आहे. या प्रसंगी कोर्टाने बद्रिदास डागा विरुद्ध कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स १९५८ ३४ इतर १०, कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध (गुजरात) एस सी कोठारी (१९७१), ८२ ITR 194 इत्यादी केसेस चा रेफरन्स देऊन मुंबईच्या काही केसेस चा रेफरन्स दिला शेवटी उच्चन्यायालयाने फैसला दिला की इन्कम फ्रॉम बीजनेस या हेड खाली पीआरा सिंग यांचे नुकसान मान्य करण्यात यावा. कारण सोन आणण्यासाठी नोटा आवश्यक आहे आणि या नोटा सरकारने कस्टम विभागा व्दारे जप्त केल्यामुळे करदात्याचे नुकसान झालेले आहे असे म्हणून इन्कमटॅक्स कायद्याचा कलम १०(१) खाली वजावट मान्य करण्यात आली तथा हायकोर्टा ने पीआरा सिंगच्या बाजु ने निर्णय देऊन इन्कमटॅक्स ची अपील फेटाळली आता प्रश्न उरतो की पीआरा सिंगला वजावट दिली परंतु प्रकाशचंद लुणियाला वजावट का नाकारली ? या साठी आपल्याला प्रकाशचंद लुणिया २०२३ १४९ Taxmann २२९ याची चर्चा करणे आवश्यक आहे. या केस मध्ये इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना १४४ चांदी चे स्लबस (पट्ट्या) मिळाल्या पट्ट्या १३९७, चांदणी चौक, दिल्ली येथून जप्त करण्यात आल्या. याची नोंद लुणिया च्या पुस्तकात नव्हती इन्कमटॅक्स च्या अधिकाऱ्यांने तीन कोटी सहा लाख छत्तीस हजार नऊशे नऊ (३,०६,३६,९०९/-) इतक्या रुपयाचे इन्कमटॅक्स च्या कलम ६९ अन्वए Addition केले. लुणिया यांनी कलम ३७ खाली धंद्याचा नुकसान म्हणुन वजावट मागितली कारण पीआरा सिंग मध्ये वजावट देण्यात आली होती हायकोर्टाने वजावट मान्य केली परंतु इन्कमटॅक्सवाल्यांना हे मान्य नव्हते ते सुप्रीम कोर्टात गेले तेथे सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचा निर्णय फिरवला तथा सांगितले की पीआरा सिंग केस सारखा इथे वजावट देण्यात येणार नाही कारण पीआरा सिंग चा व्यवसाय स्मग्लिंग चा होता म्हणुन त्याला वजावट मिळाली परंतु प्रकाशचंद लुणिया याचा व्यायसाय स्मग्लिंग चा नाही हा सोना, चांदी चा व्यापारी आहे. या मुळे स्मग्लिंग धंद्यात जी वजावट पीआरा सिंग ला देण्यात आली ती वजावट प्रकाशचंद लुणिया या दिल्ली च्या व्यापाऱ्यास दिली नाही.

पुढील लेख मालेत महत्वाचा विषय बघणार आहोत की सहा वर्षा पूर्वी ची ज्वेलरी धाडी मध्ये सापडल्यास ती ज्वेलरी इन्कमटॅक्स अधिकारी जप्त करू शकतात का ? महिलांचे सोने जप्त करू शकतात का ? ईत्यादि प्रश्नांची चर्चा करण्यात येईल

आपले काही प्रश्न असल्यास ९४२२२१८४२८ वर फक्त Whatsapp करावे ज्याची उत्तरे नि:शुल्क पुढे छापली जाईल ही नम्र सुचना.

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

## शब्दकोडे क्रमांक २२००



**आडवे शब्द :-**


१) अवस
४) ठराव, निश्चय
६) शहर, गाव
८) एक अधिक एक चतुर्थांश
१०) पुरुष
११) निराश
१२) किराणा मालाचा दुकानदार
१३) आई (इं.)
१४) प्रहार
१५) मोटार(इं.)
१६) दिवस
१८) धमनी
१९) जमेची खोटी बाब
२१) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२३) माल, पैसे मिळाल्याची चिठ्ठी
२५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
२६) प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद
२८) सुसर
३०) होडी
३१) कावळा
३२) भूपती
३३) प्रेत जाळण्याची चिता
३४) माल साठविण्याची जागा
३५) आकाश
३६) हिस्सा
३८) संपूर्ण
४०) तात्पर्यार्थ
४१) नशीब
४२) मार्ग
४३) भारवाहक
४५) कट्टा, ओटा
४८) सैन्याची तुकडी
५०) नवऱ्याचा भाऊ
५१) गयावया करणे
५६) पाळीपाळीने
५९) किंमत
६०) व्यर्थ
६१) धपाटा
६२) वृद्धत्व, थोडे
६३) एक द्विदल धान्य
६५) मालाची विक्री
६७) वर्ष, साल
६८) बैलाच्या मानेवरील जोखड
६९) एक सुगंधी पांढरे फूल
७२) शिकारीचा प्राणी
७३) एक सुगंधी वनस्पती
७५) शरीर
७६) अबोलीची वेणी
७८) नग्न
७९) बोकड
८०) पडसे
८१) हिरा, पाचू इ प्रकार
८२) मोठा नगारा

**उभे शब्द :-**

२) मनुष्य
३) नवरदेव
४) मडके
५) गवंडी
६) होकारच्या विरुद्ध
७) विटी कोलण्याचा खड्डा
८) घर
९) उत्तराधिकारी
११) खोबऱ्याची बर्फी
१२) सतरंजी
१४) नाश, वध
१५) कावळा
१७) महान
१९) नातवाची वा नातीची मुलगी
२०) पाणी
२१) वर्ष, साल
२२) तादाम्य, एकरूप
२४) वरपांगी
२६) हिशेबातील वांधा मिटविणे
२७) खटला
२९) मोजणी करणारा
३१) व्यवस्था, जबाबदारीचे काम
३७) एक श्वासरोग
३९) श्रीरामाचा एक भाऊ
४०) ** बुद्धी नाठी
४४) दडून बसणे
४५) कबूतर
४६) थोर मनाचा, धर्मात्मा
४७) दुसऱ्यांदा
४९) फळाचे साल
५२) ढग
५३) कधीही, केव्हाही
५४) दारूचा एक प्रकार
५५) चरण्याची जागा
५७) मोजकेपणा, मितता
५८) काचेला आरसा बनविणारा घटक
६३) कपि
६४) घट्ट
६५) डोक्यातला फोड .
६७) मनाचा झालेला ग्रह
६९) आम्रवृक्षाची मंजिरी
७०) संताप
७१) विश्रांती
७२) लाकडाचे एक उत्तम जात
७४) गंध
७७) उचलण्यास वजनदार

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# राजुरा पेयजल योजनेतील भ्रष्टाचाराविरोधात राजूरकर यांचे आमरण उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगांव** - तालुक्यातील मौजे राजुरा येथील राष्ट्रीय पेयजल योजनेतील गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाचे काम आणि कोट्यवधींचा निधी वाया घालविल्या प्रकरणी ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी केल्या तरीही संबंधित अधिकाऱ्यांनी व कंत्राटदारांनी मिळून फसवणूक केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थ कार्यकर्ते प्रतीक कैलास राजूरकर यांनी केला आहे.



त्यावर न्याय न मिळाल्याने त्यांनी दिनांक २० ऑगस्ट २०२५ पासून राजुरा येथील बजरंगबली मंदिरा समोर आमरण उपोषण सुरू केले असून आज तिसरा दिवसही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. प्रतीक राजूरकर यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास दिलेल्या तक्रार अर्जात स्पष्ट नमूद केले आहे की, सन २०२०-२१ मध्ये मंजूर झालेल्या पेयजल योजनेचे काम अंदाज पत्रका प्रमाणे झाले नसून ते अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. परिणामी पावसाळ्यातही गावकऱ्यांना पाणी मिळत नाही. विशेष म्हणजे उन्हाळ्यात तर ग्रामस्थांना पाणी न देता ते शेतातील रब्बी पिकांसाठी विहिरीत सोडले जाते, ज्यामुळे योजना मूळ उद्दिष्टां पासून भरकटली आहे याबाबत राजूरकर यांनी १८ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग तसेच तालुका व जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले होते मात्र पाठपुरावा करूनही रिसोड येथील उपविभागीय अभियंता चाफे यांनी केवळ थातूर मातूर चौकशी करून कंत्राटदार व ग्राम पंचायत प्रशासनाच्या मर्जीनुसार अहवाल सादर केला त्यामुळे या गैर व्यवहाराला पाठबळ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर ही कारवाईची मागणी करण्यात आली आहे. राजूरकर यांनी आपल्या अर्जात स्पष्ट इशारा दिला आहे की, वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषींवर कारवाई न झाल्यास न्यायासाठी त्यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबला असून त्यांच्या जिवितास काही झाले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल या प्रकरणा सोबतच त्यांनी उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, रिसोड यांचे दि.२७ जुन २०२५ चे पत्र, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद वाशिम यांचे दि.१६ जुलै चे पत्र तसेच मालेगाव उपविभागीय अभियंता यांचे दि.६ ऑगस्टचे चे पत्र सोबत जोडून सविस्तर माहिती सादर केली आहे. राजूरकर यांच्या तक्रारीची प्रत मुख्यमंत्री, पाणी पुरवठा मंत्री, पालकमंत्री दत्ता भरणे, जिल्हाधिकारीवाशिम, तहसीलदार मालेगाव, गटविकास अधिकारी मालेगांव, पोलीस निरीक्षक मालेगाव, तसेच सर्व प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांना पाठविण्यात आली आहे तथापि, आजता गायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली गेलेली नाही उपोषण तिसऱ्या दिवशी पोहोचले असून गावकऱ्यां मध्ये संतापाचे वातावरण आहे निकृष्ट दर्जाच्या कामाची जबाबदारी कोण घेणार ? दोषींवर कारवाई कधी होणार? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

# शेंदुरजाना येथे शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्यासाठी अनोख्या आगळ्या वेगळ्या पद्धतीने बैल पोळा साजरा

▶ विशाल मोरे ▶

**मानोरा** - विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेकऱ्यांचा ७/१२ करुया कोरा कोरा कोरा या दिलेल्या आश्वासना प्रमाने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्ज माफी द्यावी शेतकऱ्यांना कर्जातुन मुक्त करावे या मागणीसाठी शेंदुजना तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथील शेतकऱ्यांनी बैलांच्या अंगावर ७/१२ कोरा कोरा असे लिहुन महाराष्ट्र सरकारला दिलेल्या आश्वासनाची आठवण करुन देत जाहीर निषेध व्यक्त केला.




सरकारने दिलेल्या आश्वासना प्रमाने जर शेतकरी कर्ज माफी केली तर शेतकरी आत्महत्यां थांबतील आणी शेतकरी वर्गाचा कर्जाचा भार थोडा हलका होईल आणी शेतकऱ्यांना चार दिवस जगण्याची अशा पल्लवीत होईल असे मनोगत यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केले फडणवीस साहेब म्हणतात या वर्षी पाऊस चांगला आहे दुष्काळ पडल्यावर कर्ज माफी देऊ दोन दिवसांपूर्वीच मानोरा तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे मग पाऊस चांगला असला तरी शेतकरी संकटातच आहे असेही सो निमोहा येथील शेतकऱ्यांनी बोलुन दाखवले अगदी काला परवाच बाबासाहेब सुभाष सरोदे राहणार वडुले, तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर या शेतकऱ्यांने विडीओ करून कर्ज बाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केली हे सरकार आजुन किती शेतकऱ्यांचे बळी घेणार म्हणून शेंदुरजाना येथील शेतकऱ्यांनी हा बैल पोळा वेगळ्या पद्धतीने साजरा करुन महाराष्ट्र सरकारचा जाहीर निषेध करुन बैल पोळा साजरा केला. यावेळी प्रहारचे माजी तालुका प्रमुख शाम पवार प्रहारचे कट्टर प्रहार सेवक चेतन पवार आदि शेंदूजना गावातील शेतकऱ्यांनी सरकारचा जाहीर निषेध केला.

# मेडशीत बैलपोळा सण उत्साहात साजरा



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मेडशी** - श्रावण अमावास्या म्हणजेच पिठोरी अमावास्येला विदर्भात पारंपरिक पद्धतीने साजरा होणारा बैलपोळा सण यंदाही मेडशीत मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.

शेतकऱ्यांचा जीवनातील खरा सोबती मानल्या जाणाऱ्या बैलांना विश्रांतीचा दिवस देत गावातील महिला व नागरिकांनी श्रद्धा, भक्ती आणि कृतज्ञतेने त्यांची पूजा अर्चा करून सण साजरा केला. आजच्या दिवशी बैलांना रंगीत सजावट करून, फुलांनी व मोत्यांनी शोभा आणून गावभर मिरवणूक काढण्यात आली. घरोघरी महिलांनी बैलांची पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला. ग्रामपंचायत व नागरिकांच्या सहकार्याने पारंपरिक व धार्मिक वातावरणात हा सोहळा रंगतदार झाला. यंदा ग्रामपंचायतने उत्कृष्ट सजावट केलेल्या बैल व बैलजोडींसाठी स्पर्धांचे आयोजन केले होते. सरपंच शेख जमीर शेख गणीभाई यांनी रोख बक्षिसांची घोषणा केली. उत्कृष्ट जोडीमध्ये प्रथम क्रमांक एकनाथ बहादुरे, तर द्वितीय क्रमांक बाळू शेंडोकर यांना मिळाला. वैयक्तिक बैल सजावट स्पर्धेत संघम चोथमल विजेता ठरला. तसेच हनुमानवाडी येथील मारोती मंदिराच्या पारावर सर्वप्रथम बैल पोहोचवून प्रतीक कांबळे यांनी विशेष गौरव प्राप्त केला. मंगलाष्टक पठणासाठी कैलास तोडकर यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, तर तोरण सजावट संतोष कांबळे यांनी केली. ग्रामपंचायत कर्मचारी यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पोळा सणाचे उत्कृष्ट आयोजन केले होते. या सोहळ्याला शेख जमीर, ज्ञानदेव साठे, गजानन शिंदे, अमोल तायडे, मूलचंद चव्हाण, जगदीश नाईक, धीरज मंत्री, ज्ञानेश्वर मुंडे, नितीन तायडे, डॉ सतीश बाहेती, संजयराव घुगे, उल्हास घुगे, नाना तायडे, संजय भागवत, संतोष बहादुरे, धनराज चव्हाण, सुधाकर राठोड, जगदीश बहादुरे, संदीप डाखोरे, दिनेश यादव, जावेद शेख, अजिंक्य मेडशीकर यांच्यासह मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ उपस्थित होते. पोळा सण शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा म्हणून मेडशी पोलिस चौकीचे पोलीस जमादार निलेश अहिर, भानुदास निवाणे, ज्ञानेश्वर सानप, धम्म घनबहादुर यांनी चोख बंदोबस्त ठेवला. परंपरा, उत्साह आणि सामूहिक सहभागाने पार पडलेला यंदाचा बैलपोळा सण मेडशी गावकऱ्यांसाठी अविस्मरणीय ठरला

# लिंगा कोतवाल येथे अतिवृष्टीमुळे घर व गुरांचा गोठा पडून शेतकऱ्याचे मोठे नुकसान

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - रिसोड पासून जवळच असलेल्या लिंगा कोतवाल या गावात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी शिव शंकर माधवराव देशमुख यांचे राहते घर तसेच गुरांचा गोठा कोसळून मोठे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेत गुरांचे प्राण थोडक्यात वाचले असले तरी शेतकऱ्याचे ढोर, वस्त्र व इतर साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.



गावकऱ्यांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे गावात अनेक ठिकाणी भींती कोसळण्याच्या घटना घडल्या असून शासनाने त्वरित पंचनामे करून पीडितांना मदत द्यावी अशी मागणी होत आहे. मात्र, गावात कायमस्वरूपी तलाठी नसल्याने पंचनामे होत नाहीत, असा आरोप नागरिकांनी केला आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, गेल्या चार वर्षांपासून लिंगा कोतवाल गावाला नियमित तलाठी नाही. प्रत्येक आठ-दहा दिवसांनी तलाठी बदलले जातात. त्यामुळे नागरिकांना नुकसान भरपाई साठी अर्ज करायचा तर कोणाकडे करावा, असा गोंधळ निर्माण होतो. शिवाय, गावा जवळील नदीपात्रातून वाळू उत्खनन व खनिज वसुलीच्या कारणास्तव जाणून बुजून या गावाला स्थायी तलाठी दिला जात नसल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. 'आमच्या गावात जेव्हा एखादी दुर्घटना घडते, घरं पडतात किंवा गुरं मरतात, तेव्हा पंचनाम्यासाठी अधिकारीच येत नाहीत. फोन केल्यावर 'मी या गावाचा तलाठी नाही' असे उत्तर मिळते. नागरिक त्रस्त झालेले आहेत. शासनाला वारंवार मागणी करूनही लिंगा कोतवालला कायम स्वरूपी तलाठी नेमण्यात आलेला नाही. त्यामुळे गावकऱ्यांना मदत मिळण्यात मोठा विलंब होतो,' असे ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, पावसामुळे घर व गोठे पडल्याने गुरांमध्ये आजार पसरत आहेत. पशु वैद्यकीय यंत्रणा, दवाखाने व प्रशासन याकडेही गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप होत आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी केली की, तातडीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, गावाला कायम स्वरूपी तलाठी नेमावा, पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, तसेच गावात पसरणाऱ्या गुरांच्या आजारांवर नियंत्रण आणावे. लिंगा कोतवाल मध्ये शासनाची वचक राहिलेली नाही, अशी भावना नागरिकांत पसरली असून तातडीने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

# मांगुळ झनक येथे बैलपोळा साजरा



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम**- तालुक्यातील मांगुळ झनक येथे बैलपोळयाचा सण उत्साहात व शांततेत पार पडला. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य भूषण दांदडे यांनी शेतकरी बांधवांसोबत पोळयाचे औचित्य साधत बैलांचे पूजन केले. बैलांना नैवेद्य अर्पण करून त्यांनी उपस्थित सर्व नागरिक व शेतकऱ्यांना पोळयाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

भूषण दांदडे यांनी गावोगावी जाऊन नागरिकांचा आशीर्वाद घेतला व शेतकरी बांधवांना प्रोत्साहन दिले. त्यांनी यावेळी पोळा सण शांततेत आणि आनंदात साजरा करण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार असलेल्या बैलांचा सन्मान करण्याची परंपरा ही आपली संस्कृती असल्याचे त्यांनी सांगितले. गोभणी सर्कलमधील मांगुळ गावात हा कार्यक्रम पार पडला असून नागरिकांनीही एकत्र येऊन सण साजरा केला. संपूर्ण गावात उत्साही वातावरण असून कार्यक्रम कोणत्याही वादाविना शांततेत संपन्न झाला.

# किन्हिराजा मंडळातील पूरग्रस्त पिकांची तहसीलदारांकडून पाहणी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव** - गेल्या काही दिवसांपासून झालेल्या धुव्वाधार पावसामुळे किन्हिराजा महसूल मंडळात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नदीनाल्यांना आलेल्या महापुरामुळे तसेच कवरदरी गावातील तलाव फुटल्याने पिके वाहून गेली. तरी देखील किन्हिराजा मंडळाचा अतिवृष्टी ग्रस्त यादीत समावेश न झाल्याने शेतकऱ्यांत प्रचंड नाराजी पसरली होती.



या पार्श्वभूमीवर लोक प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी यांनी शासनाकडे पाठ पुरावा करत या मंडळाला अतिवृष्टीत सामील करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत आज मालेगावचे तहसीलदार दीपक पुंडे यांनी किन्हिराजा मंडळातील नुकसान ग्रस्त भागाची पाहणी केली. गेल्या पाच दिवसांत झालेल्या सततच्या पावसामुळे कवरदरी गावातील तलाव फुटून शेत जमिनी पाण्या खाली गेल्या. तर अडान नदीला आलेल्या पुरामुळे एरंडा, बोराळा, मैराळडोह या गावांमधील शेतजमिनी वर्स्हष्ट झाल्या. एरंडा गावात घरांमध्येही पाणी शिरून मोठे नुकसान झाले. या परिस्थितीत शेतकऱ्यांची उभी पिके गाळा सकट वाहून गेली असून, तीन वेळा केलेल्या पेरण्या फसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. या गंभीर परिस्थिती विरोधात खासदार अनुप धोत्रे, माजी आमदार विजय जाधव, माजी मंत्री अनंतराव देशमुख, खासदार भावना गवळी, आमदार अमित झनक, माजी जि.प. अध्यक्ष दिलीपराव जाधव, माजी जि.प. सदस्य सुनील गोदमले, भाजप तालुकाध्यक्ष सुरेश मुंडे, युवासेना जिल्हाध्यक्ष अमोल देशमाने, सुभाष पाटील देवडे यांसह विविध राजकीय नेत्यांनी आक्रमक भूमिका घेत 'किन्हिराजा मंडळाचा तातडीने अतिवृष्टी ग्रस्त यादीत समावेश करावा' अशी मागणी केली. तहसीलदार पुंडे यांच्यासोबत तलाठी अंबोलकर, सामाजिक कार्यकर्ते नयन जयस्वाल, विश्वनाथ आडे, जितेश अग्रवाल, विजय साळवनकर, श्रीकांत गोंडाळ, देवकर, सोनुने तसेच पत्रकार समाधान गोंडाळ, प्रवीण सावरे उपस्थित होते. या पाहणीनंतर तहसीलदार दीपक पुंडे यांनी 'किन्हिराजा मंडळाचा अतिवृष्टीग्रस्त यादीत समावेश करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आली आहे' अशी माहिती दिली.

# कारंजा परिसरात बैलपोळा उत्सव उत्साहात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा लाड** - शहरासह ग्रामीण भागात शुक्रवारी पारंपरिक रिती रिवाजां नुसार आणि मोठ्या थाटामाटात बैलपोळा सण साजरा करण्यात आला.



शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना आंघोळ घालून, रंगरंगोटी करून, झुला टाकून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढली. प्रत्येक घरी बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून त्यांचा सन्मान करण्यात आला. पोहा वेश, मंगरूळ वेश येथे पारंपरिक पद्धतीने बैलपोळा साजरा झाला. पोहा वेश येथे पेटकर यांच्या बैलजोडीला 'मनाचा बैल' म्हणून पूजन करण्यात आले. या वेळी रेवाळे, अघम, पेटकर, गुलवाडे तसेच गवळीपुरा येथील शेतकऱ्यांनी आकर्षक सजावटीत बैल आणून उत्सवात सहभाग घेतला. कालांतराने बैलांची संख्या कमी होत असल्याने उपस्थितांमध्ये या विषयी चर्चा रंगली. पोळा सण हा शेतकऱ्यांच्या आयुष्यातील एक महत्वाचा दिवस असून शेतकरी आपल्या जीवन साथी बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. नांगरणी, पेरणी व वाहतुकीसाठी बैल हे शेतकऱ्यांचे खरे साथीदार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांचे महत्त्व काहीसे कमी झाले असले तरी गावा गावात पोळा सण अजूनही तेवढ्याच भक्तीभावाने व उत्साहात साजरा केला जातो.

# अतिवृष्टी होऊन सुद्धा आर्थिक मदतीपासून वंचित राज्यकर्त्याचा व प्रशासनाचा दुटप्पीपणा उघड!

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - तालुक्यातील गोवर्धन, कवठा, रिठद या महसुली मंडळा मधील गावामध्ये अतिवृष्टी झाली आहे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे अतिवृष्टीमुळे खूप नुकसान झाले आहे. प्रशासना मधील अधिकाऱ्यांना याबाबतचे सर्व माहिती असताना सुद्धा या बाबीचा ८ ऑगस्ट पासून १९ ऑगस्ट पर्यंत सर्व माहिती स्वतः प्रशासनातील अधिकाऱ्यांनी स्थानिक गावात जाऊन घेतली तरीसुद्धा संबधित अधिकारी यांनी कवठा, रिठद गोवर्धन ही मंडळी सर्वे मध्ये समावेश करण्यात अपयशी ठरले.



सर्व शेतकऱ्यांचा विश्वासघात केला .याबाबत सर्वांना पालकमंत्री येण्याअगोदर आस्वस्त केले होते की संपूर्ण तालुक्यातील कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित ठेवल्या जाणार संपूर्ण तालुक्यातील गावाचा यामध्ये समावेश करण्याचा आमचा प्रयत्न केला जाणार आहे. कवठा, रिठद , गोवर्धन महसुली मंडळामध्ये अतिवृष्टी झाल्या बाबत शासनास माहिती दिली नसल्याचे आजच्या परिस्थिती वरून कळते. त्यामुळेच तिनही महसुली मंडळातील शेतकरी शासनाच्या व प्रशासनाच्या भुल थापांना बळी पडले. त्यामुळेच हि वेळ आज शेतकऱ्यांवर आली. अतिवृष्टी झाल्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या सवलती, आर्थिक मदती पासून आज तरी शेतकरी वंचित राहणार आहे. रिसोड तालुक्यातील गोवर्धन, कवठा, रिठद महसुल मंडळाचा समावेश करुन अतिवृष्टीच्या सवलती मध्ये ७ दिवसाच्या आत निर्णय घ्यावा असे निवेदनात म्हटले आहे.हे निवेदन दि.२१ आ?गष्ट २०२५ रोजी देण्यात आले.जर निर्णय घेतला नाही तर गोवर्धन, कवठा, रिठद या महसुली मंडळामधील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ नये म्हणून रिसोड तालुका शिवसंग्राम संघटनेच्या वतीने तिव्र आंदोलन किंवा रस्ता रोको करण्यात येईल.याबाबतचा इशारा शिवसंग्राम संघटनेचे तालुकाध्यक्ष वसंतराव टाले यांनी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

# कारंजा लाड येथे जनसुरक्षा शिबिराचे आयोजन





## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - स्टेट बँक ऑफ इंडिया व जिल्हा अग्रणी बँक, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने कारंजा लाड येथे जनसुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे अध्यक्षपद प्रादेशिक संचालक, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नागपूर सचिन वाय. शेंडे यांनी भूषविले.

या प्रसंगी उपमहाप्रबंधक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया अमरावती शशी रंजन, क्षेत्रीय व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया अकोला आशिष कुमार सिंह, उप महाप्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडिया किसले कुमार तसेच जिल्हा व्यवस्थापक, रिझर्व बँक ऑफ इंडिया नागपूर हर्षल चितळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कारंजा लाड येथील सर्व बँक शाखा प्रमुखांनीही शिबिरात सहभाग घेतला. विविध ग्रामपंचायतींमधून दोनशेहून अधिक नागरिकांनी हजेरी लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रादेशिक संचालक सचिन वाय. शेंडे यांनी नागरिकांना बँक खात्याची KYC पूर्ण करून प्रधानमंत्री सुरक्षा विमा व जीवन ज्योती विमा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उप महाप्रबंधक अंजना श्यामनाथ यांनी RBI Ombudsman बाबत मार्गदर्शन केले. उपमहाप्रबंधक शशी रंजन यांनी अटल पेन्शन योजनेचे महत्व स्पष्ट करत सर्व युवकांना त्याचा लाभ घ्यावा असे सांगितले. जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे अटल पेन्शन योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्याने राज्यात प्रथम स्थान मिळविल्याची गौरवाची नोंद त्यांनी या वेळी केली.

कार्यक्रमाचा समारोप क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष कुमार सिंह यांनी सर्वांचे आभार मानून केला. या प्रसंगी नागरिकांना आवाहन करण्यात आले की, त्यांनी आपल्या ग्रामपंचायत शिबिरामध्ये अथवा जवळच्या बँक शाखेमध्ये जाऊन खात्याची KYC करून घ्यावी आणि सर्व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा. अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी दिली.

RNI No-46973/1986 महासागर वाशिम
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनमुखदास चांडक यांनी, अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, महात्मा फुले मार्केट, पाटणी चौक येथे प्रकाशित केले.
संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -९९२२५७००२३ स्थानिक संपादक विनोद तायडे मो नं -९५६३६४५५५५ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील )

# भक्तिमार्ग

**बरेचसे खेळ रंजनाच्या उद्देशाने खेळले जातात. मात्र रंजनाबरोबरच अध्यात्माकडे नेणारा एक खेळ म्हणजे दहीहंडी. दर वर्षी गोकुळाष्टमीच्या दिवशी उंचावर बांधलेली हंडी फोडण्यासाठी गोविंदा थरावर थर लावतात. एका अर्थी हे थर म्हणजे सुखनिधानाकडे नेणारा सोपान असतात. सध्या या सणाला चिटकलेला राजकीय रंग गहिरा होत असला तरी क्षणिक तो बाजूला सारला तर कृष्णभक्तीच्या या पायदंड्या स्पष्टपणे समोर येतात.**

## दहीहंडी, भक्तीचा सोपान

भक्ती विशेष



अनेक कारणांमुळे खेळांचं महत्त्व जाणवतं. खेळांमध्ये रंजन असतंच पण धोका पत्करुन पुढे जाण्याची उमेदही असते. प्रतिस्पर्ध्याच्या तुल-नेत आपली ताकद आणि कस आजमावण्याची संधी असते, सरस कामगिरी करुन जनकौतुक मिळवण्याची इच्छा असते, खिलाडूवृत्ती जोपासून प्रतिस्पर्ध्यांशीही मैत्र जुळवून ठेवण्याचा मानव-तावाद असतो, व्यवहारात कामी येतील असे धडे गिरवण्याचा खेळ हा एक मंत्र असतो आणि सरतेशेवटी अध्यात्माच्या वाटेवर नेणारा हा एक सोपा सोपान असतो. म्हणूनच प्रत्येक काळामध्ये, प्रत्येक पिढीला खेळाचं महत्त्व जाणवतंच. गोकुळाष्टमी हा असाच एक दिवस. कृष्णचरित्रामध्ये कृष्णाच्या लिलांनी सजलेल्या अध्यायांमध्ये गोकुळाष्टमीच्या खेळात भाविक बराच काळ रेंगाळतात. नटखट कन्हैयाने बालपणातला प्रत्येक रस भरभरुन अनुभवला. त्याच्या या बाल-लीलांमध्ये खोड्या होत्याच शिवाय दुपारी सगळी सामसूम झाली असताना शिंकाळ्यावरील दह्याचे हंडे फस्त करण्याचा चोरटेपणाही होता. दुधातुपाने संपन्न असणाऱ्या घरातील असल्यामुळे खरं तर त्याला चोरी करुन दही-दूध खाण्याची काहीच गरज नव्हती पण तरीही साधारण घरांमधून आलेल्या गोपांच्या संगे हा श्रीहरी चोरी करुन दही खातो तेव्हा या खेळामधून, या प्रतीकामधून, या कथेतून अनेक संदर्भ निघतात. हे संदर्भ अध्यात्माकडे नेणारे असतात. त्यातील गर्भितार्थ समाजव्यवस्थेच्या उतरंडीचं, एकमेकांच्या साह्याने एखादं काम मार्गी लावल्यास मिळणाऱ्या खा-त्रीशीर यशाचं, चिकाटीने- तनामनाचा तोल सांभाळत केलेल्या कार्याचं यशोफलीत दाखवणारा असतो. म्हणूनच दहीहंडीचा उत्सव हा एका वेळी नटखट गोविंदांचा खेळ असतोच त्याचबरोबर तो काही धडे देणारा क्षणही असतो. लहानांना या खेळातील थरार आवडतो, प्रौढांना युवकांची चपळता आकर्षित करते तर वृद्धांना या निमित्ताने रंगणाऱ्या रसाळ प्रवचनांची मोहिनी पडते. म्हणजेच या एका उत्सवाकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते.

नंद-यशोदाच्या अंगणी खेळणारा कृष्ण हा विष्णूचा अवतार. सृष्टीचं नियमन करणाऱ्या या देवतेने आपल्या कृष्णावतारातही समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सृष्टीचा हा पालनकर्ता या अवतारातील बालरुपातही पालकाची भूमिका बजावताना दिसतो तेव्हाच त्याच्या चरणी नतमस्तक व्हायला होतं. संपन्नतेचा, सुस्वरुपाचा, सामर्थ्याचा सगळा नखरा क्षणात दूर सारुन हा नंदकिशोर आपल्या सवंगड्यांच्या गराड्यात रमतो. आपल्याबरोबर सगळ्यांनाच चांगलंचुंगलं खायला मिळावं या उद्देशाने तो गोपींच्या हंड्यातील लोणी चोरतो, दही चोरतो. नंतर सगळे एकत्र येऊन ‘चोरलेलं’ सगळं साहित्य एकत्र करतात आणि घनगर्द सावली देणाऱ्या एखाद्या झाडात छायेत बसून सेवन करतात. अशा प्रकारे सहभोजन होतं तेव्हा सामाजिक पातळीवरील भेदाभेद क्षणात विरुन जातात. आपल्या घासातील घास काढून दिला जातो, एकत्र घास घेतला जातो, खेळीमेळीत भोजनाचा आनंद मिळतो तेव्हा उच्च-नीच, गोरा-काळा, ज्येष्ठ-कनिष्ठ हा भेदच उरत नाही. हे चिरकालीन सत्य जाणूनच कलियुगातही समाजा-तील जाती-धर्मांचा भेदाभेद नष्ट करण्यासाठी संतमहात्म्यांनी, समाजसुधारकांनी, तत्त्वज्ञांनी समाजातील सर्वात खालच्या थरातील लोकांकडे भोजन करण्याचा मार्ग अवलंबलेला दिसतो. आजही धर्मनिरपेक्षतेचा चेहरा मिरवण्यासाठी हाच उपाय योजला जातो. आपण सर्व एक आहोत हा संदेश पोहोचवण्याचा हा एक सर्वात प्रभावी उपाय आहे. कृष्णाने आपल्या बाललिलांमधून इतका महत्त्वाचा संदेश हसत-खेळत दिला आहे. म्हणूनच वरकरणी साधा वाटणारा हा खेळ युगांच्या पटलावरही अस्तित्व राखून आहे.

आता कृष्णही नाही आणि तो काळही नाही. शिंकाळ्यावर बांधलेल्या दह्यादुधाचे चरवे आजच्या पिढीच्या डोळ्यासमोर येण्याची सुतराम शक्यता नाही. पण असं असलं तरी आजही दहीहंडी रंगते. ती भक्तीभावाने, खेळाच्या उत्साहाने रंगते पण त्याहीपेक्षा जास्त कोर्टाच्या बदलत्या निर्णयांमुळे रंगते. दर वर्षी दहीहंडीसाठी किती थर लावायचे, किती वयापर्यंतच्या मुलांना त्यात सहभागी करुन घ्यायचं, त्यांच्या सुरक्षेसाठी कोणते उपाय योजायचे, त्यांचा विमा उतरवायचा का, अपघात कमी करण्यासाठी आणि गोविंदांच्या सुरक्षेसाठी आणखी कोणते उपाय योजायचे याविषयी चर्चा रंगते. आताही दहीहंडीसाठी उभारल्या जाणाऱ्या मनोऱ्यांची उंची आणि त्यात सहभागी गोविंदांचं वय या संदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये दहा फुटांहून अधिक उंचीचा मनोरा रचण्यावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती परंतु न्यायालयानं ही मागणी फेटाळून अशी बंदी घालण्यास नकार दिला. न्यायालयानं या संदर्भात केल्या गेलेल्या काही दाव्यांचाही यावेळी समाचार घेतला. त्यामुळेच आता या खेळाला वेग-वेगळे पैलू दिसून येत आहेत.

२०१४ मध्ये उच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशात १८ वर्षांखालील मुलांवर मानवी मनोऱ्यात सहभागी होण्यावर बंदी घातली होती. त्याबरोबरच या मनोऱ्यांची उंची २० फुटांहून अधिक नसावी असं म्हटलं होतं. आताच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनानं काढलेल्या आदेशातील १४ वर्षांपुढील मुलं दहीहंडीत भाग घेऊ शकतील, हा भाग कायम ठेवण्यात आला आहे. दहीहंडीच्या उंचीवर कोणतीही मर्यादा नसली तरी दहीहंडीमध्ये उभारल्या जाणाऱ्या मनोऱ्यांची उंची हा बऱ्याच वेळा चिंतेचा विषय ठरतो. या मनोऱ्यांमध्ये सहसा वरच्या टप्प्यांमध्ये अधिकाधिक लहान मुलांचा समावेश केला जातो. एक तर त्यामुळे खालच्या थरातील गोविंदांवर कमी भार पडतो आणि लहान मुलं गतीनं वर चढू शकतात. मात्र अनेक वेळा हे मनोरे कोसळतात आणि गोविंदांना चांगलाच मार बसतो. या मुक्या मारामुळे अनेक गोविंदा अपंग झाल्याची उदाहरणं ताजी आहेत. साहजिकच पाणी मारून ओल्या झालेल्या निसरड्या रस्त्यांवर हा खेळ खेळणाऱ्या गोविंदांच्या जीवावर बेतण्याची शक्यता असल्यामुळेच गेल्या काही वर्षांपासून या विरोधात याचिका दाखल केल्या जात आहेत. याचिकाकर्त्यांनी यावर भर देणं अपेक्षित असतं; वेडगळ दावे करून आपलं हसू करून घेणं नव्हे. मात्र यातील हा भाग सोडला तर उच्च न्यायालयानं हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत असल्याचं सांगून मनोऱ्यांच्या उंचीवर बंदी घालण्याचा विषय बाजूला सारला आहे. त्यामुळे आता जास्तीत जास्त उंचीचे मनोरे करण्यासाठी अहमिका लागणार हे उघड आहे. अर्थात अशा प्रकारची स्पर्धा जीवघेणी असते हे पथकांनी लक्षात घ्यायला हवं. आपण गोविंदांना जीवावर उदार होण्यास तर भाग पाडत नाही ना याचा त्यांनी प्रामुख्याने विचार करण्याची गरज आहे.

उत्साह, आनंद, जमलेल्या लोकांकडून मिळणारं प्रोत्साहन यामुळे अनेक गोविंदांना त्या भारलेल्या वातावरणात आपण अगदी तळाच्या फळीतील मुलांवर किती भार टाकत आहोत याचं भान रहात नाही आणि मनोरा कोसळला की होणारं शारीरिक नुकसान कालांतरानं लक्षात येतं. क्षणाच्या उन्मादामुळे आयुष्य मातीमोल करणं योग्य नाही याचा विचार सर्वच संबंधितांनी केला पाहिजे. कारण कायदा करणं, न्यायालयांनी आदेश काढणं यापेक्षा आपणच आपली काळजी घेणं योग्य ठरणार नाही का, हे जरूर तपासलं पाहिजे.

## असा हा श्रीकृष्ण!

पुराणांमधून

भगवान श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार मानला जातो. श्रावण कृष्ण अष्टमीला श्रीकृष्णाचा जन्म झाला असं मानलं जातं. म्हणूनच हा दिवस गोकुळाष्टमी म्हणून साजरा केला जातो. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली. तो महान तत्त्-



वेत्ता होता. त्याने जीवनाचं सार सांगितलं. श्रीकृष्णाने अवतारकार्यातून लोकांना शिकवण दिली. म्हणूनच काही हजार वर्षं उलटून गेली तरी श्रीकृष्णाचा जन्मदिवस भारतभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. श्रीकृष्णाच्या शिकवणीचा अवलंब केला जातो. श्रीकृष्ण आदर्शवत जीवन जगला. श्रीकृष्णाच्या अंगी अनेक गुण होते. या गुणांमुळेच तो महान बनला. श्रीकृष्णाने दिलेली शिकवण आजही तितकीच उपयुक्त आहे. त्याच्या अंगी असलेले गुण अंगी बाणवले तर आपणही समाधानी आयुष्य जगू शकतो. श्रीकृष्णाच्या अंगच्या काही गुणांविषयी...

* श्रीकृष्णाने कायमच मैत्री जपली. सुदामा, अर्जुन आणि श्रीदामा हे श्रीकृष्णाचे मित्र होते. मित्रांच्या मदतीला तो कायम धावून गेला. आपण श्रेष्ठ असल्याचं त्याने कधीही दाखवलं आहे. श्रीकृष्णाने मित्रांना योग्य मार्ग दाखवला. प्रसंगी तो त्यांच्या पाठीशी उभा राहिला. कृष्ण आणि सुदामा यांच्या मैत्रीचं उदाहरण आवर्जून दिलं जातं.

* श्रीकृष्णाच्या एकूण १६,१०८ राण्या असल्याचं म्हटलं जातं. त्यापैकी आठ प्रमुख राण्या होत्या. श्रीकृष्ण सुखी दांम्पत्य जीवन जगला. तो आपल्या प्रत्येक राणीला आनंदी ठेवत असे. त्यामुळे त्याच्या वैवाहिक आयुष्यात कधीही वाद निर्माण झाले नाहीत.

* श्रीकृष्णाने प्रत्येक नातं निभावलं. प्रियजनांसाठी त्याने द्वारका नगरीही वसवली. त्याने प्रत्येक नात्याचा मान ठेवला.

* श्रीकृष्ण हा धूर्त राजकारणी होता. महाभारतात पांडवांच्या विजयात त्याने महत्त्वाची भूमिका पार पाडली. कुरूक्षेत्रातवर तो उपस्थित राहिला. कौरवांच्या बाजूने उभ्या राहिलेल्या प्रत्येक योद्धयाचा त्याने धूर्तपणे नायनाट केला.



## बिजली महादेव मंदिर

तीर्थक्षेत्र

भारतातल्या अनेकविध शिवमंदिरांपैकी एक मंदिर हिमाचल प्रदेशातल्या कुल्लूमध्ये आहे. हे मंदिर बिजली महादेव म्हणून ओळखलं जातं. कुल्लू शहरातल्या व्यास आणि पार्वती नदीच्या संगमाजवळ असलेल्या उंच पर्वतावर हे मंदिर वसलं आहे. हे अत्यंत नयनरम्य असं स्थान आहे. या मंदिरात दर बारा वर्षांनंतर एक अनोखी घटना घडते. इथल्या शिवलिंगावर वीज कोसळते. वीज कोसळल्यानंतर शिवलिंगाचे तुकडे होतात. हे सगळे तुकडे पुजारी वेचतो आणि लोण्याचा वापर करून पुन्हा जोडून टाकतो. काही वेळानंतर पिंड मूळ स्वरूपात येते. असं का घडतं हे विषद करताना एक आख्यायिका सांगितली जाते. शिवलिंगावर वीज का पडते याचं रहस्य कोणालाही माहित नाही.

भगवान शंकरानेच राक्षसांच्या विनाशासाठी इंद्राला असं करायला भाग पाडल्याचं सांगितलं जातं. दर बारा वर्षांनी या स्थानी वीज कोसळायला हवी, असं शंकराने इंद्राला बजावलं होतं. पण विजेमुळे कोणाचंही नुकसान होऊ नये, अशी शंकराची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी स्वत:वरच वीज पाडायला सांगितलं. समुद्रमंथनादरम्यान शंकराने हलाहल विषाचं प्राशन केलं होतं. त्याचप्रमाणे भक्तांच्या कल्याणासाठी सदैव तत्पर असलेल्या महादेवाने हे संकटही स्वत:च झेलायचं ठरवलं.

भाद्रपद महिन्यात इथे मोठा उत्सव असतो. तसंच महाशिवरात्र आणि श्रावणातल्या सोमवारी भक्तमंडळींची मोठी गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. असं हे महादेवाचं रहस्यमयी मंदिर कुल्लूमधलं खास आकर्षण आहे.

## शिकवण कावळ्याची

भक्ती बोध

आयुष्यात ज्ञानी किंवा तत्त्-वेत्ताच शिकवण देतो असं नाही तर एखादा सर्वसामान्य माणूस, प्राणी किंवा पक्षीही आपल्याला शिकवण देऊन जातो. जग जिंकणारा सिकंदर आणि कावळा यांची कथाही अशीच. एका सामान्य कावळ्याने सिकंदरला आयुष्याची शिकवण दिली होती. जग जिंकल्यानंतर सिकंदरला अमर व्हायचं होतं. विशिष्ट ठिकाणचं पाणी प्यायलानंतर अमर होता येतं हे त्याला कळलं होतं. या पाण्याच्या शोधार्थ तो निघाला. जगभर भटकल्यानंतर अखेर त्याला ते स्थान सापडलं. एका गुहेत वाहणाऱ्या झऱ्याचं पाणी प्यायल्याने तो अमर होणार होता. हे पाणी सापडल्याने तो खूश झाला. पाणी पिण्यासाठी त्याने हात पुढे केला तेवढ्यात त्याला कावळ्याचा आवाज आला. एक कावळा गुहेत बसला होता. तो सिकंदराला म्हणाला थांब, ही चूक करू नकोस.

सिकंदर त्याच्याकडे बघतच राहिला. हा कावळा अत्यंत वाईट अवस्थेत होता. त्याचे पंख झडून गेले होते. त्याला




नीट दिसत नव्हतं. हा कावळा म्हणजे सांगडा दिसत होता. एक साधा कावळा आपल्याला शिकवतो म्हणजे काय, असं वाटल्याने सिकंदर त्याच्यावर ओरडलाच. मला सांगणारा तू कोण, असा प्रश्न सिकंदराने केला. तेव्हा कावळा म्हणाला, मी सुद्धा अमर होण्यासाठी इथे आलो. हे पाणी प्यायलो. आता मी अमर झालो आहे. पण माझी अवस्था बघ. मला मृत्यू हवा आहे पण मिळत नाही. मी मृत्यूची भीक मागत आहे. पण मला तो मिळत नाही. माझी अवस्था भयावह झाली आहे. सिकंदर काय समजायचं ते समजला. माणसाला वार्धक्य येणार आहे. म्हातारपणी काहीही करता येत नाही. त्यामुळे हातपाय चालतात तोपर्यंत आयुष्याची मजा लुटता येते. नंतरच्या आयुष्याला काहीही अर्थ उरत नाही. हे ऐकताच सिकंदर पाणी न पिताच निघून गेला. साध्या कावळ्याने त्याला जीवनाचं सार शिकवलं होतं.

## विरक्तीची लक्षणं

दासबोधातून...

दुसऱ्या दशकातल्या नवव्या समासात समर्थांनी विरक्तलक्षणं सांगितली आहेत. विरक्तांच्या लक्षणांबाबत समर्थ म्हणतात, ऐका विरक्तांची लक्षणें। विरक्ते असावे कोण्यां गुणें। जेणे अंगी सामर्थ्य बाणे। योगियाचे ।।१।। जेणे सत्किर्ती घडे। जेणे सार्थकता घडे। जेणेंकरिता महिमा चढे। विरक्तांसी ।।२।। जेणें परमार्थ फावे। जेणें आनंद हेलावे। जेणे विकृती दुणावे विवेकेंसहित ।।३।। जेणे सुख उचंबळे। जेणें सद्विद्या वोळे। जेणें भाग्यश्री प्रबळे। मोक्षेंसहित ।।४।। मनोरथ पूर्ण होती। सकळ कामना पुरती। मुखे राहे सरस्वती बोलावया ।।५।।

याचा अर्थ असा की... विरक्त पुरूषाच्या अंगी कोणती लक्षणं असावीत ते आधी सांगतो. कारण



वैराग्यामुळे योग्याच्या अंगी सामर्थ्य बाणतं आणि योग सिद्धीला जातो. विरक्तीमुळे उत्तम किर्तीचा लाभ होतो. मनुष्यजन्माचं सार्थक होण्यासाठी विरक्ती महत्त्वाची आहे. वैराग्य घेतलेल्या माणसाला थोरवी प्राप्त होते. वैराग्यगुणामुळे साक्षात्कार होतो. यामुळे आनंद उचंबळून येतो तसंच विकृतीचा प्रभाव कमी होतो. विवेकासहित वैराग्यही दुपटीने वाढू लागतं. वैराग्य गुणामुळे सुख उचंबळून येतं. सद्विद्या बोळावते. भाग्य उजळते आणि अखेरीला मोक्षही मिळतो. विरक्त व्यक्तीची सर्व मनोरथे पूर्ण होतात. सर्व कामनांची पूर्तता होते. मुखात सदैव सरस्वतीचा वास राहतो. म्हणजे विरक्त व्यक्तीच्या वाणीत माधुर्य असतं.

विरक्तीच्या अशा अनेक लक्षणांचं वर्णन समर्थांनी या समासात केलं आहे. ते शेवटी म्हणतात की विरक्ते उत्तम गुण घ्यावे. विरक्ते अवगुण त्यागावे। नाना अपाय भंगावे। विवेकबळे ।। ३९।। अर्थात विरक्त माणसाने अवगुण त्यागावेत. विविध अपाय आणि दोष दूर करावेत. विवेकाचा अवलंब करावा, असं समर्थ सांगतात.

## पूजा करताना...

परंपरा

सध्याचा श्रावण महिना आणि पुढे येणारे सण-उत्सव यामुळे सध्या पूजनाचा काळ आहे. लवकरच गणेशोत्सव सुरू होईल. देवीदेवतांच्या पूजनाने सर्व मनोकामना पूर्ण होतात. पण त्यासाठी पूजनाच्या नियमांचं पालन करायला हवं विधीवत पूजन करायला हवं. पूजन करताना नेमकं काय करायला हवं याविषयी...



* सूर्य, गणेश, दुर्गा, शिव आणि विष्णू हे पंचदेव मानले जातात. त्यामुळे प्रत्येक शुभकार्यात या देवतांची पूजा करायला हवी. दररोज पूजा करताना या पंचदेवांचं स्मरण करायला हवं. यामुळे लक्ष्मीची प्राप्ती होते असं म्हणतात.
* शंकर, गणपती आणि भैरव या देवतांना तुळस अर्पण करू नये.
* दुर्गा देवीला दुर्वा अर्पण करू नये. दुर्वा या गणेशाच्या प्रिय आहेत.
* सूर्यदेवाला शंखातल्या जलाने अर्घ्य देऊ नये.
* आंघोळ केल्याशिवाय तुळशीचं पान तोडू नये. आंघोळ न करता तोडलेलं तुळशीचं पान देवाला अर्पण करू नये.
* शास्त्रांनुसार दिवसातून पाच वेळा देवीदेवतांचं पूजन करायला हवं. सकाळी ५ ते ६ हा काळ ब्राह्ममुहुर्ताचा मानला जातो. या काळात देवपूजन आणि आरती व्हायला हवी. त्यानंतर सकाळी ९ ते १० या काळात दुसऱ्यांदा पूजा व्हायला हवी. दुपारी दुसऱ्यांदा पूजन करायला हवं. त्यानंतर देवांना झोपू द्यावं. संध्याकाळी पुन्हा पूजा करायला हवी. तर रात्री ८ त ९ या वेळात शयन आरती करायला हवी.
* गंगाजल प्लास्टिकच्या बाटलीत किंवा कोणत्याही अपवित्र भांड्यात ठेऊ नंये. गंगाजल तांब्याच्या भांड्यात ठेवायला हवं.
* मंदिर तसंच देवाच्या मूर्तीसमोर कधीही पाठमोरं बसू नये.
* शंकराला लाल फूल अर्पण करू नये.
* रविवारी दुर्वा तोडू नयेत.
* देवी लक्ष्मीला कमळ अर्पण करायला हवं.
* देवाला अर्पण करायची फुलं हातात ठेवण्याऐवजी पवित्र पात्रात ठेवावी.

## महत्त्व अभिषेकाचं!

जाणून घ्या

सध्या श्रावण महिना सुरू असल्याने शंकरावर अभिषेक केला जातो. शंकराला अभिषेक अत्यंत प्रिय असल्याचं म्हणतात. शंकरावर अभिषेक करण्यासाठी विविध पदार्थांचा वापर केला जातो. अभिषेकाच्या प्रत्येक पदार्थामुळे वेगळा परिणाम साधला जा-तो. अभिषेकासाठी वापरण्यात आलेला कोणता घटक काय परिणाम साधतो याविषयी...



* शंकरावर पाण्याने अभिषेक केला तर पर्जन्यमान उत्तम राहतं असं म्हणतात. पाण्याच्या अभिषेकामुळे पावसाचा समतोल राखला जातो तसंच पर्यावरणाचं रक्षणही होतं, असं म्हणतात.
* कुश आणि पाण्याचा अभिषेक केला तर वाईट गोष्टींचा नाश होतो. रागलोभ दूर होतात.
* दह्याने अभिषेक केला तर घरात समृद्धी नांदते असं मानलं जातं.
* शंकरावर उसाच्या रसाचा अभिषेक केला जातो. यामुळे संपत्तीत वृद्धी होते असं म्हणतात.
* मधमिश्रित पाण्याने केलेल्या अभिषेकामुळेही संपत्तीत वृद्धी होते.
* पवित्र नद्यांच्या पाण्याने शंकरावर अभिषेक केला तर जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते, असं म्हटलं जातं.
* सुगंधी पाण्याच्या अभिषेकामुळे आरोग्य उत्तम राहतं.
* दुग्धाभिषेकामुळे शरीरातले दोष निघून जा-तात. तसंच सगळ्या इच्छा पूर्ण होतात, असं म्हटलं जातं.
* गंगाजलाच्या अभिषेकामुळे ताप नाहीसा होतो.
* साखरयुक्त दुधाने अभिषेक केला तर बुद्धी आणि चातुर्यात वाढ होते असं म्हणतात. तुपाच्या अभिषेकामुळे कुटुंबाची वृद्धी होते. राईच्या तेलाने अभिषेक केला तर शत्रुचा नायनाट होतो
* मधाच्या अभिषेकामुळे पापांचा नाश होतो.

# सातनवरी बनले देशातील पहिले स्मार्ट गाव

## राज्यातील ३५०० गावांमध्ये राबवणार स्मार्ट व्हिलेज प्रकल्प; १८ आधुनिक सेवा उपलब्ध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढे जात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा सातनवरी गावात उपलब्ध करून देत समृद्ध गावाचे रोल मॉडेल उभे राहिले असून लवकरच राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. याद्वारे पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत २४ कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत राज्य शासन व नागपूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने सातनवरी गावात आधुनिक तंत्रज्ञान आधारित सेवा उपलब्ध करून देत या गावाला देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनविले आहे. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंह ठाकूर, सातनवरी गावाच्या सरपंच वैशाली चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी यावेळी उपस्थित होते.




तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून गावात सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातनवरी गावात सुरू झालेला देशातील स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ हे एक क्रांतीकारक पाऊल असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी आपल्या संबोधनात म्हणाले. गावांना सक्षम करण्याच्या दिशेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील गावागावांमध्ये भारतनेट प्रकल्प राबविला गेला. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे यशस्वी अंमलबजावणी राज्यात झाली व दुसऱ्या टप्प्याची सुरूवातही झाली. याच धरतीवर महाराष्ट्रात महानेट हा प्रकल्प राबविण्यात आला. आता याच प्रवासात भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकत गावांमध्ये आरोग्य, शिक्षणासोबतच स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी अशा एकूण 18 सेवा कमी वेळात उपलब्ध करून देत सातनवरी हे देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव ठरले आहे.

या गावातील शेतकरी ड्रोन व सेंसर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींचे योग्य नियोजन करून शेतीचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवू शकतील. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधारेल. टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होवून गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होणार आहे. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होवून वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळेल व सातनवरी गाव लवकरच देशात एक रोल मॉडेल म्हणून नावारूपाला येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. तसेच या सेवांचा योग्य प्रकारे वापर करत येत्या वर्षात सातनवरी गावाने देशातील सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकीक मिळवावे, अशा अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या. सातनवरी गावाने अल्पावधीतच स्मार्ट व इंटेलिजंट गाव बनण्याचा बहूमान मिळवला असून लवकरच राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात १० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यातील जवळपास ३ हजार ५०० गावे स्मार्ट व इंटेलिजंट करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया आदी महत्वाचे प्रकल्प देशात राबविले. यालाच पुढे घेवून जात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात स्मार्ट व इंटेलिजंट गाव तयार करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला व नागपूर जिल्ह्याला हा मान मिळाला ही अभिमानाची बाब आहे. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने नागपूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजनमधून १२०० कोटींचा भरीव निधी मंजूर केला व यामाध्यमातून जिल्ह्यात विविध विकास कामे सुरू असून सातनवरी गावाच्या माध्यमातून देशात विकसित ग्रामीण भागासाठी डिजिटल गावाची सुरूवात झाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# जीवन किती जगले यापेक्षा जीवनात किती सार्थक केले हे गरजेचे : नितीन गडकरी




■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. २४ :

समाजात जे चांगले कार्य असते त्या कार्याला प्रचार आणि प्रसाराची गरज राहत नाही सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्यानेच समाजाची गुणवत्ता सुधारतो हे नाकारता येणार नाही. आणि समाजातील चांगल्या कार्याला प्रचार किंवा प्रसाराची गरज नसते तर कामातील गुणवत्ताच समाजासमोर प्रेरणा निर्माण करत असते असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूर येथील वनामती वसंतराव नाईक स्मृति सभागृहात आयोजित सार्थक फाउंडेशनच्या वतीने समाजसेवकांचा सत्कार या कार्यक्रमात बोलताना म्हणाले पुढे बोलताना गडकरी म्हणाले कार्याप्रती समर्पण करून केलेले कार्य हे समाजात परिवर्तन घडवित असते. प्रत्येक चालल्या कार्याची समाजाने दखल घेऊन त्याचे जीवनात अनुकरण केले पाहिजे तरच जीवन किती जगले यापेक्षा जीवन किती सार्थक कार्याने जगले हे महत्त्वाचे ठरते असे म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च न्यायालयाच्या नागपूर बेंचचे प्रशासकीय न्यायाधीश, न्यायमूर्ती अनिल किलोर हे होते तर विशेष अतिथी म्हणून राज्याचे माजी मंत्री रमेशचंद्र बंग व उमरेड विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय मेश्राम उपस्थित होते.

आपल्या कार्यातून समाजासमोर उदाहरण निर्माण करणाऱ्या समाजसेवकांचा यावेळी भव्य सत्कार करण्यात आला त्यात बुद्धिबळाच्या ग्रँडमास्टर झालेल्या दिव्या देशमुख, आम्ही आमच्या आरोग्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून ४० वर्षापेक्षा जास्त कालखंड आदिवासी व सर्वसामान्य महिलांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या डॉ सतीश गोगलवार व शुभदा देशमुख हे दाम्पत्य, पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ सेवा देणारे बाळासाहेब कुलकर्णी, व नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी सत्कारातून सामाजिक कार्याचा गौरव आणि कौतुक गरजेचे असून त्यातून कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळतो व त्यांचे सामाजिक कार्य अधिक जोमाने सुरू होते किंवा सत्कार हे कधीही सत्कारमिच लागतात म्हणून ते व्हायला पाहिजे कारण सामाजिक कार्याचा प्रवास हा सोपा नसतो असे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्थाविक सार्थक फाउंडेशनचे अध्यक्ष महेश बंग यांनी स्वागत गीत अरुणा बंग यांनी सूत्रसंचालन विनोद चतुर्वेदी यांनी तर मानपत्राचे वाचन सुधीर बाहेती, राजाभाऊ टाकसाळे, पंकज महाजन, अजय मल यांनी तर आभार एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष पी मोहन यांनी मानले.

यावेळी वनराई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरिज गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कामगार विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर विद्रोही, माजी आमदार प्रकाश गजभिये, नागपूर जिल्हा परिषदेचे माजी गटनेते दिनेश बंग, माजी जि प सदस्य प्रकाश खापरे, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, श्रीराम काळे, डॉ सुधीर गुप्ता, अँड आनंद परचुरे, अँड शंतनू घाटे, डॉ. पिनाक दंदे, संजय चिकटे,वसंतराव कांबळे, अमर जैन, संजय चिकटे, बबनराव आव्हाळे, सुनील बोंदाडे,मुकेश ढोमणे,प्रभाकर लेकुरवाळे, राजू गोतमारे, सूर्यकांत मिश्रा, दिनेश ढेंगरे सुशील मिश्रा, हनुमान दुधबळे, रश्मी शंभरकर आदींसह शेकडो मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.

## कार पुलावरून ५० फूट खोल नदीपात्रात कोसळली

# हॉटेल मालकाचा पाण्यात बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २४ :



श्रावणमासाची सांगता झाल्यामुळे हॉटेलची दारे उघडण्यापूर्वी मासे आणण्यासाठी पवनी येथे गेलेल्या उमरेड येथील हॉटेल मालकाची भरधाव कार पुलावरून ५० फुट नदी पात्रात कोसळल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. हा अपघात रविवार सकाळी ८ वाजताच्या सुमारास राष्ट्रीय मार्गावरील मरूनदी पुलावर झाला. सागर मधूकर वाघमारे (३०) रा. उमरेड असे मृत हॉटेल मालकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार मृतक सागरचे उमरेड येथे राष्ट्रीय मार्गावर हॉटेल आहे. श्रावणमासाची सांगता झाल्यामुळे रविवारला हॉटलेची दारे उघडण्यापूर्वी सागर हा मासे आणण्यासाठी उमरेड येथून पहाटे ५ वाजताच्या सुमारास आपल्या टाटा हॅरिअर कार क्र. एम.एच. ४० सी.एक्स. ७९२६ ने पवनी येथे आला होता. परतीच्या प्रवासात भरधाव कारवरील नियंत्रण सुटल्याने राष्ट्रीय मार्गावरील वळणावरून ही कार अंदाजे पुलावरून ५० फुट खोल नदीपात्रात शिरली. नदीपात्रात पाणी असल्यामुळे सागरचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

याबाबत माहिती मिळताच, ठाणेदार जयप्रकाश निर्मल यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने पाण्यात बुडालेल्या कारमधून सर्वप्रथम मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर जेसीबी व क्रेनच्या मदतीने कारसुध्दा बाहेर काढण्यात आली. मृतदेह शवविच्छेदणाकरीता रूग्णालयात रवाना करण्यात आला आहे.

ही हॅरियर कार राष्ट्रीय मार्गावरील वळणावर सुरक्षेसाठी ठेवलेले लोखंडी ड्रम व पुलावरील सुरक्षा कठडे तोडून अंदाजे ५० मिटर लांब व ५० फुट खोल नदीपात्रात शिरली. यावरून कारचा वेग किती असावा, याचा अंदाज येतो. नदीपात्रातील पाण्यात बुडालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढल्यानंतर सागरच्या डोक्याला एक किरकोळ जखम आढळली. त्यामुळे सागरचा मृत्यू हा पाण्यात बुडाल्यामुळे झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री निवासस्थानावर मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. २४ :

शेतकऱ्यांच्या विविध मागण्या घेउन क्रांतिकारी शेतकरी संघटना, भारतिय किसान संघ, शेतकरी संघटना व कर्नागड शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त नियोजनानुसार दिनांक २९ ऑगस्ट रोजी व्हरायटी चौक सीताबर्डी ते देवगिरी निवासस्थाना पर्यंत एल्गार मार्च नियोजित आहे.

सरसकट कर्जमाफी, चालू खातेदारांना अनुदान, चुकीच्या पद्धतीने रद्द केलेला पीकविमा, पीकविमा योजनेतील चुकीचे बदल रद्द करुन योजना पूर्ववत करणे, रखडलेले पुरवणी यादीतील संत्रा-मोसंबी फळगळ अनुदान तसेच जंगली जनावरांच्या त्रास पासून मुक्ती व लाडक्या बहिणींना २१०० रुपए मानधन यांसह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत एल्गार मोर्चा निघणार असल्याचे सावता माळी सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत शेतकरी पुत्र सागर दुधाने यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्येने सहभागी होण्यासाठी आवाहन केले. यावेळी किसान संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रमोदजी टोनपे, कर्नागड तर्फे प्रशांत खुरसांगे, प्रेम नारायण वैद्य, जितेंद्र लोणे, हरीश हजारे, मनसेचे तेजस कोरडे व शेतकरी उपस्थित होते.

## पुन्हा पावसाचा जोर वाढणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

मागील दोन दिवसांपासून राज्यात पावसाने उघडीप दिली असली तरी, आता पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुन्हा एकदा तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांत अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

मागील आठवड्यात महाराष्ट्रात मुसळधार पावसाने थैमान घातले होते. अतिवृष्टीमुळे शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, पिकांचे मोठे नुकसान झाले आणि शेतकरी हवालदिल झाले. हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली असून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# मनोरुग्ण आईने मुलांना अंधारात डांबून ठेवले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

मनोरुग्ण आईने तिच्या मुलांना तब्बल तीन वर्षे डांबून ठेवले होते. ही घटना उघडकीस येताच पोलिसांच्या सहकार्याने बाल संरक्षण पथकाने केली कार्यवाही केली व मुलांची सुटका केली. २४ ऑगस्टला तीन वर्षांपासून शाळेत न गेलेल्या आणि घराच्या अंगणातदेखील न फिरलेल्या दोन बालकांची यशस्वी सुटका करण्यात आली. ही कारवाई बाल संरक्षण पथक व ग्रामीण मुक्ति ट्रस्टच्या पुढाकाराने समन्वयातून पार पडली. २० ऑगस्ट ला ही घटना उघडकीस आली.

जिल्हा कार्यालयाकडून नागपूर जिल्ह्याच्या गावागावांमध्ये मुलांच्या सुरक्षा संबंधी स्थापित करण्यात आलेल्या ग्राम बाल संरक्षण समितीची सभा घेण्यात आली. ग्राम बाल संरक्षण समितीची बैठकित यावेळी गावातील दोन मुले गेली तीन वर्षे शाळेत न जाता त्यांना घरातच डांबून ठेवण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली. शेजाऱ्यांनीही मुलांना दोन ते तीन वर्षांपासून न पाहिल्याचे सांगितले. यावर समितीने तातडीने निर्णय घेत गृहभेट घेतली.

मुलांची आई मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याचे आढळ्ले. त्यामुळे २१ ऑगस्टला प्रकरण नोंदवण्यात आले व याबाबतची माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांना देण्यात आली. पठाण यांनी सदर प्रकरण हे संवेदनशील असल्याने जिल्हा महिला बाल विकास अधिकारी सुनील मेसरे यांना सांगितले. त्यांनी तातडीने पथक गठीत करून मुलांची सुटका करण्याचे आदेश दिले. तसेच याबाबतचे पत्र पोलिस निरीक्षक व बाल कल्याण समितीकडे पाठविण्यात आले. सर्व औपचारिकता पूर्ण करून २२ ऑगस्टला बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार पोलिसांच्या सहकार्याने रेस्क्यू ऑपरेशन पार पाडण्यात आले.

सुटका करण्यात आलेल्या मुलांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना शासकीय बालगृहात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, मुलांच्या आईला उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून कुटुंबाला समुपदेशनही देण्यात आले. सुटका करण्यात आलेला दोन्ही मुलांचे वय सहा वर्ष व सात वर्षे असल्याने तसेच मुले सुटका केल्यानंतर थोडीशी विचलित वागत असल्याने बालगृहातत त्याच मुलांचा समुपदेशन सुरू असून मुलांना सायकॉलॉजिस्टकडे दाखवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. व सदर मुलांच्या बाबतीत नातेवाईकांची व इतर आप्त परिवारांची गृह चौकशी करण्यात येणार आहेत.

# रस्ते बांधणाऱ्या सार्वजनिक बांधकाम कार्यालयापर्यंत जाण्यासाठीच रस्ता नाही

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २४ :

भंडारा जिल्ह्यात रस्ते बांधणी आणि महामार्गांचे जाळे विणणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पावसामुळे कार्यालयाच्या समोरील परिसरात तळे साचून तलाव सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा हा कारभार म्हणजे दिव्याखाली अंधार असेच म्हणावे लागेल.

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सारख्या संस्था संपूर्ण जिल्ह्यात रस्ते बांधणीचे काम करते. नागरिकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी सुकर मार्ग बांधण्याचे काम या विभागाचे आहे मात्र जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे विणणाऱ्या या



विभागात नागरिकांना एखाद्या कामासाठी जायचे असल्यास चक्क मार्ग शोधावा लागतो. उपविभागीय अभियंता कार्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी विशेषतः पावसाळ्याच्या दिवसात तारेवरची कसरत करावी लागते. रस्त्यांचे जाळे विणणाऱ्या विभागाच्या कार्यालयालाच रस्ता नसणेही विडंबनाच म्हणावे लागेल.

भंडारा जिल्हा रुग्णालयाच्या मागे गंगा विला कॉलनीसमोर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता क्रमांक १ चे कार्यालय आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यालय आहे. हे कार्यालय समस्येने वेढलेले आहे. या कार्यालयांसमोर ना योग्य रस्ता बांधण्यात आला आहे ना ड्रेनेजची व्यवस्था आहे. पावसाळा येताच येथे चिखल, खड्डे आणि पाण्याचे तळे तयार होतात. कार्यालयात कामासाठी येणाऱ्या सामान्य नागरिक, कंत्राटदार, कर्मचारी आणि कधीकधी वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाणी आणि चिखलातून आत जावे लागते.

परिस्थिती अशी आहे की जिल्ह्यातील डझनभर रस्ते, पूल आणि महामार्ग या कार्यालयांच्या देखरेखीखाली बांधले जातात. कोट्यवधी रुपयांचे कंत्राट दिले जातात, गुणवत्ता तपासली जाते, योजना तयार केल्या जातात, पण जेव्हा त्यांच्या स्वतःच्या कार्यालयात पोहोचण्याचा प्रश्न येतो तेव्हा कोणीही तिथे लक्ष देत नाही. संपूर्ण जिल्ह्याला रस्ते पुरवणारा विभाग स्वतःसाठी रस्ता का बांधू शकला नाही? हा प्रश्न लोकांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे. कार्यालयांसमोर साचलेले पाणी एका लहान तलावासारखे दिसते.

भंडारा जिल्ह्यातील इतर ठिकाणी विकासकामे वेगाने सुरू आहेत, परंतु विभागीय कार्यालयासमोरील दुर्लक्ष आश्चर्यकारक आहे. जिल्हा मुख्यालयाच्या इतक्या महत्त्वाच्या कार्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य रस्ता उपलब्ध झाला नाही तर भविष्यात या दुर्लक्षामुळे आणखी गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे स्थानिक लोकांचे म्हणणे आहे.

# अवैध दारू विक्री विरोधात महिला आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २४ :

जिल्ह्यात अवैध दारू विक्री जोमात सुरू आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागासह पोलिसांचे त्याकडे दुर्लक्ष असते. या दारूमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होतात. अवैध दारू विक्री विरोधात कारवाईकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने शहरालगतच्या गुडधी गावातील महिलांनी रविवारी आक्रमक भूमिका घेतली. महिलांनी रौद्ररूप धारण करीत अवैध दारू विक्री होत असलेल्या ठिकाणी धडक देऊन टीन-शेड व हातगाड्यांची तोडफोड केली. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी दारूची अवैध विक्री होते. अवैध दारू विक्रीची दुकाने राजरोसपणे थाटण्यात आली आहेत. ढाबे, हॉटेलमध्ये देखील लपून-छपून दारू विक्री केली जाते. दारू विक्रीच्या अवैध व्यवसायामुळे तरुण पिढी देखील व्यसनाधिनतेकडे वळत आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले, तर अनेकांना असाध्य आजाराने ग्रासले. अकोला शहरालगतच्या गुडधी गावात अवैध दारू विक्री केली जात असल्याने गावातील महिला त्रस्त झाल्या होत्या. गावात अनेक वेळा दारू बंदीची मागणी करण्यात आली.

मात्र, दारू बंदीला विरोध झाला. त्यामुळे ही बंदी होऊ शकली नाही. अवैध दारू विक्रीच्या त्रासाला कंटाळून अनेक वेळा महिलांनी तक्रारी सुद्धा केल्या. मात्र, त्याची दखल घेतल्या गेली नसल्याचा आरोप महिलांनी केला. अखेर आज दारू विक्री विरोधात महिला आक्रमक झाल्याचे चित्र बघायला मिळाले. गावातील महिलांनी एकत्र येत अवैध दारू विक्री विरोधात रोष व्यक्त करून थेट त्याचे स्थळ गाठले. महिलांनी तीव्र संताप व्यक्त करीत अवैध दारू विक्री करणाऱ्यांच्या घरातील दारू साठा नष्ट केला.

# अधिकार नसतांना तांदूळ बदलून मागणाऱ्या गोदाम व्यवस्थापकांना तात्काळ निलंबित करा

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २४ :

अतिदुर्गम, अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्ह्यातील सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता किरायाने घेण्यात आलेल्या देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन गुणनियंत्रण अधिकाऱ्याने तपासणी करून स्वीकृत केलेला तांदुळ जिल्ह्यातील तीन शासकीय गोदामात सार्वजनिक वितरणाकरीता पाठविण्यात आला असता तो मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे गोदाम व्यवस्थापकाच्या तपासणीत आढळून आले. दरम्यान गोदाम व्यवस्थापकाने संबंधित राईसमिलर्स व मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ स्वीकृत करणाऱ्या गुणनियंत्रण अधिकारी यांचे विरूद्ध नियमानुसार योग्य कारवाई करण्यासंदर्भात प्रकरण वरिष्ठांकडे पाठवणे आवश्यक असतांना निकृष्ठ तांदुळ बदलून मागण्याचे कोणतेही अधिकार नसतांना परस्पर संबंधीत राईसमिलर्सना तांदुळ बदलून मागीतले. एकुणच प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता संगनमतातुन राईसमिलर्ससह गुणनियंत्रण अधिकारी यांना वाचविण्याचा प्रयत्न करून कर्तव्यात हयगय केल्या प्रकरणी जबाबदार धरून संबंधित गोदाम व्यवस्थापकांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

केलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज तालुक्यातील खाजगी गोडाऊन मालकांचे सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता दोन गोडाऊन किरायाने घेण्यात आले आहेत. यात आकाश अग्रवाल गोडाऊन नैनपुर (वडसा) व पंकज मोटवानी गोडाऊन कुरुड यांचा समावेश आहे. शासन नियमानुसार या गोदामात सिएमआर तांदुळ जमा करतांना पुरवठा विभागाचे गुणनियंत्रण अधिकारी यांनी सदर तांदळाची रासायनिक तसेच शारिरीक तपासणी करून सदर तांदूळ गुणवत्तापूर्ण असल्यासच स्वीकृत करणे अनिवार्य होते.मात्र देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये स्वीकृत करण्यात आलेले सिएमआर तांदूळ सार्वजनिक वितरणाकरीता जिल्ह्यातील अहेरी,मुलचेरा येथील दोन शासकीय गोडाऊन व गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठविण्यात आले असता सदर तांदूळ तेथील गोदाम व्यवस्थापकांनी ताब्यात घेऊन सदर तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आल्याने या संदर्भात वरिष्ठांना माहिती देऊन वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र येथील गोदाम व्यवस्थापकांनी आपल्या अधिकार क्षेत्रा बाहेर जाऊन कोणतेही अधिकार नसतांना सदर तांदूळ बदलून देण्यासंदर्भात राईसमिलर्सना परस्पर पत्र दिल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

यात देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन दि.३० मे २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम अहेरी स्थित मोदुमडगु येथे वाहन क्रमांक एमएच-३४ एबी-३६५१ टीपी क्रमांक ३४३३०१ ने वजन २४७ क्विंटल तांदूळ,दि.३० मे २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम मुलचेरा येथे वाहन क्रमांक एमएच-३४ एबी-८२९२ ने टीपी क्रमांक २१७०९९ धान्याचे वजन २४६ क्विंटल ८० किलो तसेच दि.२ जुन २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम अहेरी स्थित मोदुमडगु येथे वाहन क्रमांक एमएच-३४ एबी-५२९५ टीपी क्रमांक २१७१०० धान्य वजन २४५ क्विंटल ६० किलो तांदूळ येथील गोदाम व्यवस्थापकांनी तपासला असता सदर तांदूळ अळ्यामिश्रीत,कणी व डस्ट युक्त आढळून आला.

तसेच देसाईगंज येथीलच आकाश अग्रवाल गोडाऊन येथुन दि.३१ जुलै २०२५ रोजी सार्वजनिक वितरणाकरीता गडचिरोली येथील अनुराग ट्रान्स्पोर्ट कंपनिच्या एमएच-३४ एम-६१३३ या क्रमांकाच्या वाहनाने तब्बल ४५० कट्टे टीपी क्रमांक ३४३२४७ ने गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठविण्यात आला असता येथील गोदाम व्यवस्थापक नरेंद्र खोब्रागडे यांनी सदर तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने सदर निकृष्ठ तांदुळ ताब्यात घेऊन संबंधित राईसमिलर्सला तांदूळ बदलून देण्यासंदर्भात पत्र दिले.सदर तांदूळ विशाल राईसमिल कुरुडचे संचालक पुरुषोत्तम मुरजमल डेंगानी यांच्या मिलमध्ये भरडाई करून देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये तांदळाची गुणवत्ता तपासणी करून स्वीकृत केल्या गेल्याचे भासविण्यात आले.वास्तविक पाठविण्यात आलेले तांदूळ गडचिरोली येथील शासकीय गोदामातील गोदाम व्यवस्थापकाने तपासणी केली असता मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले होते.त्यामुळे येथील गोदाम व्यवस्थापकाने ही गंभीर बाब लक्षात घेता पुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन निकृष्ठ तांदूळ ताब्यात घेऊन प्रकरण पुढील कारवाई करीता प्रस्तावित करणे आवश्यक होते.मात्र येथील गोदाम व्यवस्थापक नरेंद्र खोब्रागडे यांनी देखील सदर तांदूळ परस्पर संबंधीत राईसमिलर्सला बदलून देण्यासंदर्भात पत्र दिल्याचे समोर आले आहे.

देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन जिल्ह्याच्या एकुण तीन शासकीय गोदामात सार्वजनिक वितरणाकरीता पाठविण्यात आलेला तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने तसेच सदर तांदूळ आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये कार्यरत गुणनियंत्रण अधिकारी यांनी सदर तांदळाची गुणवत्ता तपासणी करूनच स्वीकृत करून सार्वजनिक वितरणाकरीता पाठवल्यानंतर मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने राईसमिलर्स व गुणनियंत्रण अधिकाऱ्याच्या संगनमताने स्वीकृत करून पाठविण्यात आल्याचे स्पष्ट होत असल्याने संबंधितांवर वरिष्ठाच्या आदेशानुसार कारवाई करणे ही गोदाम व्यवस्थापकांची जबाबदारी होती.